म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कथा
दा. क्र. १७२३

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १७२३
IRBK-0101723

IRBK-0101723
IRBK-0101723

23 JUL 1971
27 JUL 1972

23



दिनकर द. पाटील

# कोंवळीं किरणें

[ लघुकथा ]

म. ग्रं. सं. ठा
पा. क्र. ३७२३
दि. ...

क्रमांक

IRBK-0101723

करवीर प्रांतिक
साहित्य संमेलनदिन

२० जुलै १९४१ ]

[ किंमत १। रु.

प्रकाशक :—
दा. ना. मोघे, बी. ए.
स्कूल व कॉलेज बुकस्टॉल,
कोल्हापूर.

मुद्रक :—
क्ष. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस,
कोल्हापूर.

- मुखपृष्ठ—परिचय, पान १२३ पहा.
- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

## अनुक्रम—


| | |
|---|---|
| क्षितिजावर ... ... ... | ४ |
| अपुरी गोष्ट ... ... ... | ९ |
| घराबाहेर ... ... ... | १८ |
| देह आणि मन ... ... ... | ३२ |
| दुसरें प्रेम ... ... ... | ४१ |
| दिवाळीची भेट ... ... ... | ५१ |
| भाऊबीजेची ओवाळणी ... ... | ५८ |
| उद्धार ... ... ... ... | ६८ |
| सुखस्वप्न ... ... ... | ७३ |
| कोकिळा ... ... ... | ८३ |
| पुढारी ... ... ... ... | ९२ |
| लग्नाचा अपघात ... ... | ९८ |
| आहुति ... ... ... | १०७ |
| सप्रेम भेट ... ... ... | ११३ |
| मुखपृष्ठ (रसग्रहण) ... ... | १२३ |

# क्षितिजावर

मीलनाची आतुरता अन्तरीं कितीहि असली, तरी रमणाच्या वाटेवर अभिसारकेचीं पावलं मंदावतातच ! परंतु, या संकोचानंच तिच्या प्रीतीची ओळख वल्लभाला पटते, नाहीं कां ? माझी दृढ श्रद्धा आहे, त्याच अकृत्रिम प्रेमानं रसिक माझ्या या पदक्षेपाचं स्वागत करतील.

* * *

मला कल्पनाहि नव्हती, माझ्या आयुष्यांत हा दिवस उगवेल. परंतु, प्रेमाप्रमाणं साहित्यसेवेंतहि मनुष्य योगायोगामुळें पडतो, हेंच खरं ! मला आठवतं, लाडका विद्यार्थी म्हणून गुरुवर्य विनायकराव कर्नाटकी यांच्याबरोबर ' आंधळ्याची शाळा ' या नाटकाच्या दौऱ्यावर मी होतों. त्या नाट्यकृतींत भावनांची इतकी सूक्ष्म चिकित्सा झाली आहे, कीं सामान्य प्रेक्षकांस तें अवगत

नाहीं. अर्थात् त्यांच्या रंजनासाठीं मुळांत नसलेलीं पदं त्यांत भरावीं लागलीं; आणि 'टला ट रीला री' या न्यायानं मी कवि बनलों. विनायकांनीं त्याची थोडी प्रशंसा केली मात्र—कुऱ्हाड हातीं पडतांच वॉशिंग्टन बागेतील वृक्षांवर ती चालवीत सुटला ना ! साहित्याच्या उद्यानांत पदलालित्य करण्याचा मोह मलाहि अनावर झाला आणि माझे मामा रावसा. व्ही. टी. पाटील यांच्या कौतुकाची पाखर लाभतांना तर लेखक होण्याचा हट्ट मला सोडता आला नाहीं.

* * *

साहित्याचा अंतिम हेतु—

पण बालकाला जीवनाचा हेतु कधीं कळला आहे काय ? तरी येवढं खरं, माझ्यासारखा नवतरुण साहित्याचं परिशीलन वास्तवापलीकडील अद्भुतता अनुभवण्यासाठीं क्वचितच करीत असतो. जीवनाचं विशाल दर्शनच त्याला इतकं अपरिचित असतं, कीं त्याला तहान लागते ती पल्लेदार दृष्टीच्या कक्षेतील जीवन जगण्याची—जीवनांत उत्कटता आणि उदात्तता आणण्याची ! प्रस्तुतच्या कथा लिहितांना दृष्टिआडच्या सृष्टिची मनोज्ञता शब्दांत सांठवण्याची कल्पनाहि माझ्या मनांत नव्हती. मात्र तळमळ होती ती एकच—जीवन जगूं पाहाणाऱ्यांची स्मृति शक्य तों ताजी राखण्याची !

साहजीकच, मेघमालेआड लपून खट्याळपणें हंसणाऱ्या विद्युल्लतेच्या हास्यानं उन्मत्त होऊन पिसारा फुलवणाऱ्या मयूराची माझी भूमिका आहे; सकाळ होतांच नेमानं 'उठा, उठा' म्हणणाऱ्या कुक्कुटाची नाहीं. नाहीं तरी, कलेचा निर्भेळ आनंद हा-

सुद्धां जीवनाचाच एक बिनमोल अंश नाहीं काय ? हें दृष्टिआड करणाऱ्यांस मीं स्पष्ट सांगतों, कीं गुलाबपुष्पांचा गुलकंद करण्यापेक्षां तीं वल्लभेच्या विपुल केशभारांत खोंवणंच मला अधिक आवडतं !

* * *

शेवटीं, आभार मानणं औपचारिक वाटलं तरी अगत्याचं आहे; कारण माझे लेखक–मित्र वि. वा. पत्की आणि द. ना. देशपांडे यांच्या आग्रहामुळेंच हा संग्रह प्रसिद्ध होत आहे; तर सी. गो. सरदेसाई यांच्या हौसेमुळें तो वाचनीय झाला आहे. तसंच, नवयुग पिक्चर्सचे कला–दिग्दर्शक श्री. वाटेगांवकर यांचाहि निर्देश करण्यांत मला आनंद वाटतो. त्यांचं ऋण तर मीं हौसेनंच पत्करलं आहे. अर्थात् स्कूल ॲंड कॉलेज बुकस्टॉलचे मालक दा. ना. मोघे यांच्या धाडसी सहकार्यामुळेंच हें सारं घडत आहे आणि श्रीज्ञानेश्वर प्रेसचे मालक श्री. कृ. ह. सहस्रबुद्धे यांच्या तत्परतेमुळें पूर्णता पावत आहे याची कृतज्ञ जाणीव मला चिरंतन राहील.

शारदा मंडळ, कोल्हापूर
१८ जून १९४१

—दिनकर द. पाटील

माझ्या

हृन्मंदिरांतील नंदादीप

**आक्का आणि मामा**

यांना भक्तिपूर्वक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र ................ नों. दि ..................
वि. ................ क्र. ..................

# अपुरी गोष्ट

टक् टक् टक् टक्...

खोलीच्या दाराच्या तावदानावर नखाग्रं वाजलीं, कीं मी मागं वळून पहावं, आणि अपेक्षित स्त्रीची रेखिव छाया दारावर पडलेली मला दिसावी, हा माझा अनुभव अगदीं रोजचा! याला माझं उत्तरहि ठरलेलं असे,

"ये ना, दार उघड."

आणि उगीचच पुढं केलेलं दार हलकेंच उघडून, बनू मग आपले ओले हात पदरानं पुशीत आंत येई! या वेळीं जेवण उरकून झोंपण्यासाठीं ती आपल्या खोलींत जात असायची; पण नवीं–जुनीं साप्ताहिकं चाळीत अकारण माझ्या खोलींत रमायची तिला खोडच जडली होती अलीकडे. आणि तिच्या या संवयीमुळें

माझी भरपूर करमणूक होत असल्यामुळें, तिच्या इतकीच तिची खोडहि मला प्यार वाटूं लागली होती. नाहीं तरी एखादी व्यक्ति आपल्याला आवडूं लागली, कीं तिच्या गुणांपेक्षां दुर्गुणच आपल्याला जास्त कौतुकास्पद वाटत नाहींत कां ? व्यवस्थित बसलेले माझे केंस विस्कटण्याची खोड तिला इतकी अनिवार अशी जडली आहे, कीं कधीं कधीं मला तो तिचा एक दुर्गुणच वाटतो. पण कां कोण जाणे, जेव्हां जेव्हां ती माझे केस बोटाच्या टिचकीनं उगीचच विस्कटते, तेव्हांच ती मला फार फार आवडते.

आणि तीहि आंत येतांच चकार शब्द न काढतां, इतस्ततः पसरलेलीं साप्ताहिकं चाळून, कॉटवरची चादर उलटीसुलटी करून एखादं दैनिक आहे कां तें पाहते; आणि मग खुर्चीच्या पाठीशीं रेलून, नकळत माझ्या केंसाशीं खेळत हंसते,

"रागवा, तुम्हांला हें आवडत नाहीं ना? मग रागवा ना माझ्यावर !"

आणि यावर माझं रागावणं तर राहतं बाजूलाच; पण तिच्या या अल्लड स्वभावाचं कौतुक करीत हळूं हळूं मी झोपीं जातों.

पण आज मी जरा निराळ्याच कामांत होतों. नित्याप्रमाणं दार वाजताच तिला मी बोलावलं, ती आली, आणि सारीं साप्ताहिकं चाळून तिनं माझा भांग मोडला, हें सारं खरं; पण यांपैकीं एकाचंहि मला अवधान नव्हतं! टेबलाजवळ बसून माझ्या कांहीं पत्रांचे रफ् नमुने व माझ्या बहिणीचीं कांहीं पत्रं यांचं केलेलं टांचण वाचण्यांत मीं रंगून गेलों होतों! आपल्याकडे माझं लक्ष नाहीं, याचा तिला राग आला असावा; कारण तीं पत्रं हिसक्यानं माझ्या हातून घेऊन, कॉटवर बसत ती उद्गारली,

ग्रंथालय नों. दि. ३०१३

" काय वाचताहात येवढं ? "

" एक सुन्दर गोष्ट आहे ती ! "

" कुणाची ? तुमची ? "

" अंऽहं ! "

" मग— ? "

" आम्हां दोघांची ! "

" इश्श, कांहीं तरीच ! "

आणि असं म्हणून अकारण मान वेळून, सस्मित मुखानं ती वाचूं लागली,

" उमेश,

... बनू नांवाच्या एका शेजारच्या मुलीशीं तुझी ओळख झाल्याचं रसभरित वर्णन वाचून मला प्रथम चमत्कारिकच वाटलं! पण लगेच पटलं कीं हा दोष आपल्या संस्कृतीचाच आहे. कारण, बहीणभावांना परस्परांच्या प्रेमकहाण्या ऐकूनहि ठाऊक असूं नयेत हीच आपल्या घरची शिकवण नाहीं कां? पण, मित्राशीं ज्या गोष्टींची आपण मनमोकळेपणानं चर्चा करतों, त्याचा नामोच्चारहि घरीं करतां कामा नये, ही रूढी मला घातक वाटते. कारण रक्ताच्या नात्यापेक्षांहि चहापाण्याचे मित्र यामुळें अधिक जिव्हाळ्याचे वाटतात. नाहीं तूंच सांग, आमच्या हिंदु कुटुंबाला जिथं जेवणासाठींच चार मंडळी जमतात अशा खाणावळीचं स्वरूप प्राप्त झालं आहे, याचं कारण दुसरं काय ?

तुझं पत्र वाचून खरोखरीच मला भारी आनंद झाला. जुन्या माणसांना आमचीं पत्रं चमत्कारिक वाटतील. वाटूं देत बापडीं! पण अशीं हृदयाचीं दालनं निःशंकपणे खुलीं करण्यांतच कुटुम्ब-

संस्थेची सर्वांगीण उन्नति आहे, अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.

अशाच पत्रांची वाट पाहणारी

तुझी,
ताई."

* * *

" ताई,

...मागच्या पत्रांत मीं तुला लिहिलं होतं नई कां, शेजारची बनू माझी मैत्रीण झाली म्हणून ? खरंच भारी गोड आहे ग ती ! एकदां कां ती बोलूं लागली, कीं अगदीं वेडं होऊन बघत बसावंसं वाटतं तिच्याकडे. बोलतांना मधें मधें ' ऐका ना गडे ' म्हणण्याची भारी गोड अन् लाडकी खोड आहे तिला. पण जरा कां तिच्याकडे चुकून दुर्लक्ष्य झालं तर मग कांहीं विचारूंच नकोस ! ' मी नाहीं जा ' म्हणून एकदां कां तिच्या गालींच्या कळ्या फुगल्या कीं त्या फुलवतां फुलवतां नाकीं नव येतात माझ्या !

प्रथम प्रथम माझ्या खोलींत यायला किती भ्यायची ती ! पण परवां झाली अशीच गंमत—मी 'चित्रा' नेहमीं वाचतों ना ? अर्थातच तिच्या वडिलांनाहि तिचं व्यसन जडलं माझ्यामुळें. दर सोमवारीं स्वारी हजर,

" काय म्हणते चित्रा ? "

पण परवां ते होते आजारी. तेव्हां 'चित्रा' मागायला ते आले नाहींत. कॉलेजहून आल्यावर चहा करतांना मला वाटलं, कीं द्यावी नेऊन 'चित्रा'! पण स्टोव्ह विझवायच्या वेळींच बनू हजर,

" चित्रा मागितलीय ! "

चहा गाळीत मी हंसलों,

"कुणीं ?"

पदराशीं खेळत तीहि हंसली,

"ठाऊक नाहीं वाटतं ?"

"हो, आहे ठाऊक ! बनू नई कां आपलं नांव ?"

"इश्श, मीं नव्हे ! आबानीं—"

"मग त्या कीं—"

"घ्याना तुम्हींच; मी नाहीं येत आंत !"

"मग जा—मिळणार नाहीं."

"पहा हं. सांगेन आबांना."

"पण त्यांनीं कारण विचारलं तर ?"

कित्ती गोंधळली ती यावर ! मी हंसलों,

"तर म्हणावं, त्यांनीं चहाला आंत बोलावलं पण मी गेलें नाहीं, आणि म्हणून त्यांनीं दिली नाहीं—कळलं ?"

अर्थात्, 'चित्रा' बरोबर चहाहि घेऊन ती गेली हें निराळं सांगणं नकोच !......

तुझा,

उमेश."

* * *

"ताई,

तुझं कालचं पत्र वाचलं अन् स्वतःशींच म्हणालों,

"आईचं हृदय वेडं रे वेडं !"

आतां खाणावळींत जेवायाला लागतं म्हणून आईला काळजी वाटणं साहजिक आहे. पण तुला म्हणूनच सांगतों, अगदीं घरच्या

सारखा आहे मी इथं! सणादिवशीं घांस घेतांना तुम्हां सर्वांना माझी आठवण होते आणि मला कां ती होत नाहीं? पण म्हणून परकेपणा कसा तो वाटतच नाहीं मुळीं! तूं रागवशील, कीं खाणा-वळींतलं अन्न मला घरच्याइतकंच रुचकर लागूं लागलं म्हणून. पण आहे तें सारं निराळंच! कालचीच गंमत सांगतों—

आज सुट्टी आहे ना? अर्थातच, काल जेवण होतांच रात्रीं खाणावळीचे मालक म्हणाले,

"अहो उमेश, उद्यां फीस्टला यायलाच पाहिजे बरं कां?"

पण, सुपारी तोंडांत टाकीत मी हंसलों,

"Sorry!"

तुलाहि आश्चर्य वाटेल, कीं नेमकी फीस्टच मी कशी चुकवतों? पण खरं सांगूं, प्रत्येक सणाला बनू म्हणते,

"आज जेवलं पाहिजे बरं कां इथंच?"

"पण उद्यां फीस्ट आहे आमची."

"हो, पण इथलं तिथं नाहीं."

"काय?"

"मी वाढणार आहे सर्वांना."

आणि लज्जारक्त मुखांतून बाहेर पडणाऱ्या या बिनतोड उत्त-राला काय प्रत्युत्तर द्यावं, हेंच मला कळत नाहीं. पण माझी ही संकोचावस्था तिला कळत नाहीं असं नाहीं. आसपास कोणी नाहीं असं पाहून, माझ्या केसांच्या झुपक्याशीं खेळत ती हळूंच हंसते,

"आईनंच सांगितलंय मला—"

"काय?"

आणि असं म्हणून मी हंसतांच ती स्मितहास्यानंच त्याचं उत्तर देते......

तुझा

उमेश. "

* * *

" उमेश,

...तुझं पत्र वाचतांना मला वाटलं, कीं प्रो. फडक्यांच्या एखाद्या गोष्टीचं हस्तलिखित तर मी वाचीत नाहीं ना ! पण बरोबर आहे, प्रेमाच्या स्फूर्तीनं काय होणार नाहीं ?

पण सांभाळ हं ! आजच्या प्रेमकथा वाचल्या कीं प्रेमाचा प्रवाह आडवळणांनीं वहावा, किंवा पूर्तीच्या सागराला मिळण्या-आधींच तो निराशेच्या वाळवंटांत अदृश्य व्हावा हा सिद्धांत जणूं गृहीत धरूनच त्या लिहिल्या जातात असा समज होतो वाचकाचा. किंवा कोण जाणे, हा जगाचा कटु अनुभवहि असेल कदाचित् !

कांहीं असो, तुझा अनुभव याला अपवाद ठरेल असा भरंवसा वाटतो. कारण, कालच आईनं विषय काढला तेव्हां अण्णा म्हणाले,

" तो काय म्हणेल तें खरं ! !... "

तुझी,

ताई "

* * *

" ताई,

'तिकडे बरंच मोठं वादळ माजलं असेल म्हणून मी एका गोष्टीचा तुला उल्लेखहि केला नाहीं. वाटत होतं, कीं तुझ्याकडूनच त्याची खबर येईल. पण अजुनी कांहींच न कळल्यामुळें मला समाधान वाटतं, कीं अण्णांचा राग पार ओसरला असावा म्हणून !

तुला ठाऊकच आहे, परवां अण्णा इकडे आले होते तें! कां कळलं कां? त्यांनीं सांगितलेल्या एका मुलीशीं लग्न करण्याचं मी नाकारलं ना, तेव्हां त्याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठीं ते आले होते.

बराच वादविवाद झाला आमचा इथं!

आजपर्यंत आज्ञाधारक म्हणून नांवाजलेला मी बापाशीं इतका वाद करतों, याचं त्यांना विलक्षण आश्चर्य वाटलं; आणि तशांतच रोषाचा दीर्घ निःश्वास सोडून त्यांनीं सभोंवतीं पाहिलं, तेव्हां तर पुनः त्यांना कमालीचं नवल वाटलं!

माझी खोली पाहून ते थक्कच झाले. ती विद्यार्थ्यांची नसावी असंच त्यांना वाटलं! कारण, एका टेबलावर व्यवस्थित मांडलेलीं तीं पुस्तकं, जवळच दुसऱ्यावरील ती ताज्या फुलांची फुलदाणी आणि एकाच आकाराच्या चौकटीचीं भिंतीवरील विविध स्त्रीपुरुषांचीं छायाचित्रं पाहून ते सर्दच झाले. खिडक्यादारांना गुलाबी पडदे हेलकावत असून, त्यांतून गॅलरींतले नटनटींचे फोटो दिसत होते. एका छोट्या टेबलावर विणलेला शुभ्र रुमाल टाकला असून, कोपऱ्यांत कागदी फुलं मोठ्या कुशलतेनं रचलीं होतीं. कां कोण जाणे, त्यांनीं मला गंभीर स्वरांतच म्हटलं,

" कुणाची रे ही कलाकृति?"

आणि याच वेळीं चहाचे दोन पेले घेऊन बनू मंद पावलं टाकीत आंत आली.

अण्णांना आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळालं असावं. कारण, ती निघून गेली तरी ते कांहींच बोलले नाहींत.

मात्र चहा घेतांना माझ्या मनांत सारखे विचार घोळत होते. ही सारी कलाकृति बनूचीच नव्हती कां? या साऱ्या कला ती केव्हां आणि कुठं शिकली हें मला ठाऊक नाहीं. पण त्यांचा विनियोग तिनं

माझी खोली शृंगारण्यांत करावा ही केवढी माझी थोरवी! शिवाय, कुणीं न सांगतां आण्णा येतांच चहा आणण्यांत तिनं माझ्या माणसाविषयीं केवढी आपुलकी दाखवली होती. गोष्टी साध्याच असतात, पण त्याच माणसाची पारख करतात! म्हणजे, हळूंहळूं बनू माझ्याशीं एकजीव होऊं पाहते आहे, हेंच नाहीं कां स्पष्ट होत यानं?

ताई, आण्णांना नक्की काय वाटलं तें मला कळलंच नाहीं—पण त्यांना दिलेल्या नकारांत प्रेमाच्या हांकेला ओ देण्याची माणुसकी मी दाखवीत आहे, येवढं तरी निदान तूं म्हणशील?

तुझा,
**उमेश** ”

इतकं वाचून होतांच तिनं सस्मित माझ्याकडे पाहिलं. मात्र खोडकर डोळ्यांत थोडासा गंभीरपणा दिसत होता. तो घालवण्यासाठीं मी हंसलों,

“ कशी आहे गोष्ट? ”

“ पण अपुरीच आहे कीं! ”

“ हो, पण पुरी करणार ना तूं? ”

“ चला! ”

असं म्हणून हंसतच हातांतले कागद तिनं माझ्या अंगावर फेंकले! आणि—मी——

पण गोष्ट लांबत चालली. शिवाय, आजच्या अश्लीलतेच्या वादांत भर घालण्याचा मोह आतां आंवरलाच पाहिजे. कारण, त्या वेडाचारांत मला भाग घ्यायचा नाहीं. सोंवळा म्हणून नव्हे—तर—

चोरीपेक्षां चोरीची कबूलीच शिक्षेला कारणीभूत होते, होय ना?

———

# घराबाहेर

ठण्ऽऽ!

घड्याळाचा एकच ठोका पडला. सुशिलाबाईंनीं दचकून घड्याळाकडे पाहिलं. त्या प्रशस्त खोलीला मंदसा प्रकाश पुरवणाऱ्या विजेच्या दिव्याखालींच कर्तव्य बजावल्याच्या समाधानांत घड्याळ 'टक् टक्' करीत होतं. मात्र सुशिलाबाईंचं असमाधान यानं भडकून आलं. पलंगावरल्या उबदार लठ्ठ उशींत तोंड लपवून त्या रडूं लागल्या. काय होणार कांहींच कळेना त्यांना. दिङ्मूढावस्थेंत कर्तव्याची दिशाहि त्यांना सांपडेना.

आपल्या पतिराजांना कामाच्या ऐन धांदलींत जेवणाचीहि शुद्धि नसते, हा त्यांचा अनुभव कांहीं नवीन नव्हता. अशा वेळीं बहुदां बाजाराप्रमाणं खच्चून भरलेला दिवाणखाना मोकळा झाला, कीं

अंग चोरून सुशिलाबाई नानासाहेबांपाशीं जात; आणि टेबला-वरील कागदांच्या ढिगाऱ्यांतून नानांनीं लक्ष काढून, नाकावरील चष्मा पुसण्यासाठीं खुर्चीच्या पाठीशीं क्षणभर अंग टेकलं, कीं मगच त्या मोठ्या धिटाईनं पुढं होत; आणि अगदीं हलक्या आवाजांत म्हणत,

" ऐकलं कां ! म्हटलं, भाताच्या गारगोट्या झाल्या सगळ्या."

पुत्राबद्दलचा वात्सल्याविष्कारहि अगदीं ठरलेला होता त्यांचा. जिन्यांतून दोन तीनदां हांक मारूनहि दीनार खालीं आला नाहीं, म्हणजे त्या आपणहून वरती जात; आणि पलंगावर पडून मऊ मऊ उशीच्या कोंपऱ्याशीं अकारण चाळा करणाऱ्या आपल्या लाडक्या दीनारच्या सुगंधी केशकलापांत डाव्या हाताचीं बोटं रुत-वून त्या म्हणायच्याच,

" कांहीं होतंय कां तुला ? मग अलिकडे जेवणावरचं लक्ष कां उडालंय तुझं ?"

साहजीकच, सुशिलाबाईंना किती किती वाटलं, जाऊन पिता-पुत्रांना जेवणाची दखल द्यावी; भूक नसेल तर आग्रहानं निदान दहीभात तरी चारावा. पण मायेचं हें उधाण वाहू देण्याचं धैर्य त्यांना कांहीं केल्या होईना. मांजराच्या पावलांनीं अनेकदां त्या दिवाणखाण्याच्या दारापर्यंत गेल्या असतील; पण हातांतल्या मासि-काच्या ताज्या अंकाचीं पानं नाना इतक्या त्वेषानं उलटीत होते, कीं त्यांची ती असहाय्य फडफड म्हणजे आपल्या हृदयाचीं धड-धडच वाटली त्यांना ! कागदाचीं पानं फाडल्याप्रमाणं नाना भेटेल त्या माणसाची दुर्दशा करतील, ही एकच भीति त्यांना हतबल करीत होती.

तर, दीनारच्या खोलींत जाण्याच्या नुसत्या कल्पनेनंच त्यांच्या मातृहृदयाचं पाणीपाणी होई ! नेहमीं त्याची खोली कशी झुंबराच्या झगझगीत प्रकाशांत प्रफुल्ल दिसायची; आणि खिडक्यांच्या उंची पडद्यांमधून बाहेर पडणाऱ्या शांता हुबळीकरच्या सुकोमल स्वर-शलाका कर्णरंध्रांतून हृदयाला भिडायच्याच—

" मज फिरफिरुनीऽऽ छळिशी कांऽऽऽ? "

पण आज मात्र त्या खोलींत जणुं विश्वांतला भयाण अंधःकार कोंदटला होता. आणि त्यांतूनहि दीनारच्या हृदयाचा छळ सुशिलाबाईंना स्पष्ट दिसत होता. हजारदां त्या नकळत दारापर्यंत गेल्या असतील; पण लगेच त्या व्याकुळ अंतःकरणानं परत फिरत. दार उघडतांच पोराची "आई" अशी केंविलवाणी हांक कानीं आली, किंवा पोटच्या गोळ्याची गळलेली मान आधारासाठीं आपल्या स्कंधावर विसांवली, तर मुलाचं सांत्वन आपण कोणत्या शब्दानं करणार, हेंच त्यांना उमजत नव्हतं.

तिळतिळ तुटणारं अंतःकरण लपवून ठेवण्याची पाळी आली, कीं माणसाला होणाऱ्या वेदना असह्य असतात. पण त्यापेक्षांहि आपले पतिपुत्र उपाशी पोटींच रात्रभर एकटे तळमळणार, या कल्पनेचं दुःख सुशिलाबाईंना तीव्रतम वाटलं. ठोका पडतांच त्यांनीं घड्याळाकडे पाहिलं, तें याच व्याकुळतेनं! त्यांना भडभडून आलं. नेत्रांवाटे त्यांच्या भावना खळखळूं लागल्या.

याच वेळीं नेमकी खिडकीचं दार उघडून वाऱ्याची एक थंडगार झुळुक आंत आली. पण तिनं त्यांचा हृदयदाह शांत करण्याऐवजीं, दूध उतूं गेल्याची दुर्गंधी मात्र साऱ्या खोलीभर पसरवली.

* * *

किती तरी वेळ सुशिलाबाई याच विमनस्क अवस्थेत होत्या. शेवटीं शेवटीं कुठं जखमांनीं माणसाला मूर्छा यावी, तशी झोंपेची छाया त्यांच्या मुखावर तरळूं लागली. पण जखम जिव्हारीं झोंबली कीं भणभर बेशुद्धीहि नाहींशी झाल्याप्रमाणं अनेकदां त्यांची झोंप-मोड होई; आणि ज्या दुःसह स्वप्नभंगानं त्या जाग्या होत तो प्रसंग जागतेपणींहि त्यांना पडद्यावरील चित्रांप्रमाणं क्रमवार दिसूं लागे.

त्याचं असं झालं होतं. जेवणाच्या खोलींत सुशिलाबाई ताटांची तयारी करीत होत्या. त्याच वेळीं नाना, बुटांचा खाड् खाड् असा तालबद्ध आवाज काढीत, कपडे करूनच, जेवायला आले. येरवीं त्यांच्या अशा येण्याचं सुशिलाईंना भयच वाटलं असतं. पण गडबडींत असूनहि नाना आज खुषींत दिसले. अगदीं हंसतमुखानं हातांतलं पत्र ते वाचीत होते. हें पाहून सुशिलाबाईंना जितकं नवल, तितकाच आनंदहि वाटला. त्या धिटाईनं कांहीं तरी विनोद करणार; पण त्याआधींच हातांतलं पत्र पँटच्या खिशांत कोंबीत नाना म्हणाले,

"दीनार जेवला कां ग?"

सुशिलाबाईंनीं हंसतच विचारलं,

"कां, आजच बरं मुलाची माया वाटली?"

"माया कांहीं नाहीं; पण तुझी दया वाटली खरी!"

"म्हणजे?"

जेवणाच्या टेबलापाशीं खुर्ची ओढीत नाना हंसले,

"अगऽ, तुला सून हवी होती ना?"

आपण स्वप्नांत तर नाहीं ना, असा विभ्रम सुशिलाबाईंना झाला. तो दूर करण्यासाठींच जणुं त्या आपणहून दीनारला घेऊन आल्या.

त्या अवधींत स्वैपाक्यानं तीन ताटं पांढऱ्याशुभ्र रुमालानं आच्छादलेल्या टेबलावर व्यवस्थित मांडलीं होतीं.

सर्वांनीं एकत्र जेवण्याचा प्रसंग मोठ्या आनंदाचा असतो, याची प्रतीति दीनारला होती. पण मुकेपणानं सूचित होणारं सुख आज आपल्या प्रथमच वांट्यास येत आहे, असं त्याला वाटलं. मातेच्या कौतुकगर्भ कटाक्षांनीं तर तो विरघळून गेला. आणि म्हणूनच, टेबलाच्या मध्यभागीं ठेवलेल्या फुलदाणींतील ताज्या सुमनगुच्छाशीं त्याचा अकारण चाळा सुरू झाला. जेव्हां नोकरानं त्याच्या कांचेच्या प्याल्यांत पाणी ओतलं, तेव्हांची ती शांतताभंग करणारी खळखळ ऐकून त्याला खरंच किती हलकं हलकं वाटलं. आणि दीर्घ निःश्वास सोडल्यानंतर कुठं त्याच्या लक्षांत आलं, कीं अवघी खोली कशी खमंग मासाहारी पदार्थांच्या दर्पानं अगदीं दरवळून गेली आहे. मुलाची ही गोंधळलेली अवस्था पाहून, प्रसन्न चित्तानं नानांनीं विषयारंभ केला,

" पुण्याचे डॉ. मोहिते माहीत आहेत कां तुला ? "

" परवां इथं आले होते तेच ना ? "

" हो, विसरलोंच कीं ! मला वाटतं, त्यांची मुलगी यंदाच मॅट्रिक पास झालीय्, नाहीं ? "

हा प्रश्न ऐकून दीनार केवढ्यांदां चमकला ! वर्षाकांठीं फीसाठीं नोटांची पुडकीं मोजतांना प्रोफेसरांचीहि चौकशी न करणारे नाना ' पूना फेम ' पोरीची स्वतःच्या पोराशीं चर्चा करतात, याचा अर्थ काय ? मुलाचा हा गोंधळ सुशिलाबाईंच्या ध्यानीं आला. गरम रस्याच्या वाटींतील अंडें चमच्यानं मुलाच्या ताटांत काढून देत त्या हंसल्या,

" सांग ना—"

आणि तेव्हां कुठं दीनारच्या सारं ध्यानांत आलं. तो एकदम लाजला अन् गंभीर झाला.

पण हा गंभीरपणा नानांना तितकासा रुचला नाहीं. कारण, आपल्या भाषणानं मुलगा फार तर नुसता लाजेल अशीच त्यांची कल्पना—आणि इच्छा पण होती. ती विफल होतांच त्यांच्या मुद्रेवरचा मोकळेपणा क्षणांत अदृश्य झालेला सुशिलाबाईंच्या चटकन् लक्षांत आला. मुलाच्या अवनत मुखावर दृष्टि रोखून नाना बोलूं लागले,

" हें बघ, उद्यां तूं बी. ए. होणार. तेव्हां आतां हळुंहळुं तूं रांकेला लागावंस हें बरं नाहीं कां ? तुला हें सवडीनंच बोलण्याचा माझा विचार होता. पण आतांच मला मोहित्यांचं पत्र आलंय्. आपल्या इंदूबद्दल त्यांनीं—-"

पुढील शब्द मुलाच्या चाणाक्षपणावर विसंबून नानांनीं सोडून दिले. त्यावर विनयपूर्ण असं संदिग्ध उत्तर देण्याचाच दीनारचा मानस होता. परंतु, मुलीची वाच्यता झाल्यावर मुलानंहि असंदिग्ध राहाणं त्याला उचित वाटलं. तो म्हणाला,

" तुमच्या इच्छेप्रमाणं वागतांना खरंच नाना, मला मोठी धन्यता वाटली असती—"

" म्हणजे ! "

नानांच्या या उद्गाराची, कां कुणास ठाऊक, सुशिलाबाईंना भीति वाटली. त्यांचं अंग शहारलं ! तोंडावरचं हास्य लोपून लाचारता तिथं दिसूं लागली. दीनारच्या हें ध्यानीं आलं. पण तरीहि तो शांतपणें म्हणाला,

" क्षमा करा, माझ्या प्रेमाबद्दल आपण अज्ञानी आहात ! "

तेव्हां नकळत प्रश्नार्थक भाव नानांच्या मुखावर उमटला; आणि अनेक विकारांच्या विविध छाया तेथें क्रमवार पसरूं लागल्या. तिकडे दुर्लक्ष्य करून दीनारनं म्हटलं,

" कुसुमशीं लग्न करण्याचा माझा संकल्प आहे. "

आणि स्फोटक द्रव्यांनीं पेट घेतल्याप्रमाणं नाना उद्गारले,

" कोण, कुसुम ? "

मौनानंच त्याला दीनारनं होकार सुचवला.

" इथं नेहमीं येते ती ? " नानांचा आवाज चढला होता. हातांतला घांस ताटांत झाडून ते उद्गारले, " माझी सून होण्याला ती अपात्र आहे. "

" कां ? "

" असल्या छप्पन्न पोरी मी विकत घेईन ! "

दीनार स्तंभितच झाला. थोडा वेळ जाऊं देऊन तो उत्तरला,

" सून बापानं विकत घ्यायची नसते; मुलानं जिंकायची असते ती ! "

" होय ना ? " बंदुकीच्या गोळीप्रमाणं नानांचा शब्दन् शब्द खणखणत होता, " मग दरिद्री पोर जिंकण्यांत कसला आलाय् पराक्रम ? असेल हिंमत तर श्रीमंताची पोरगी धरून दाखव. "

नानांचं हें आव्हान ऐकून दीनारपेक्षां सुशिलाबाईच भेदरून गेल्या. मुलाचं उत्तर ऐकण्यासाठीं त्यांचे प्राण कर्णरंध्रांत जमा झाले. आणि भयप्रद मेघगर्जनेनंतर शीतल वारितुषार देहाला सुखद वाटावेत, तसे मुलानं शांतपणें उच्चारलेले शब्द त्यांच्या कानीं आले—

" प्रेमाची दौलत रुपयआण्यांनीं मोजायची नसते. हृदयाचं माप त्यासाठीं दिलंय् देवानं ! "

" दीनार—! "

तापल्या तेलांत जलबिंदु सांडल्याची ही कडकड होती. दांतओठ खात नाना चरफडले,

" हृदय ! बाजारांत चमड्याला किंमत येते; हृदयाला नाहीं. "

" पण बाजार मांडण्याआधीं शील सोडावं लागतं, नाना. "

" म्हणून कांहीं जगाचा बाजार कुणाला चुकला नाहीं. आणि बाजारांत भाव बघतात; शील पाहात नाहींत कुणी. "

" पण चमडीच्या चोंचल्यासाठीं हृदयाचा लिलांव बोलायला माझी तयारी नाहीं. "

" तुला तो बोलावा लागेल. " नानांना निर्धाराचा मार्गच सोयीचा वाटला. ते म्हणाले, " तुला स्पष्ट बजावतों दीनार, माझा शब्द गुंतला आहे, त्याला इलाज नाहीं. "

" पण शब्दापेक्षां शपथेची किंमत— "

" चूप ! "

नानांना दीनारचं ऐकायचंच नव्हतं. ते त्याला अडवून म्हणाले, " कसली आलीय् शपथ ? बोहल्यावरसुद्धां लग्नं मोडतात. "

पण त्या लग्नाविषयींची चीड अव्यक्त ठेवणं दीनारलाहि अशक्य झालं. क्षणभर आपलं पितापुत्राचं नातं विसरून तो उद्गारला,

" पैसाप्रतिष्ठेसाठीं आईबापांनीं जमवलेलीं असतात तीं लग्नं ! पण प्रेमासाठीं अधीर झालेले जीव तोडणं एका मृत्यूखेरीज इतर कुणालाच शक्य नाहीं. "।

मुलाचा हा निर्धार ऐकून मात्र नाना देहभान विसरले. ताड-कन् त्याचं थोबाड रंगवून ते कडाडले,

" प्रेम–! बसून खायला मिळालं कीं निजून प्रेम सुचतं ! पण मला माहीत आहे, पोटाची आग भडकली कीं प्रेमाची चित

आपोआप घडघडतें. आणि तेंच मी पाहीन. फिरून ऐक दीनार, माझं अन्न खाणाऱ्यानं माझी आज्ञा पाळलीच पाहिजे."

बापाचे हे उद्गार ऐकून मात्र दीनार हतबल झाला. प्रेम-निष्ठेच्या बांधाआड लपलेले वात्सल्याचे प्रवाह त्याचे उफाळून आले. हुंदका न आंवरून त्याच्या मुखावाटे शब्द फुटले,

" नका नाना, झाल्या उपकाराची वाच्यता करूं नका. चिरडून मारण्यासाठीं कां बाप मुलावर उपकाराचीं ओझीं रचतो ? "

पण हें ऐकायला नाना तेथें हजर नव्हतेच. टेबलावर मस्तक टाकलं तेव्हां बुटांच्या खाड् खाड् आवाजाबरोबर निर्वाणीचे शब्दच काय ते त्याच्या कानीं आदळले,

" उद्यां सकाळच्या आंत मला माझं उत्तर मिळालं पाहिजे. "

पण त्यापेक्षांहि आईचा हुंदका ऐकूनच आपला दुःखावेग आंवरण्याचा संयम दीनारला राखता आला नाहीं.

* * *

हाच तो प्रसंग कीं, ज्यानं तीन जिवांच्या तीन दिशा झाल्यां; पण बापलेकापेक्षां सुशिलाबाईची अवस्था यानं अधिक केविलवाणी झाली. आंधळं प्रेम करणाऱ्याचेच हृदयक्लेश मरणप्राय असतात. त्यांना सारखं वाटूं लागलं, कीं कुडींतून आपला प्राण तात्काळ निघून जाईल तर किती बरं होईल. पण मरणापेक्षांहि जगण्याचे क्लेश अधिक असतात याची अनुभूति घेण्यासाठींच जणुं त्यांचा प्राण देहांत तळमळत होता.

या असहाय्य धडपडीनं किती तरी वेळानं त्यांना जोराची ग्लानी आली. पण 'सुशील' या हांकेनं त्या पुनः भानावर आल्याच.

नाना त्यांच्या शेजारीं उभे होते. क्षणभर त्यांचा विश्वासच बसेना. अवघ्या विश्वांतली दयार्द्रता त्यांच्या डोळ्यांत डबडबली होती. तसा कटु अनुभवाचा कणखरपणाहि त्यांच्या चेहऱ्यावर होता. आणि मानवी दौर्बल्याची शिथिलता तर त्यांच्या मांसलतेंत उतरली होती. पण पायाळु माणसाला पाषाणांतहि पाणी दिसतं; स्त्रीहृदयालाच पुरुषाच्या कठोरतेंतील मार्दवाचा थांग लागतो कीं काय कुणास ठाऊक !

पतीला पाहातांच पदर सांवरून सुशिलाबाई उठून बसल्या. तेव्हां त्यांचे दोन्ही स्कंध आपल्या हातांनीं घट्ट धरून नाना गंहिवरले,

" झोंप आली नाहीं अजून ? "

" येईल आतां. "

सुशिलाबाईंचं लक्ष नव्हतं. नाहीं तर त्यांच्या या उत्तराबरोबर विषादाची सांद्र छाया नानांच्या सांवळ्या मुखावरहि पसरलेली त्यांना स्पष्ट दिसली असती. कारण, आपण रागांत असलों कीं सर्वांनाच आपला दरारा वाटतो, याचा येरवीं त्यांना कितीहि अभिमान वाटत असला, तरी त्याची झळ घरीं पत्नीलाहि लागावी, याचं त्यांना कधीं कधीं विलक्षण दुःख वाटे. दरारा परक्यासाठीं असतो. घरच्या माणसांनाहि त्याची बाधा व्हावी यांत आपुलकी काय उरली ?

वस्तुतः, त्या आपुलकीच्या भरंवशानंच पोरानं आपला प्रेमाविष्कार केला नव्हता कां ? आंतड्याच्या आंधळेपणानं आईनं तर त्याला आपली मुकी संमति दिलीहि होती. पण प्रश्न पडला कुळाच्या प्रतिष्ठेचा ! कुळाच्या वैभवाच्या नौबती झडण्याची संधि चालून

येत असतां, पोरानं प्रेमाची टिमकी वाजवण्याचा हट्ट धरावा, हा वेडाचार आंधळ्या डोळ्यांनीं कां पाह्यचा ?

आणि म्हणूनच, कर्तव्य बजावतांना सारी माया नाना हृदयाच्या खोल गाभाऱ्यांत कुठं तरी दाबून ठेवीत. पण एकांतीं ती प्रकट झाल्यावांचून मात्र राहात नसे. सुशिलाबाईंच्या शेजारीं बसत ते म्हणाले,

" खरं सांग, भीति वाटली तुला माझी ? "

जमिनीवर पसरलेल्या जाजमावर पायाच्या आंगठ्यानं रेघोट्या मारीत सुशिलाबाईंनीं फक्त नकारार्थी मान हालवली.

पत्नीचा हा औपचार नानांच्या परिचयाचा होता. सुशिलाबाईंचा तळहात आपल्या दोन्हीं तळहातीं घट्ट धरून नाना गहिंवरले,

" मग सांग ना, मला तूं जेवायला कां बोलवलं नाहींस ? "

आणि सुशिलाबाईंच्या डोळ्यांनीं धरबंद सोडला. आपला तळहात सोडवून घेण्याचा त्या प्रयत्न करूं लागल्या. तेव्हां तर तो अधिकच घट्ट दाबून नानांनीं म्हटलं,

" थांब, आज मला जेवायचंच नाहीं. दीनार कुठं जेवला आहे ! "

सुशिलाबाईंच्या डोळ्यांवाटे घळघळा अश्रू वाहूं लागले. ते त्यांच्याच पदरानं टिपीत नाना बोलूं लागले,

" तुला वाटतं, मी नुसता ताड्ताड् बोलतच असतों. प्रेमाचा पाझर माझ्या काळजाला नाहीं. पण सुशील, दिवसादिवसांनीं वाढणारा माझा दीनार ! माझ्या आशेची एकुलती एक तांत आहे ती ! तो चुकत असल्याच्या कल्पनेनं मी ती छेडीत असलों, तरी ती तुटेपर्यंत ताणीन असं कां वाटतं तुला ? मला कां तो नको आहे ?

सांग सुशील, उभ्या आयुष्यांत अनुभवास आलेले क्लेश मीं कुणासाठीं सहन केले? आणि मरणप्राय मानखंडना साहूनहि मी कुणासाठीं जगतों आहे? विश्वाच्या अफाट माळरानावर पोटचा गोळा पोरका पडूं नये, म्हणूनच ना? त्याचीं आजचीं सुखस्वप्नं मी चुरडून टाकीत आहे. पण त्याचा मला आनंद कां वाटतो? तूंच सांग, जगाच्या बाजारांत तो उद्यां कवडीमोलाचा ठरला तर त्याचं दुःख तुला मला सहन तरी करवेल कां?"

नानांना अधिक बोलवेना. दीर्घ उसासा सोडून ते स्तब्ध झाले, तों आपला ऊर पत्नीच्या अश्रूंनीं भिजून गेल्याचं त्यांना आढळून आलं. तो क्षण त्यांना अमर वाटला.

* * *

ते दोन प्रेमी जीव निद्रावश कधीं झाले कुणास ठाऊक! पण त्यांना जाग आली ती नेहमींपेक्षां किती तरी लवकर आणि अगदीं अनपेक्षित रीतीनं! कारण--

खोलीच्या दारावर सारखी जोराची थाप होत होती. नानांनीं जागं होऊन पाहिलं, खिडकींतून नेहमीं निरभ्र दिसणारं आकाश कसं ढगाळून आलं होतं. त्रस्तपणानंच नानांनीं दार उघडलं, तेव्हां दार वडवणारा घरचा नोकर घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला,

"सा-सा-साब, दादासाब खो-खोलींत न्हाइती!"

"काय!"

आणि वेड्यासारखं धांवतच नाना जिना चढून माडीवर गेले. सुशिलाबाईहि पाठोपाठ धांवल्या. दार उघडंच पडलं होतं. आणि समोरच पलंगावर चादर विस्कटलेली होती. सुशिलाबाईंनीं केवढ्या अधीरतेनं ती बाजूस सारून पाहिलं. दीनार झोपला

नव्हता. दीनार खोलींत नव्हता. टेबलावरचा त्याचा फोटो पाहतांच मात्र, देहांतून प्राण निघून गेल्यासारखं वाटलं त्या उभयतांना !

नाहीं म्हणायला, उशीवरच एक पाकीट पडलेलं होतं. मायेचा सारा वर्षाव करण्यासाठीं जणुं नानांनीं तें हातीं घेतलं. सुशिलाबाई प्राण नेत्रांत आणून पतीचे भाव न्याहाळूं लागल्या. आणि पतीचा चेहरा पडला मात्र—

"कुठं गेला माझा दीनार?" म्हणून त्या मटकन् कॉटवर बसल्या. त्यांच्या हातीं तें पत्र देत नानांनीं खुर्चीत अंग टाकलं. आर्त स्वरानं ते अर्धवट स्वतःशींच म्हणाले,

"पोरानं बापाला ओळखलं नाहीं, सुशील!"

सुशिलाबाई तें पत्र वाचूं लागल्या. दीनारनं लिहिलं होतं—

"तीर्थरूप नानांचे सेवेशीं,

मी कुठं तरी दूर दूर जात आहे, कीं जिथं प्रतिष्ठेला प्रामाणिकपणाची किंमत द्यावी लागणार नाहीं; निदान बापाची प्रतिष्ठा वारसाहक्कानं मुलाला मिळणार नाहीं. कारण, थोरांच्या पोटीं जन्माला येणं येवढीच ज्यांची कर्तबगारी, अशांना मोठेपणाची ओळखहि बहुदां नसते. उलट मोठेपणाच्या खोट्या कल्पनांनीं माणुसकीच्या मार्गावर नसतीं विघ्नं मात्र ते निर्माण करतात.

येवढं एक पातक तरी निदान माझ्या हातून घडूं नये, म्हणून मी घराबाहेर जात आहे. असं करतांना आईच्या भोळ्या जिवाची हत्या मी करीत आहे, येवढंच एक दुःख मला हतबल करतं. पण विचारांतीं वाटतं, माणसांपेक्षां तत्त्वं मोठीं असतात. रक्तामांसाचा चिखल सांडल्याखेरीज

राज्यक्रांति नाहीं; मग श्रद्धेचा बळी दिल्याखेरीज विचार-क्रांति तरी कुठली ?

घराबाहेर मी कोणत्या मोलानं जगेन कुणास ठाऊक ! कदाचित् माझं पोट मला मारावंहि लागेल. पण मन मारून देह जगवण्यापेक्षां, देह मारून मन जगवणं मला मानाचं वाटतं.

क्षमा करा, पण एक कठोर सत्य मी नव्यानंच शिकलों आहे. आपुलकी असते तोंपर्यंतच अन्न हें अमृत असतं. परकेपणा उत्पन्न झाला, कीं विष होतं त्याचं. आणि अन्नाचं हालाहल मोठं चमत्कारिक आहे. अन्नानं देह जगतो, पण मन मरतं; आणि म्हणूनच बापाचा घांसहि प्रसंगीं मुलाला मारक होतो. तेव्हां जिवंत राह्यचं असेल तर बालपणीं हट्टानं खाल्लेला दूधभातदेखील प्रसंगीं मुलानं ओकून टाकायला तयार झालं पाहिजे. कारण, विषसुद्धां पचवता येतं; पण तें परक्याचं-घरचं नाहीं. पुतनामावशीच्याच स्तनावरचा विषलेप कृष्णानं पचवला. पण नाना, यशोदेची किंवा देवकीचीच स्तन्यसुधा विषसंकुल झाली असती तर- ?"

सुशिलाबाईंना पुढं वाचवेना. शक्य नाहीं तें, अशा आविर्भावानंच जणुं त्यांनीं मान झाडली. अश्रूंचा पूर त्यांच्या नेत्रांतून वाहूं लागला. मुलानं त्राग्यानं लिहिलेला मजकूर त्यांना अश्रुजलानं साफ धुऊन काढायचा होता कीं काय कुणास ठाऊक ?

—०—

# देह आणि मन

—एरव्हीं मनुष्य सुखदुःखांच्या साधनांचा जेव्हां विचार करतो तेव्हां खरंच तो किती बारीकसारिक गोष्टीहि लक्षांत घेतो; पण लग्नासारख्या जीवनांतील परिवर्तनक्षणीं मात्र तो जितका अविचार करतो तितका इतर वेळीं क्वचितच करीत असेल! राहायला तिसरा मजला, झोंपायला गुढगाभर गादी, किंवा हिंडाफिरायाला एकादी मोटार असली, कीं मुलीच्या मनांत येतं, सुख सुख म्हणतात तें याहून दुसरं असं काय असणार? मुलालाहि वाटतं, कीं मुलगी दिसायला देखणी आहे ना? बस्स झालं तर—नारायणाच्या लक्ष्मींत तरी अधिक असं काय आहे याहून?

अशाच कांहींशा कल्पना करून एकत्र आल्यावर, खरं पाहतां, तिसरा मजला चढतांना शारदेला केवढी अधीरता आणि आनंद

वाटायला हवा होता. पण वस्तुस्थिति मात्र अगदींच वेगळी होती. आनंदाऐवजीं हृदयांत भीतीचं काहूर माजलं होतं; गात्रं कशीं गळल्यासारखीं वाटत होतीं; आणि वधस्तंभाकडे खेंचल्या जाणाऱ्या बळीप्रमाणं असहाय्यपणें ती मंद मंद पावलांनीं चालली होती. पतीच्या खोलीचं दार उघडतांना पहिल्या दिवशीं तिचं शरीर कसं बहरलेल्या वेलीप्रमाणं रोमांचांनीं पुलकित झालं होतं; पण आज मात्र तिचा हात दारावरच थबकला. दाराआड कोणतं भयाण दृश्य विधात्यानं आपल्याकरतां रंगवून ठेवलं असेल, याचीच एक कल्पना तिच्या अंतःचक्षूसमोर नाचून तिला भेडसावीत होती.

कारण, नऊ साडेनऊ झाले तरीहि सारंग जेवायला खालीं आला नाहीं, तेव्हांच तिच्या काळजांत कसं धस्स झालं ! वरती जाऊन वेळींच त्याला जेवणाची जाणीव करून द्यावी असं तिला हजारदां वाटलं; पण तिथं जमलेल्या त्याच्या मित्रांच्या सातमजली हास्यानं तिचा विरस कसा क्षणाक्षणाला वाढत होता. शेवटीं जेव्हां रामा गड्यानं मालकाच्या आज्ञेनुसार बिनदिव्याचीसुद्धां सायकल घेऊन धूम ठोकली तेव्हां तर तिची खात्रीच झाली—

खरं पाहतां, असले प्रसंग तिला वारंवार पाहावे लागत होते. आणि नित्याच्या या अंतस्तापानं तिचं मन केव्हांच जळून गेलं होतं. अर्थात् आजचा हा प्रसंग म्हणजे राखेला जाळण्यासारखाच होता—

पण जड वस्तु जरी राख झाल्यानंतर पुनः फुलत नसल्या तरी माणसाचं मन मात्र भारी विचित्र आहे. आशेच्या जलानं मनाची राखसुद्धां अंकुरून येते. शारदेलाहि याचा अनुभव नुकतांच येऊं लागला होता. कारण—

दोनतीन दिवसांपूर्वींचीच गोष्ट! डॉक्टरनीं उपचार करून डोक्याला मलमपट्या बांधल्या तेव्हां कुठं शारदा शुद्धीवर आली होती. डोळे उघडतांच डॉक्टरनीं तिला कांहींसं विचारलं; पण त्याला उत्तर देण्याआधींच तिनं म्हटलं होतं,

" ते कुठं आहेत ? "

सारंग उशाशींच उभा होता. तिनं पाहिलं, त्याचाहि चेहरा दुःखीकष्टी दिसत होता. आणि याचं केवढं समाधान वाटलं होतं तिला! आपल्या दुःखानं आपला पति कष्टी व्हावा, याचा कोणत्या स्त्रीला अभिमान वाटणार नाहीं? याच आनंदातिशयानं क्षणभर आपल्या जखमा विसरून ती डॉक्टरना म्हणाली,

" काय म्हटलंत ? "

तिची हाताची नाडी पाहात डॉक्टर म्हणाले,

" नाहीं—आपण जेव्हां जिन्यावरून पडला तेव्हां तुम्हांला भोंवळ वगैरे आल्यासारखं वाटलं होतं कां ? "

तिला डॉक्टरच्या या प्रश्नाचा अर्थच कळेना. आपण जिन्यावरून पडलों? तिनं प्रश्नार्थक नजरेनं पतीकडे पाहिलं. तो म्हणाला,

" सांग ना—— "

मूर्तिमंत असहाय्यता त्याच्या मुखावर प्रगटली होती. निकाल ऐकणाऱ्या खुनी इसमाप्रमाणं त्याचा चेहरा काळवंडला होता. हें पाहून शारदेला काय वाटलं कोण जाणे! डोळे टिपून ती म्हणाली,

" नाहीं—पायरी चुकून पडलें मी ! "

आणि असं म्हणून तिनं पुनः पतीकडे पाहिलं. सारंग आवंढा मोठ्या प्रयासानं आंवरतांना तिला दिसला. डॉक्टरनीं औषध लिहून दिलं. जातां जातां ते म्हणाले,

" कांहीं घाबरूं नका. दोन दिवसांत बरं वाटेल यांना. "

डॉक्टर निघून गेले मात्र! सारंग दुःखावेग न आंवरतां उद्गारला,

" क्षमा कर शारदे—"

" कसली—?"

" तुझ्या पातिभक्तीला पात्र नाहीं मी. "

" असं बोलूं नये वेडयासारखं—" त्याचा हात आपल्या दोन्हीं हातांत धरून ती म्हणाली, " त्यापेक्षां—"

" काय–? "

" एक वचन द्याल ? "

" हो–बोल–"

" माझी शपथ— ? "

" शपथ, बोल ना— ! "

" पुनः शिवणार नाहीं ना कधीं ? "

सारंगनं क्षणाचाहि विलंब न लावता शपथ दिली. कारण दारूच्या नशेंत आपल्या हातून केवढं क्रौर्य घडलं होतं, याची त्याला पूर्ण शुद्धि होती; आणि निरपराध जीवाला छळणारं त्याचं मन त्याला डांचत होतं.

हीच एकमेव आशा शारदेच्या हृदयांत अंकुरत होती.

पण व्यसनी माणसाचा पश्चात्ताप क्षणिक असतो हें तिला अनुभवानं कळायचं होतं. कारण, वरील प्रसंगानंतर दुसऱ्या कीं तिसऱ्याच दिवशीं ती रात्रीं एकाएकीं जागी झाली, ती पतीच्या पांघरुण घालण्यानं नव्हे, मायेनं अकारण थोपटण्यानं नव्हे किंवा चहाटळपणें कानांत किर्रर्र करण्यानंहि नव्हे; तर अतृप्त राहून अपरात्रीं घरीं परतणाऱ्या पतीच्या दुर्गंधी चुंबनानं !

त्या क्षणींच तिला वाटलं, तडक आपण घराबाहेर पडावं. पण घराच्या तिसऱ्या मजल्यावर ती गुढगाभर गादींत पार बुजली होती.

श्रीमंतींत वाढलेल्या तिच्या देहांतील मन पंगू बनलं होतं. घारीच्या पंखांतील पिलानं प्राणांतिक चित्कार करावा त्याप्रमाणं पतीच्या बाहुपाशांत ती उद्गारली,

" विसरलांत माझी शपथ ? "

या प्रसंगाच्या स्मृतीनं तिच्या डोळ्यांत अश्रू तरारले. पण रडून कुठं नशीब टळतं कां? मनाचा हिय्या करून तिनं दार उघडलं मात्र—

सारंग गादीवर अस्ताव्यस्त पडला होता; त्याचे डोळे तारवटले होते; केंस अस्ताव्यस्त होऊन, एखादी गुळणी झाल्यानं असेल, त्याच्या सदऱ्याचा उरोभाग भिजून, त्याला असह्य दुर्गंघी येत होती.

शारदेनं मोठ्या प्रयासानं हुंदका आंवरला आणि त्याच क्षणीं तिचं पत्नीत्व संपलं कीं काय कोण जाणे. एकाद्या निढावलेल्या नोकराप्रमाणं ती पुढं झाली. तिनं अंथरूण सांवरलं आणि त्याचा सदरा साफ करीत विचारलं,

" पुनः घेतलींत ? "

" हो—घेणार. "

त्यानं तिचा हात झिडकारून दिला आणि उशाजवळची मोकळी बाटली हातीं घेऊन तो बरळूं लागला,

" आणि उद्यांपासून तूंसुद्धां घेतली पाहिजेस. माझी–पतीची–तुझ्या देवाची आज्ञा आहे. ये जवळ–आतांच पाजतों तुला—"

शारदेला वाटलं, याहून पत्नीपदाची विटंबना ती कोणती! शाला कारण? पतीनं आपले मित्र सोडले तर? ती म्हणाली—

" उद्यांपासून इथं पाय ठेवूं देणार नाहीं मी आपल्या मित्रांना—"

" तूं कोण बोलणार त्यांना? ते माझे मित्र आहेत— "

" मित्र ? नव्हे शत्रू ! "

सारंगला या वचनांचा मनस्वी संताप आला. तो चवताळून उचक्या आंवरीत म्हणाला—

" मित्रांना एक शब्द बोल–"

" मी कशाला बोलूं ? नोकरालाच सांगतें—"

" त्यांनीं काय केलंय ग ऽ तुझं ? म्हणे–नोकराला सांगतें. अहा रे पतिव्रता ! नोकर म्हणजे नवरा वाटला काय तुला ? "

* * *

आतां शारदेनं तिथं राहण्यांत अर्थ नव्हता. लडिवाळपणें अंगाशीं बिलगणाऱ्या मुलाला त्रस्त मातेनं श्रीमुखांत भडकवावी तशीच कांहींशीं अवस्था तिची झाली. तरीहि मुलाचे भरले डोळे पाहून आईला गहिंवर येतो. पण तसं व्हायला सारंग शुद्धीवर होता कुठं ? आणि याचंच शारदेला अधिक दुःख झालं.

ती खालीं आली. पतीचं ताट पार निवून भाताच्या गारगोट्या झाल्या होत्या. आणि हेंच त्या दुबळ्या पतिव्रतेचं नित्याचं पक्वान्न होतं.

कसेबसे चार घांस खाऊन शारदेनं हात धुतले, खरकटीं काढलीं, आणि भांड्यांची आवराआवर ती करूं लागली, तोंच रोज सकाळीं भांडीं घासायला येणारी भैना तिला सोप्याचं दार उघडून आंत येतांना दिसली. अशा अवेळीं भैनेला पाहून तिला जरा नवलच वाटलं. ती म्हणाली—

" यावेळीं बरं आलीस भैने ? "

" उद्यांपासनं मी भांड्याला येनार न्हाई. "

शारदेला कमालीचं आश्चर्य वाटलं. रोज न चुकतां येणारी भैनाच कां बोलते आहे हें ? तिनं विचारलं,

" कां ग ? "

आणि हा प्रश्न विचारतांना आपल्या मोलकरणी दिवसागणिक बदलतात, याचा विचार तिला बीभत्स वाटला. आपल्या नवऱ्याच्या नादानपणामुळें तर ही जात नसेल, असाही विचार तिच्या संशयी आणि स्त्रीस्वभावसुलभ मत्सरी मनांत आला. पण भैनेनंच याचं निरसन केलं,

" मी लगीन करतुया— "

आणि असं म्हणून भैना लाजली.

भैना विवाहित होती हें शारदेला माहीत होतं. अर्थात् भैनेचं हें उत्तर आणि लाजणं पाहून शारदेला हंसूं आलं, तरी त्यांत आश्चर्यच अधिक प्रतिबिंबित झालं होतं. शारदेनं विचारलं,

" लग्न झालंय ना तुझं ? "

" याक झालंय जी. "

" मग— ? "

" दुसरं लगीन करतुया म्यां. "

" म्हणजे— "

" काडीमोड दिली म्यां नवऱ्याला. आतां पाट लावतुया मी दुसरा. "

पुरुष 'दाढी करतो' म्हणून सांगतो, तितक्याच सुलभपणें 'मी लग्न करतें,' म्हणून सांगणारी भैना शारदेला जितकी अपरिचित तितकीच भयंकर वाटली. तरीहि ती शांतपणें म्हणाली,

" कां ग— ? "

हा प्रश्न मात्र भैनेला जरा गंभीर वाटला असावा; कारण, थोडा वेळ शांत राहून ती बोलूं लागली, " कालपतुर म्यां तुमास्नी माजा

नवरा लई चांगला हाय म्हून बोललें. पन तें सारं अक्षी खोटं हुतं. कारन, उद्यांची आस कुनाला सुटलीया व्हय? याच आशेनं दारुड्या नवऱ्याचंबी म्यां कौतुक केलं. पण यानंच तो लई भकला जनूं. कदी कदी घेतों म्हनत नेमानं झिंगूं लागला. परवां तर बाई-लाच कुटल्या एका घिऊन आला. तवा मातुर माजं डोक्सं फिरलं. व्हय–जिवापरास काय नवरा अधिक हाय?"

या प्रश्नाचं उत्तर हिंदु स्त्रीला अगदीं पाठच असतं! शारदा म्हणाली,

"तो एक चुकला. पण म्हणून त्याला सांवरायचं–समजायचं–कां—?"

"सांवरासमजायला काय तो प्वार हाय जनूं! गांवाचीं खेटरं खानारीं बायकांचं ऐकत्यात व्हय?"

भैनेचा हा प्रश्न शारदेच्या जिव्हारीं झोंबला. पण याला उत्तर होतं कुठं? बुडत्यानं काडीचा आधार घ्यावा, त्याप्रमाणं ती म्हणाली,

"सीताद्रौपदीचं उदाहरण—"

पण भैनेनं तिला अधिक बोलूंच दिलं नाहीं. ती म्हणाली,

"तीं देवमानसं हुतीं, आणि त्यांचं नवरंबी द्याव हुतं! असं लोळत नव्हतं शेनामुतांत—"

भैनेचा हा सवाल रोखठोक होता. अशा वेळीं पातिव्रत्याच्या आधाराखेरीज हिंदु स्त्री दुसरा कसला आधार शोधणार? शारदा म्हणाली—

"वेडे, म्हणून शील कां सोडायचं माणसानं?"

" हे बगा, त्यावरबी म्यां लई इचार केलाया हं! शेवटीं एकच इचारलं मनाला—रातध्याड नवऱ्याच्या नांवानं बोटं मोडून मनं इटाळण्यापेक्षां ध्याई इटाळणं लई पाप ठरऽल व्हय ? "

भैनेच्या या एकेका शब्दासरशीं शारदेच्या हृदयावर वज्राचे आघात होत होते. हा वाद वाढवण्याचंहि धैर्य तिला झालं नाहीं. शेवटीं भैनाच म्हणाली,

" म्यां जाऊं ? आतां कंदी येनं हुतंया कुनास. ठावं ? तवा—तुमचा नुसता आशिर्वाद घ्यायला आलीवते मी तुमच्यासारख्या देवता— "

आणि एवढं म्हणून भैनेनं तिला नमस्कार केला. शारदेनंहि तिला मनःपूर्वक आशिर्वाद दिला. याचा भाबड्या भैनेला केवढा आनंद वाटला. भैनेला जाणं जिवावर आलं. दारापर्यंत जाईपर्यंत ' जाऊं ' म्हणून हजारदां तिनं फिरफिरून विचारलं; आणि शेवटीं डोळे टिपून ती जी गेली—

शारदा तिला अगदीं अंधारांत विलीन होईपर्यंत पहात होती. ती दृष्टिआड होतांच शारदा माडीवर गेली. तिचा पति अद्याप अस्ताव्यस्तच होता. त्याला पांघरूण घालण्यासाठीं ती पलंगावर थोडीशी कलली मात्र—

दारूच्या असह्य दुर्गंधीचा भपकारा तिच्या नाकांत शिरतांच भैनेचे शब्द तिच्या हृदयांत केवढ्यानं उमटले—

" रातध्याड मनं इटाळण्यापेक्षां ध्याई इटाळणं लई पाप ठरऽल व्हय ? "

———

# दुसरें प्रेम

त्या दिवशीं पतीचा रागरंग कांहीं निराळाच दिसला तिला. वेणीफणी करून फुलांचा गजरा सैलशा आंबाड्यावर ती बांधीत असतां नागेश तिला म्हणाला,

" आज रात्रीं कां वेषभूषा चाललीय् ? "

त्याच्याकडे न बघतां कानांतील डूल आरशांत पहात ती म्हणाली,

" शूटिंग आहे आतां. "

" रात्रीं ? "

पावडरच्या फुलानं गाल फुलवीत ती हंसली,

" हो रात्रीं ! का, एक रात्रहि सहन होत नाहीं का माझा विरह ? "

" नान्दी—"

नागेशाच्या हांकेंत कातरपणा होता. तिनं दचकून पाहिलं. पलंगावर लवंडून तिच्या प्रत्युत्तराची तो वाट पहात होता. तिनं गंभीर मुद्रेनंच विचारलं,

" काय ? "

" शूटिंग आजच आहे काय ? "

" नाहीं– यापुढं रोज असंच ! इलेक्ट्रिसिटीची नवीन सोय झालीय् आतां स्टूडिओंत. "

" मग–हें पिक्चर झाल्यावर कंपनी सोडून दे. "

ती एकदम दचकली,

" कां ? "

" दिवसभर मी असा राबणार आणि रात्रभर तूं स्टूडिओंत राहणार—"

" पण यानं माझ्या प्रेमांत कमतरता येईल असं का वाटतं तुम्हांला ? "

" नाहीं, तुझ्या प्रेमाबद्दल मी अगदीं निःशंक आहे. पण शिणल्या जिवाला उत्साह देण्यासाठीं प्रेमाचा आसरा लागतो हें ठाऊक आहे ना तुला ? "

" पण कलेचा विरह होतांच माझं जीवन निरुत्साही होईल तें ? "

" खरं आहे तुझं म्हणणं ! कलेच्या अभावीं जीवन नीरस- हें अगदीं खरं; पण कलेचे शृंगारसाज चढवायलाहि जीवन निरोगी असावं लागतं ना ? "

नान्दी नकळत गोंधळली. पळवाट काढण्यासाठीं ती कांहींतरी बोलली,

" हें पहा, मला तुमचे कला न् जीवन हे शब्दच कळत नाहींत मुळीं ! "

" मग माझं ऐकणार ? "

" नाहीं... "

तिचा हट्टी स्वभाव तिला नकळत जागृत झाला. नागेश एकदम गंभीर झाला. यामुळें किंचित् भिऊन तिनं म्हटलं,

" खरंच सांगतें, कलेचा विरह मला क्षणभरहि सहन व्हायचा नाहीं. "

आपल्या या उद्दाम वर्तनाचा तेव्हां तिलासुद्धां राग आला. पण याचा मागमूसहि पतीच्या चेहऱ्यावर न दिसल्यामुळें तिला गहिंवर आला.

हुंदके आंवरीत ती म्हणाली,

" भारी वाईट आहांत तुम्हीं ! कां नाहीं रागवत तुम्हीं माझ्या-वर ? रागवा, रागवा म्हणतें ना मी ! "

आणि रडूं अनावर होतांच तिनं नागेशच्या अंगावर अंग टाकलं. तिला हळुवार हातानं थोपटीत तो म्हाणाला,

" मी तुला एक प्रश्न विचारूं कां ? "

डबडबल्या डोळ्यांनीं तिनं त्याच्याकडे पाहिलं. अश्रु पुशीत तो पुढं म्हणाला,

" तुझ्या कलाप्रेमी वर्तनावरून बरेच दिवस मला शंका येते. "

" काय ? "

" शांत चित्तानं उत्तर देणार ? "

" हं ! "

" लग्नापूर्वी तुझं कुणावर प्रेम होतं कां ? "

नांदी ताडकन् उठली !

" तुम्हींच कां ही शंका घेता ? "

" रागावूं नको; खरंच मला वाटतं, तुझ्या प्रेमाची भयंकर निराशा झाली असावी."

" नाहीं, तुमच्याएवढं प्रेम मीं कुणावरहि केलं नाहीं."

" याची मला खात्री आहे. पण तुझं प्रेम दोन ठिकाणीं विभागलं गेलं आहे, हें खास! तुझ्या प्रेमाचीं शकलं झालीं; तुझ्या जीवनांतला खरा आनंद गेला; कारण कलेच्या उसन्या आनंदाचा हट्ट तुला आतां सोडवत नाहीं."

तिला भडभडून आलं. पलंगावरून उठून तिला शांतवीत नागेश म्हणाला,

" जा, आनंदानं स्टूडिओंत जा; पण नेहमीं हंसरी रहा. तुझ्या सुखासाठीं तुझ्या सहवाससुखाचाहि त्याग करणं मी माझं कर्तव्यच समजतों."

हें दयेचं शस्त्र तिच्या काळजाला कापीत गेलं. हृदयांतून भावनांच्या चिळकांड्या उडतांच ती किंचाळली,

" किती चांगले आहांत तुम्हीं! तुम्हीं माझ्याशीं कां चांगले वागतां?"

सजल नेत्रांनीं तिनं वर पाहिलं. त्याच्याहि डोळ्यांतून आसवांची माळ तिच्या गालावर ओघळत होती.

* * *

शूटिंग न होतांच ती परतली. दिग्दर्शकानं तिच्याकडून अभिनय करवून घेण्याची शिकस्त केली होती; पण तो तरी काय करणार? कारण नायकाला पाहून ती हंसत असल्याचा त्याला 'क्लोजप्' घ्यायचा होता. त्यानं खूप सांगितलं,

" हंसा, हंसा—नेहमींची खळी दिसूं दे गालावर!"

तिनंहि खूप प्रयत्न केला; पण कपाळावरील आंठी कांहीं तिला घालवतां येईना. कारण आपल्या आयुष्यांतील सारे आनंदी प्रसंग आठवण्याचा तिनं जितका प्रयत्न केला, तितका अश्रूंनीं न्हालेला पतीचा चेहराच तिला अधिक स्पष्ट दिसं लागला. अंतीं नाइलाज होतां ती दिग्दर्शकाला म्हणाली,

"रागावूं नका. मी कधींतरी चुकतें का? पण आज जाऊं द्या मला लवकर. मला बरं वाटत नाहीं."

तिच्या त्रस्त मनाची कल्पना त्याला वरील असंबद्ध भाषणानं आली असावी! कशीबशी परवानगी मिळवून ती मोटारींत चढली. सूंऽऽ असा आवाज करून गाडी वाळूवरून सरकूं लागली. स्टूडिओबाहेर येतांच तिला सर्वत्र अंधार जाणवूं लागला. रात्रींची प्रशांतता पसरत चालली होती. आसपास लुकलुकणाऱ्या मंद दिव्यांमुळें रात्रीचं हें स्वरूप बरंच गंभीर वाटत होतं.

गार वारा अंगाला बिलगतांच ती विचार करूं लागली, "त्यांना माझ्यांत कसली उणीव दिसली? माझं प्रेम विभागलं गेलं आहे, असं त्यांना कां वाटलं?—आणि खरंच, माझं प्रेम विभागलं आहे कां?"

तिला कांहींच कळेना. आणि खरंच, तिनं कुणावरहि प्रेम केलं नव्हतं! तिचा विशेष असा कुणाशींहि परिचय नव्हता व कुणाहि पुरुषाबरोबर लग्नाआधीं ती हिंडली किंवा फिरली नव्हती.

पण नकळत एका प्रसंगाची तिला आठवण झाली. शहारा येतांच तिनं आंग झाडलं. तरीहि तो प्रसंग पडद्यावरील चित्रांप्रमाणं तिच्या डोळ्यांसमोर सरकूं लागला——

तिनं व कुमारनं एकत्र काम केलेला चित्रपट त्या दिवशीं नुक्ताच लागला होता. थिएटर चिकार भरलं होतं. झगझगीत दिवे खालीवर

तळपत होते. प्रेक्षकांच्या हंसण्याखिदळण्यानं कानठळ्या बसत होत्या. ग्रामोफोनचा आवाज तर या सर्वांवरहि ताण करीत होता. धूम्रपानाचा उग्र वास सर्व थिएटर भरून उरला होता. प्रेक्षकांच्या स्वैर नजरा कोना–कोपरा धुंडाळीत होत्या. सिनेमा सुरूं होण्याची वेळ झाली. दिवे बंद झाले. अंधाराबरोबर शांतताहि पसरली. आणि क्रमवार जाहि-रातींच्या 'स्लाइड्स' संपतांच नांदीच्या हृदयांत गुदगुल्या होऊं लागल्या आणि भीतीहि वाटूं लागली. लोकांचे अभिप्राय ऐकावयाचे होते तिला. आणि याच वेळीं ती बसलेल्या बॉक्सच्या दारावर टिक् टिक् असा आवाज झाला. तिनं दार उघडलं. कुमार बाहेर उभा होता.

" जागा आहे का इथं ? "

असं बोलून कुमार हंसला.

" हो, या ना ! " ती हंसली.

तो पुनः एकदां हंसला. तीहि पुनः हंसणारच; पण हें उगी-चच येऊं पहाणारं हंसं डावी करांगुलि चावून मोठ्या मुष्किलीनं तिनं आवरलं. तीं दोघेंहि सिनेमा पाहूं लागलीं. चित्रपट क्षणा-क्षणाला रंगत चालला होता. तीं दोघें मोठ्या आनंदांत होतीं. मधून मधून नांदीच्या कामाला प्रेक्षक 'अहा, ब्यूटी' असें म्हणत. तेव्हां ती नकळत कुमाराकडे पाहून हंसे. कुमारहि हास्यानंच त्याचं उत्तर देई.

थोड्याच वेळांत एक देखावा पडद्यावर दिसूं लागला. नायक नायिकेचा हात धरून प्रियाराधन करीत होता. दिग्दर्शकानं कौश-ल्याची कमाल केलेला प्रेमप्रसंग पडद्यावर रंगणार होता, पण —

याच वेळीं नांदीच्या खुर्चीच्या पाठीवर कुमाराचा हात पडला. तिनं चोरून पाहिलं. त्याचीं बोटं तिच्या खांद्यावरील पदराशीं खेळत होतीं. भयभीत नजरेनं तिनं कुमारकडे पाहिलं. कुमारहि तिच्याकडेच पहात होता. तिनं झटकन् मान वळवली. कुमार जरा जवळ सरकला. विलक्षण गोड पण अननुभूत अशी चमक तिच्या सर्वांगांतून चमकून गेली. तिचा श्वास जोरानं होऊं लागला. बोटं नकळत अंगावरील वस्त्राशीं चाळा करूं लागलीं. तिच्या मदांध डोळ्यांना कांहींच दिसेना. गरगरा फिरणारा पंखा अवघ्या शरीराला फुलवूं लागला. नकळत तिनं आपली मान डाव्या बाजूस झुकवून त्याच्या हातावर विसांवली. त्याचा हात तिच्या गालाशीं सलगी करूं लागला. तिची छाती धडधडूं लागली. आयुष्यांत कधींहि न घडलेलं घडत होतं; पण त्याचा प्रतिकार करण्याचं ती पार विसरली; आणि याच वेळीं तिच्या उजव्या गालावर कुमारानं आपले ओठ टेकले. एका क्षणांत तिच्या मुखकमलावर घर्मबिंदु डंवरून आले. अज्ञात अशा सुखसागरांत पोहत असल्याचा तिला आभास झाला. आपणहून तिनं आपलं मस्तक त्याच्या स्कंधावर टेकलं. किती वेळ ती त्याच्या अंगावर रेलून पडली असती कोण जाणे; पण “ आहे बुव्वा ” या उद्गारांनीं ती भानावर आली. भिरभिरणाऱ्या पंख्यानं भुरभुरणारे केस तिनं सांवरले आणि कुमाराच्या जुलमी बाहूंतून आपलं अंग सोडवून तिनं समोर पाहिलं. पडद्यावर नायक नायिकेला कवटाळीत होता...!

वरील प्रसंग डोळ्यांसमोरून दूर होतांच तिला आपल्या पतीच्या प्रश्नाची आठवण झाली, “ तूं लग्नाआधीं कुणावर प्रेम केलं होतंस कां ? ” पण लगेच तिनं स्वतःला विचारलं, ‘ वरील प्रसंग म्हणजे

प्रेमाचं प्रतीक असं कसं म्हणतां येईल ? भावनातिशयानं आपण स्वतःला विसरलों तेव्हां कुमारानंच त्या एकांताचा गैरफायदा घेतला, असं नाहीं का होत ?'

पण लगेच दुसरा एक प्रश्न उभा राहिला. समज, पुनः एकांतीं गांठून कुमारनं चुंबनासाठीं तुझा हात धरला असता तर ?–तर तूं तें दिलं असतंस कीं नाहीं ?

ती एकदम गोंधळली ! खरंच, आपलं प्रेम होतं कां कुमारावर ? तिनं बळेंच उत्तर दिलं,

" नाहीं–कदापि नव्हतं. "

पण लगेच कितीतरी प्रश्न तिच्यासमोर उभे राहिले. तुला त्याचं कसलंहि आकर्षण जाणवलं नव्हतं ना ? मग त्याला प्रतिकार तूं कां नाहीं केलास ? तुला कुणाची भीति होती ?

ती भांबावून वेडीच झाली. तरीहि तिच्या हृदयांतून नाद उमटला, " वेडे, अशी स्वतःची फसवणूक कां करतेस ? त्याला प्रतिकार करण्याचं सामर्थ्य तुझ्यांत नव्हतं; कारण कसलं कां होईना, पण समाधान तुला त्याच्या संगतींत वाटत होतं ! कुणाशींहि न बोलणारी तूं ! मग त्याच्याशींच बोलण्याची संधि तूं कां शोधीत होतीस ? कां हंसत होतीस ?

तिला शंका आली, हेंच आपलं पहिलं प्रेम असेल का ? ही तिची शंका बळावतच गेली. कारण मुंबईस नोकरी मिळतांच कुमार जरी तिला विसरला होता, तरी अजुनी त्याला ती पूर्णपणें विसरली नव्हती. नाहींतर हा प्रसंग तरी तिला कां आठवला असता ? आणि वस्तुस्थितीहि अशीच होती, कीं केवळ तो तिला विसरला म्हणूनच तिचं व नागेशचं सूत जमून त्यांचं लग्न झालं होतं. याचा अर्थ नागेश तिला आवडत नव्हता, असा नाहीं. तोहि भारी आवडत होता तिला.

आणि कां आवडूं नये ? पत्नीच्या कलाप्रेमासाठीं जीवनानंदाचा त्याचा त्याग का थोडका होता ? आणि याची आठवण होतांच तिला उचंबळून आलं !

" माझ्यासाठीं प्रेमाचा त्याग ते करतात; मग मला त्यांच्यासाठीं कलेचा त्याग कां करतां येऊं नये ? खरंच, किती स्वार्थी, किती हट्टी आहे मी ! "

तिनं मनाशीं निश्चय केला, घरीं जाऊन आतां पतीच्या कुशींत खूप रडायचं आणि मग सांगायचं,

" मी आतां कंपनी सोडणार ! "

*　　　*　　　*

मोटार दारांत येऊन थबकतांच ती वरील समाधींतून जागी झाली. ती माडीवर गेली. हळूंच दार उघडलं खोलीचं. दिवा बारीकच होता. सर्वत्र शांतता होती. नागेश पलंगावर झोंपला होता. पाय न वाजवितां ती जवळ गेली; अन् अंगावरील वस्त्रं न बदलतांच प्रेमार्द्र नजरेनं तिनं त्याच्याकडे बघितलं. दिव्याच्या अंधुक प्रकाशांत नागेशच्या गालावर अश्रु चमकतांना तिला दिसले. तिच्या काळजांत चर्रर्र झालं—

" अजुनी रडत होते हे ? "

तिचा गळा दाटून आला. पतीच्या मुखावर दृष्टि स्थिरावून ती रडूं लागली. तिचे उष्णाश्रु गालांवर ठिबकतांच तो जागा झाला. तिला रडतांना पाहून तो कळवळ्यानं म्हणाला,

" रडतेस कां ? "

" आनंदासाठीं— "

" वेडी तर नाहींस ? "

"नाथ, आतां दया दाखवूं नका. खरंच, मी दोषी आहे. माझं प्रेम पूर्वी..."

"पण प्रेम करणं दोष समजत नाहीं मी."

"हा तुमचा मोठेपणा आहे."

"पण माझं प्रेम आहे ना तुझ्यावर! याचा अर्थच असा, कीं तुझ्या पूर्वदोषांना माझी दृष्टि सर्वस्वीं आंधळी झाली आहे. प्रेम आंधळं असतं असं म्हणतात. मला वाटतं तें याच दृष्टीनं!"

पतीच्या या दयार्द्र वचनांनीं ती अगदींच हतबल झाली. उन्मळून आलेला हुंदका आवरण्याचा प्रयत्नहि न करतां पतीच्या मुखावर हात ठेवून ती म्हणाली,

"बोलूं नका, मला रडायचं आहे आतां–"

"पण......"

"माझे सारे हट्ट पुरवणार ना? मग मला आतां शांतवूं नका! आज रात्रभर रडणार आहे मी! अगदीं इथं–तुमच्यापाशीं!"

इतकं बोलून पतीचे करपाश तिनं आपणहून स्वतःभोंवतीं वेढून घेतले; आणि अगदीं जीव गुदमरेतों ती त्याला घट्ट बिलगली.

———

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ९५२३ नों. दि ...........
वि. ......८१.५१. क्र. ........ .........

# दिवाळीची भेट

ऐन दिवाळीच्या सुमाराला दिवाळं वाजल्याप्रमाणं एकाद्याचं घरदार सताड उघडं करण्याइतके कांहीं तात्यासाहेब निर्दय नव्हते. पण त्यांचा नाइलाजच झाला होता आज. नाहीं तर आपल्या रयताशीं मारवाडी घांसाघीस त्यांनीं कधींच केली नसती. केवळ निरुपाय म्हणूनच त्यांनीं आज पाषाणाचं हृदय धारण केलं होतं. झाल्या वादविवादाचा यत्किंचितसुद्धां परिणाम आपल्या मनावर झाला नाहीं, असं दर्शवीत ते म्हणाले,

" रावबा, आतां तूंच सांग, मीं काय करावं तें ? "

रावबानं आपली असहाय्य दृष्टि सभोंवार फिरवली. दारिद्र्याचं प्रदर्शनच जणुं भरलं होतं त्याच्या घरांत ! तें तीन दगडांचं चुलखंड, ती मडक्यांची उतरंड, ती पिढीजात वाकळ आणि डोक्यावरचे

दोरीवर मांडलेले ते मळके, फाटके कपडे ! यांवरून फिरणारी त्याची लाचार नजर तात्यासाहेबांनाच परत विचारूं लागली,

" सांगा, म्यां तरी काय करावं जी ? "

त्याच्या त्या केंविलवाण्या मुद्रेची तात्यासाहेबांना करुणाच वाटली असावी. ते खरोखरीच कळवळून म्हणाले,

" मी उगीच एकाद्याला छळीन असं का वाटतं तुला ? "

" छ्या, छ्या, असं कंदी म्हटलंया म्यां ? तुमच्या अन्नावरच जगल्याती हीं पोरं, हें इसरनार न्हाई बरं मी ! "

रावबाच्या या वचनांत तात्यासाहेबांचे उपकार कांठोकांठ भरले होते. पण ज्याच्यावर आपण अनंत उपकार केले त्याच्याशींच, नाइलाजानं कां होईना, पण प्रतारणा करण्याची पाळी आली, कीं मोठी केविलवाणी अवस्था होतें माणसाची. तात्यासाहेबांचं काळीज यानं नकळत द्रवलं. आणि याच वेळीं नेमकी रावबाची लक्ष्मी भरली घागर कडेवर घेऊन घरांत आली. कठोरता दर्शवणं आतां त्यांना शक्यच नव्हतं. कारण, तात्यांनींच आपल्या या रयत जोडप्याचं लग्न लावून दिलं होतं. स्वतः मांडलेला बाहुलाबाहुलीचा लुटुपुटीचा संसार कुणी चुकून विस्कटला तर रडून कोण आकांत करतात अजाण मुली ! मग तात्यासाहेबांनीं तर काय, दोन जीवांचा जाणूनबुजून थाटलेला खराखुरा संसार तो !

पण नाइलाज म्हणूनच ते आले होते. आवराआवर करीत ते म्हणाले,

" कांहीं करून नड भागवच ही. "

खट्याळ भावाच्या भीतीनं स्वतःच आपल्या बाहुलीचा संसार विस्कटणाऱ्या परकऱ्या पोरीचं दुःख त्यांच्या मुखावर दृग्गोचर झालं. तें कमी करण्यासाठींच जणुं ते पुनः म्हणाले,

" सगळे कुठं मागितले मीं ? अवघे दीडशें ! "

" अवघे दीडशें ! "

रावबानं कपाळावर हात टेकले. भरली घागर गळून पडली लक्ष्मीच्या पायावर. त्या चौरस दीड हात पडवींत चिखल माजला सारा. पण संसार सारवला जात असतांहि तो सांवरायला वेळ असतो कुठं गरिबांना ! तात्यासाहेबांची मनधरणी करीत तो म्हणाला,

" पन्नासाची नड सांगितलीसा म्हणून चाळसाची म्हस इसाला इकली. "

पाणावलेल्या डोळ्यांनीं त्यानं आपल्या रिकाम्या गोठ्याकडे पाहिलं आणि पदरानं डोळे टिपणाऱ्या लक्ष्मीच्या हाताकडे न बघ-वून, खालीं पहात त्यानं पुनः म्हटलं,

" हिच्या म्हायेरच्या पाटल्या घान टाकल्या आनी हे पन्नास जमिवल्याती कसंबी ! "

दहा दहाच्या पांच नोटा तात्यासाहेबांच्या हातीं देऊन, त्यांच्या पायावर मस्तक टेकलं रावबानं ! पण त्याच्याकडे लक्षच नव्हतं तात्यांचं ! पाटल्यांचा उल्लेख होतांच आपले दोन्ही हात जीर्ण वस्त्रा-आड लपविणाऱ्या लक्ष्मीकडे न बघवून डोळे मिटले होते त्यांनींहि !

पण त्यांच्या अंतःचक्षूला काय दिसलं कुणास ठाऊक ! ते पुनः गंभीरपणानं म्हणाले,

" पण आमचं इसं झालेलं तरी तुला बघवेल का ? "

खरंच, ही कल्पनाहि रावबाला सहन झाली नाहीं. रावबा ताड-कन् उठला ! उतरंडींतील सर्वांत खालचं मडकं त्यानं काढलं आणि तें तात्यासाहेबांच्या पायाशीं ओतून तो म्हणाला,

"तुमचं हंसं? खाल्ल्या अन्नाला बेमान हुनारी जात न्हवं बरं कुरवाड्याची! घ्या हे पोरांचं कडदुरं, ही हिची टीक, ह्या लग्नांतल्या साकळ्या, कुठंबी इका! कारन, घान ठिवून पैसं द्यायला कोनबी तयार न्हाई गांवांत!"

दिवाळीच्या सणावारादिवशीं मायेचे जीव नटवून डोळे भरून पाह्यला जीवमोलानं जपलेल्या त्या जिनसा! पण धन्याच्या शाब्दिक हंशाचं मोल म्हणून किती सहजासहजीं तयार झाला तो त्या विकायला! हृदयांत शिगोशिग भरलेल्या असल्या अतुल भक्तीचा कुणालाहि अभिमानच वाटला असता; पण आपलं समर्थन करण्यासाठीं तात्यासाहेब तो हटवीत बोलूं लागले,

"रावबा, यंदा पोरीचं लग्न ठरवलंय मीं."

तात्या ओघाओघानं पैशाचा विषय काढणार होते. पण हर्षातिशयानं रावबा मधेंच उद्गारला,

"काय, आपल्या शांताक्कांचं?"

रावबाच्या मुखावर हास्याचे मळेच बहरले. धन्याची लाडकी लेक म्हणजे गरिबांच्या कौतुकाचं आगरच असतं एक! तो बेभान होऊन म्हणाला,

"लई ब्येस! यंदा मळाबी असा पिकलाया म्हनता, खोऱ्यानं पैसं वडा! आणि सारं खर्चून टाका त्या लग्नांत—याक पै मी मागीन तर माज्या या पोरीची आन!"

—आणि खरंच, शांतावर त्याचा मनस्वीं लोभ होता. गुऱ्हाळाला म्हणून जेव्हां शांता नटूनथटून खेड्याला येई, तेव्हां आग्रहानं तो तिला रस पाजी, गूळ खायला लावी आणि ती परत निघाली, कीं पाटाकांठच्या गुलाबाच्या फुलांची परडी रिकामी करी

तिच्या ओटींत ! यावर " पुरे पुरे, किती रे हीं " म्हणून जेव्हां शांता हर्षातिशयानं लाजे, तेव्हां तर केवढ्या अघाशीपणानं तो तिला न्याहाळी !

तेंच लाजरं सुहास्य आतां रावबाला दिसूं लागलं ! पण त्याच्या या भोळ्या कौतुकाला आळा घालून, वसुलीचा वाद संपविण्या-साठीं तात्यासाहेबांनीं तो परवांचा प्रसंग आठवला; नव्हे, तो आठवणं भागच होतं.

त्याचं असं होतं. तात्यासाहेब कायसं लिहीत बसले होते. खोलीच्या दारांत येऊन थबकलेल्या शांतेचं भानहि नव्हतं त्यांना. जेव्हां त्यांच्या पत्नीनं—रमाबाईनीं म्हटलं,

" पाहिलं कां, किती वेळ उभं रहायचं पोरीनं ? "

तेव्हां ते भानावर आले.

त्यांनीं वळून पाहिलं आणि कांकणाशीं अकारण चाळू असणाऱ्या पोरीच्या चाळ्यावरून ओळखलं, कीं आईच्या वशिल्यानं कसली तरी मागणीच घालणार आहे ती ! ते हंसून म्हणाले,

" काय ग ? "

रमाबाई पोरीची बाजू मांडूं लागल्या,

" ही मागेल तें द्यायचं कबूल केलंय ना दिवाळीला ? "

" हो, बरं मग ? "

" मग द्या बघूं ! "

" पण काय कळूं द्या तरी. "

" सांग ग, यांना. "

आणि किती किती ओशाळली शांता ! तिला हृदयाशीं धरून रमाबाई म्हणाल्या,

" अंगठी हवीय हिला. "

" ती ग कशाला ? "

शांता लाजेनं अर्धमेली झाली ! तिनं मान वळवली. समोरच एका देखण्या तरुणाचा फोटो टांगला होता. तो ती पहात राहिली. तेव्हां रमाबाई म्हणाल्या,

" आपले कुमार आहेत ना ? "

कां कोण जाणे, 'इश्श' म्हणून शांतानं त्या फोटोवरचीहि नजर वळवली. पोरीच्या या असहाय्यतेचं कौतुक तात्याहि करूं लागले,

" बरं मग ? "

" ते म्हणे, हिला सोन्याचा गोफ देणार आहेत दिवाळीची भेट म्हणून ! "

" अस्सं, अस्सं ! "

" तेव्हां, हिची नको का भेट त्यांना जायला ? "

" अवश्य ! "

पण हा कौतुकाचा ओघ ओसरतांच ते अर्धवट स्वतःशीं पुटपुटले,

" एकूण चांगल्याच किंमतीची हवीय तर आंगठी ! "

आणि असं म्हणून तात्यासाहेब बराच वेळ स्तब्ध राहिले. हें न साहून मात्र रमाबाई फणकाऱ्यानं म्हणाल्या,

" रोज रोज का मागणार आहे ही ! आयुष्यांत पहिल्यांदा पोरगी मागते, त्यांत विचार कसला येवढा ? उद्यां दुसऱ्याच्या घरीं गेली कीं पाह्यलाहि मिळायची नाहीं. "

रमाबाईंचं म्हणणं कांहीं चूक नव्हतं ! मौल्यवान आंगठी घेऊन देण्याचं तात्यासाहेबांनीं कबूल केलं. मुलीचा संकोच दूर करण्यासाठीं ते म्हणाले,

" बरं बरं, आणखी काय काय ठरवलंय तुम्हीं ? "

आतां शांता तिथं राहणं शक्यच नव्हतं. ती पळतच तेथून निघून गेली. तेव्हां, " पोरीला भलतंच काय विचारणं " म्हणत रमाबाई पुढं झाल्या आणि दाखवायला आणलेली आंगठी रंगीत पुडींतून बाहेर काढीत त्या म्हणाल्या,

" ही पाहिलीत ? अवघे दीडशें ! "

तात्यासाहेबांना हें सारं आठवूं लागलं तेवढ्यांत रावबा उद्गारला,

" पन् येवढी दिवाळी हुंदे बगा ! "

रावबाच्या आर्तस्वरानं ते भानावर आले आणि केव्हांपासून पायाशीं पडलेले रावबाच्या पोरांचे ते कडदोरे, बायकोची ती टीक आणि सांखळ्या आपल्याकडे केंविलवाण्या मुद्रेनं पहात असलेल्या तात्यासाहेबांना पुनः स्पष्ट दिसल्या !

---

# भाऊबीजेची ओवाळणी

डाव्या खांद्यावर धोतराचा सोगा टाकून, डोक्यावर टोपी घालीतच मी देवघरांत गेलों. ताई माझी वाट पहात होती. देवासमोरच मांडलेल्या पाटावर मी बसतांच समईतल्या जळत्या वातीवर ताईनं निरांजनं फुलवलीं; आणि अक्षता, पानांचे विडे वगैरे ठेवलेल्या तबकांत तीं मांडून ओवाळण्यासाठीं माझ्या कपाळा-वर कुंकवाचा टिळा लावला तिनं.

नकळत माझी दृष्टि ताईच्या भालप्रदेशावर गेली आणि माझं अंतःकरण दुःखानं भरून आलं. तारुण्याचा उन्माद दाखवणारं तें कपाळ कुंकवाभावीं कसं पांढरं फटफटीत दिसत होतं. माझ्या मनांत विचार आला, कीं दिवाळीची मंगल आरास तिला चिते-प्रमाणं दाहक—

पण मधेंच ताई हंसली,

" दादा, मला ओवाळणी काय घालणार रे ? "

आणि असं म्हणून माझ्या हातांत तिनं विडा दिला. मीं कांहींच उत्तर दिलं नाहीं. डोळ्यांत जमूं पाहाणारे अश्रु मला हटवायचे होते. माझ्या मस्तकीं ताईनं अक्षता उधळल्या; व आशीर्वाद देऊन किती प्रेमानं ओवाळलं मला ! या आशीर्वादाची परत-फेड मीं केली असती; पण अंतरीं तळमळ असली, तरी विधवा बहिणीला कसला आशीर्वाद मी देणार ? आशीर्वाद सुखासाठीं देतात ! ताईचं सुख–?

कांहीं न बोलतां हातांतला विडा मीं तबकांत ठेवला. किती मनो-निग्रहानं मीं नियोजित ओवाळणी द्यायची आंवरली ! पण, ऐनवेळीं कौतुकानं हा विधि पाहणाऱ्या तिनं दगा दिलाच. जवळच दारा-आडून ती उपरोधानं म्हणाली,

" नुसत्या विड्यावरच भागवणार कां वन्संची ओवाळणी ? "

पण हृदयानं किती श्रीमंत होती माझी ताई ! ती हंसली,

" असूं दे ! प्रेमाचं प्रतीकच नव्हे कां हें ? "

आणि प्रसंग विसरून मी उद्गारलों,

" नव्हे ! "

माझ्या मुद्रेवरचं हें अनपेक्षित गांभीर्य पाहून केवढ्यांदां दच-कली ताई ! भयभीत स्वरांत तिनं विचारलं,

" तर काय ? "

" हा विडा म्हणजे पाळण्यांतला अरुण ! ताई, रांगता अरुण मीं तुझ्या ओटींत घातला आहे, असं समज. "

मी हे शब्द बोलून गेलों मात्र! ताईच्या हातून आरती खळकन् खालीं पडली; निरांजनं विझून गेलीं आणि आरतीचं साहित्य साऱ्या जमिनीवर विस्कटलं. यानं गांगरून ती किंचाळली,

"दादा!"

ती भोंवळ येऊन पडणार; पण चटकन् पुढं होऊन मीं तिला सांवरली. आणि...?

*　　*　　*

शिणल्यासारखं वाटल्यामुळें ताई अंथरुणावर पडून राहिली. तीहि ताईशेजारींच शुश्रूषेकरितां म्हणून बसली. मी मात्र तेथून उठलों आणि तडक माझ्या खोलींत आलों. मलासुद्धां सारं अंग कसं गळल्यासारखं वाटत होतं. थकवा असह्य वाटून मीं धाडकन् आरामखुर्चीत अंग टाकलं आणि हातांनीं मस्तक घट्ट दाबून धरलं. डोकं कसं सुंद झालं होतं अगदीं!

मी केलं तें चांगलं कीं वाईट, हें मला कांहींच कळेना!

कसंहि असो, त्या कृतीच्या बुडाशीं असणारा माझा हेतु पवित्र होता, एवढं तर खरं? वात्सल्याशिवाय आयुष्य कंठणं म्हणजे स्त्रियांची केवढी कुचंबणा ही! ती अंशतः तरी दूर व्हावी, म्हणूनच मी पोसलेला पोरका अरुण तिच्या ओटींत घातला होता. हेतु इतकाच, कीं हृदयांत कोंडलेल्या आईच्या सुप्त वासनांस वाट मिळून, ताईचा जीवनक्रम थोडा तरी आनंदमय होईल.

पण प्रत्यक्ष परिणाम?

माझ्या नेत्रांवाटें अश्रुधारा झरझरा पाझरूं लागल्या!

आणि डोळ्यांतल्या पाण्यांत सारा भूतकाळ प्रतिबिंबित होतो कीं काय कुणास ठाऊक? डोळे मिटून अधर चावीत मी खुर्चीच्या पाठीशीं रेललों नाहीं, तोंच—

कसे रोमांच शहारले अवघ्या अंगावर !

ती पहांट मला आवडली !

बाहेर मुसळधार पाऊस कोसळत होता; आणि त्या आवाजांतच गॅलरीचा पत्रा आपल्या कर्णकटु आवाजाची भर घालीत होता. मधुनच वाऱ्याचा थंडगार झोत येतां त्या पत्र्यावर पावसाच्या सरी तडातड् वाजत. त्यामुळें तर दुसरा कसलाहि आवाज ऐकूं येणं अशक्य झालं होतं.

पण मी जागा झालों मात्र—

अर्भकाचा ‘ ट्यां ट्यां ’ असा आवाज ऐकून मी विस्मयानं चकितच झालों. डोक्यावरचं पांघरूण काढून जिवाचा कान करून मीं ऐकलं. माझ्याच दारांत रडत होतं तें !

माझं काळीज कसं चर्र्र झालं !

हातांत कंदील घेऊन धडधडत्या अंतःकरणानं मी दार उघडलं.

पायरीवरच गॅलरीचा आसरा साधून एक मूल ठेवलेलं दिसलं मला. आसमंतातला हिंवाळी वारा असह्य वाटून तें रडत असावं ! मला करुणा आली. सारी जनता उबदार पांघरुणांत झोंपली असतां, एका निष्पाप बालकानं थंडीवाऱ्यांत आईसाठीं जीव तोडावा ! कुणा बिचारीला आपल्या आईपणाची चोरी वाटली असेल ? पोटचा गोळा तोडण्याची कठोरता स्त्रीहृदयानं दाखवण्याची पाळी यावी ! कारण– ? नीति–कायदा !

हा विचार मनांत डोकवायचा अवकाश, पोलीसचौकींत वर्दी देण्याचं माझ्या बुद्धीनं ठरवलंसुद्धां !

पण, त्या पोराच्या हातपाय हालवण्यानं सारं पांघरूण विस्कटलं होतं. तें नीट करावं म्हणून मी वांकलों. पांघरुणाजवळच बंद केलेला

लिफापा पडला होता एक. मीं दिवा मोठा करून पाहिलं; आणि काळजाचं क्षणांत पाणी पाणी झालं माझ्या !

तें ताईचंच हस्ताक्षर—

" दादा—"

मी मटकन् खालीं बसलों. माझी बुद्धीच बधिर झाली. " ताई, काय केलंस हें ? " एवढंच मी नकळत उद्गारलों ! धडधडत्या अंतःकरणानं मी तो उघडून वाचूं लागलों,

" प्रिय दादा, असं मी लिहीत नाहीं. क्षमा कर, तुला दादा म्हणायचीच मला लाज वाटते आहे. कुळाला काळिमा फांसणारी मी ! शपथ आहे तुला, मला पुनः ताई मानशील तर !

पण, मी तरी काय करूं ?

निलाजरेपणानं सारं कांहीं सांगतें ऐक. दादा, रागानं पत्र फाडून टाकशील माझं. म्हणशील, कुल कलंकित करणारी कुलटा—पण केवळ कुळांत जन्मलें म्हणून तरी निदान पत्र अखेरपर्यंत वाचण्याची कृपा करशील ?

तुला ठाऊकच आहे, कुंकवाचा खर्च माझा बालपणापासूनच वांचला आहे. आणि मला मोहहि कधीं झाला नाहीं कुंकवाचा ! कारण आपलीं उमलणारीं मनं कुस्करून टाकण्याचं बाळकडू आम्हां हिंदू विधवांना लहानपणापासूनच पाजलं जातं ! पोथी—पुराणं, पूजा—अर्चा यांतच सारा दिवस घालवून, रात्रीं अंथरुणावरची तळमळ विसरायला देवांच्या अगाध लीलांच्या वर्णनांचं वाचन, रामबाण औषध म्हणून प्यायला, आईनं शिकवलं होतं मला. पण तें औषधच जहरी वाटलं मला ! कारण एकाहि देवाचं जीवित विरक्तीला पोषक नाहीं. अहिल्येला मोहिनी घालणारा इंद्र किंवा गोपि-

कांचं वस्त्र हरण करणारा कृष्ण, हींच आमचीं वंदनीय दैवतं ना ! त्यांपेक्षां शृंगारानं नटलेलीं, पण दुष्ट विकारांची दुर्दशा दाखवणारीं आजचीं नाटकं किंवा कादंबऱ्या काय वाईट ?

तरीहि मला कुंकवाचा मोह झाला नाहीं, हें माझं विधान तुला खोटं वाटेल. पण अक्षरशः खरं आहे तें ! कारण उदात्त चित्रं रंगवणाऱ्या कांहीं प्रेमकथा वाचून, मला कळून चुकलं, कीं त्याग हीच प्रेमाची कसोटी आहे. कुंकू पुसलं तेव्हां मी नवऱ्याचा त्याग केला हें जितकं खरं; तितकंच हेंहि खरं, कीं पुनः तें न लावण्यांत त्यागी प्रेमाचं समाधान मीं प्रत्यहीं मिळवलं !

तुला, नव्हे कुणालाच हें ठाऊक नाहीं, कीं मीं प्रेम केलं आणि अजूनहि करतें आहे. माझ्या प्रेमाची व्यक्ति— सांगूं ?

तुझे मित्र किशोर !

कुणालाहि त्यांच्याविषयीं आदरच वाटे !

मग, त्यांचा मनमोकळेपणा पाहून मी त्यांच्याकडे नकळत आकर्षिलें गेलें यांत नवल काय ? दुरून कां असेना, पण त्यांच्याशीं हास्यविनोद करण्यांत किती किती समाधान पावलें मी !

आणि मला कळून आलं, कीं त्यांचंहि प्रेम आहे माझ्यावर ! एकदां ते 'विधवाविवाहा'वर किती किती बोलले तुझ्या खोलींत ! कां कुणास ठाऊक, पण तें चोरून ऐकतां मला वाटलं, कीं मलाच ते प्रेमानं बोलावीत आहेत.

तशांतच एकदां काय झालं ! आपल्या बाळाला निजवून वैनी जरा समोरच्या घरांत गेल्या होत्या. जातांना मला त्या म्हणाल्या,

"वन्सं, उठला तर जरा घ्या हं बाळाला."

आणि वैनी जायचा अवकाश, बाळ उठून रडूं लागला. खूप खूप समजावलं त्याला मीं! पण कांहीं केल्या त्याची समज पटेना.

माझ्या मनांत एक विचित्र विचार आला.

भीत भीत मी सभोंवतीं पाहिलं.

कोणी नाहीं असं पाहतांच केवढ्या धिटाईनं मीं बाळाला पदराआड केलं!

बाळ क्षणभर स्तब्ध झाला.

असह्य अशा सुखसंवेदनांनीं क्षणभर मींहि डोळे मिटले! इव-ल्याशा नाजुक ओठांनीं माझ्या हृदयांतील वात्सल्य तो आकंठ शोषूं पाहात होता.

पण हें सारं क्षणभरच!

बाळ पदराबाहेर तोंड काढून पुनः मोठ्यानं रडूं लागला. मलाहि भडभडून आलं.

मी नव्हतें त्याची आई!

दुःखातिशयानं मीं त्याला पाळण्यांत ठेवला. दुधाची बाटली त्यांत होती, ती चोखण्यांत तो रंगून गेला! पण मी–?

किती वेळ मी उशींत तोंड खुपसून रडलें असतें कुणास ठाऊक? पण कुणाचा तरी सहानुभूतीचा हात पाठीवर पडतांच मी वर पाहिलं.

दयार्द्र नजरेनं किशोर माझ्याकडे पहात होते!

असहाय्यपणानं मी त्यांना बिलगलें.

त्या क्षणींच आम्ही लग्नाचं ठरवलं!

पण दुर्दैव माझं, कीं ते फार दिवस जगूं शकले नाहींत! तो मोटारीचा अपघात—

दादा, त्यानंतर मात्र मी खरी विधवा झालें !

आणि माझ्या खडतर दैवापेक्षां कायदा मला अधिक भेडसावूं लागला ! विलंब न करतां मी डॉक्टरीण मैत्रिणीकडे धांवलें. तिनं सल्ला दिला कीं–

गेले चार दोन महिने तिच्या आग्रहानं दूर, इथं अज्ञातवासांत राहिलें ना, तें याचसाठीं !

पण, आई होतांच अनाथबालकाश्रमाचीहि पायरी चढणं माझ्या जिवावर आलं !

निराशेच्या काळोखांतहि मुलाच्या, चोरट्या कां असेना पण, सहवासाचा आशाकिरण मला दिसला !

मी मेलें असं समज, पण शेजाऱ्याचं अर्भक म्हणून तरी दया दाखव माझ्या अरुणावर ! दादा, तुझ्या दारांत, नव्हें पदरांत घातलेल्या अरुणाचं तूं काय वाटेल तें कर-- "

यापुढं वाचणं मला धोक्याचं वाटलं. कारण, समोरच्याच घरांत घड्याळाचा गजर खणूखणूं लागला. तें पत्र फाडून तात्काळ ते तुकडे रस्त्यावरून वाहणाऱ्या प्रवाहांत मीं फेंकले, डोळे टिपले आणि—

दिवस उजाडतांच वर्तमानपत्रं विकणारीं मुलं ओरडूं लागलीं

" पायरीवर पोर सांपडलं. चोरट्या प्रेमाचं नागडं प्रदर्शन. ताजी बातमी ! "

त्यांच्या एकेका पुकारासरशीं माझं काळीज चिरत होतं ! पाळण्यांत त्या तान्ह्याला ठेवून वेड्यासारखा रडलों मी ! हें पाहून ती म्हणाली होती,

" कशाला आणलंत हें गुजराचं मडं ? कुणी चांडाळणीनं–? "

पण माझा जोराचा हुंदका ऐकतांच तिनं जीभ आंवरली होती.

* * *

मनमुराद रडून होतांच मन जरासं हलकं झालं. डोळे पुसून मी उठलों, आणि ताईची चौकशी करावी म्हणून निघालों. स्टोव्ह पेटलेला आवाज ऐकून मी स्वैंपाकघरांत डोकावलों; ती चहा करीत होती. थोडासा आराम वाटून मी ताईच्या खोलींत गेलों. पाळण्यांत अरुणशीं हितगुज करीत ती कॉटवर पाठमोरी बसली होती.

आई म्हणून ती त्याशीं खेळत होती.

थोडंसं समाधान वाटलं मलाहि ! मी तिच्या जवळ जाऊन म्हणालों,

"ताई !"

तिनं वळून पाहिलं. अश्रू तरळत होते तिच्या डोळ्यांत ! ते सुखाचे कीं दुःखाचे, तीच जाणे ! मी कांहींतरी बोलणार, पण तीच आधीं हंसली,

"माझा बाळ !"

मी चटकन् तिच्या तोंडावर हात ठेवला. हलक्या आवाजांत मी बजावलं,

"हो, तुझाच ! पण ताई, हें तुला उघड बोलतां येणार नाहीं. भिंतीलाही कान असतात."

तिच्या मुखावर पुनः कारुण्याची अवकळा पसरली. असहाय्य-पणें पाळण्यांतल्या अरुणकडे पहात ती म्हणाली,

"बाळ, तूं तरी मला आई म्हणशील ?"

मी गंभीरपणेंच म्हटलं,

"कां नाहीं म्हणणार ? पण हें कटु सत्य जगाला कळतां कामा नये. तुझ्या सुखाचा ठेवा परत करावा म्हणून मी हें केलं. पण जगांत वावरायचं, तर मायेला दयेचंच स्वरूप तुला द्यायला हवं."

यावर डोळे टिपीत तिनं विचारलं,

"माझं होऊं दे कांहींहि! पण बाळाचं सुख–"

"बाळाचं सुख—तो जन्मला तेव्हांच तें संपलं! मीं केलं हें तुझ्या-साठीं—बाळासाठीं नव्हे."

"काय? माझ्यासाठीं?"

"हो! बाळासाठीं नव्हे! चोरून जन्मतात त्यांना उजळ माथ्यानं जगतां येत नाहीं या जगांत! रडूं नकोस. न्यायी समाजाचा दंडक आहे हा—"

पण तरीहि ती रडतच होती. आणि याच वेळीं ती चहा घेऊन आंत आली. तिचेहि नेत्र पाणावले होते. माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं. मला जबर शंका आली, 'ओवाळणींतलं रहस्य' तिनं ओळखलं तर नसेल!

—•—

# उद्धार

गुलाबला अनिवार हंसू कोसळलं ! पलंगावर उठून बसतां बसतां हातांतलं मासिक गुलनारच्या अंगावर फेंकून ती म्हणाली,

" ही वाचलीस कां ग गोष्ट ? "

मोठ्या आरशासमोर बसून गुलनार रंगत होती. मासिक गालाला चाटून जातांच पुसट झालेल्या रंगावर पावडरचा भपकारा उधळीत ती कांहींशा रुसव्या स्वरांत म्हणाली,

" हें ग काय तुझं ? रंगूं तरी देशील कीं नाहीं मला ? "

समोरच्याच छोट्या टेबलावरील तबकांतली सुपारी तोंडांत टाकीत गुलाब अकारण हंसली आणि अल्लडपणें उगीचच पलंगावर लवंडून मान वेळीत ती म्हणाली,

" अग, पण गोष्ट तरी वाच. "

"मला नाहीं बाई वाचतां येत तुझ्यासारखं!" तांबड्या रंगाची कांडी ओठावर फिरवीत गुलनार म्हणाली, "सगळ्यांचेच यजमान कांहीं हौशी नसतात शिकवायला. बरं तें राहूं दे. गोष्ट तरी सांग बघूं!"

"गोष्ट? अकलेचे तारे म्हण लेखकाच्या! आणि तिला म्हणे, पहिलं बक्षीस दिलंय संपादकानं! बाकी तो तरी काय, एकाच माळेचे मणी सारे."

आणि यामुळेंच तिला आपल्या गळ्यांतल्या माळेची आठवण झाली कीं काय कोण जाणे! संवयीनुसार उघड्या असलेल्या उजव्या वक्षावर रुळणाऱ्या माळेशीं ती खेळूं लागली. पण यामुळें गुलनार अधिकच चिडली. चिडक्या स्वरांत तिनं म्हटलं,

"अग, पण सांगशील कीं नाहीं काय तें!"

लाडिकपणें पलंगाखालीं एक पाय हेलकावत गुलाब सांगूं लागली,

"म्हणे, हे लेखक महाशय उद्धार करताहेत आम्हां वेश्यांचा! काय मेली गोष्ट तरी, म्हणे एक वेश्येची मुलगी असते, खूप खूप शिकते, कॉलेजांत जाते, आणि यानं तिला आपल्या धंद्याचा वीट येतो. मला वाटतं, लेखकाला पोट नसावं. कारण, एकदां ती गॅदरिंगला गाणं गाते, आणि येवढ्यावर खूष होणाऱ्या कवीशीं ती लग्न करते."

आंबाड्यावरील गजरा हळुवार हातानं चेपीत गुलनारनं मधेंच अडवलं,

"मग काय चुकलं ग यांत?"

गुलाब पलंगावर उठून बसली आणि त्वेषानं बोलूं लागली,

" पहिली घोडचूक म्हणजे त्या लेखकानं तिला कॉलेजांत घातली. तूंच सांग, एक तरी वेश्या इतका अविचार करील कां? मुलीला शाहाणी करून म्हातारपणीं तिची आई काय उपाशी मरणार होती? बरं, इतकंहि करून ती शिकली, तें काय अगदीं धुतल्या तांदळा-प्रमाणं?"

" पण शिक्षणानं तिला वीट येतो ना—?"

" वेडे, गवयाचा मुलगा सुरांतच रडतो. चोराला चोरी करणं पाप वाटत नाहीं. काम ही शरिराची भूक आहे असं सांगणारं शिक्षण वेश्येला नीति शिकवील? असे काय मोठे पावित्र्याचे दिवे पाजळलेत या नीतिमान लोकांनीं? पापी पापी म्हणून आमच्याकडे बोट दाखवणारे पुण्यवंतच आमच्या पापाचे पूरक नाहींत काय?"

गुलाब मधेंच क्षणभर स्तब्ध राहिली. समोरच्याच एका तरुणीच्या फोटोवर नजर स्थिर करून ती पुनः म्हणाली,

" तुला माहीत नाहीं. समोरच्याच घरांत एक मुलगी रहात होती. सुंदर होती. फार जिव्हाळा वाटे मला तिच्याबद्दल. माझी छबी वारली ना? तशी दिसायची ती अगदीं! कधीं दारांत तर कधीं खिडकींत ती उभी राहिली कीं कशी भुकेल्या डोळ्यांनीं मी तिला पाहात असे. माझीच चांडाळणीची दृष्ट तिला बाधली असावी. कारण, स्मशानांत गोवऱ्या गेल्या असतील अशा क्षयी रोग्याशीं तिचं लग्न तिच्या पुण्यशील बापानं लावलं. मला अजुनी आठवतं, डोक्यावर अक्षता पडेपर्यंत ती धाय धाय रडत होती. वेश्येसारखी वेश्या मी! पण पोटच्या पोरीची ही अमानुष कत्तल पाहून रातभर रडलें. ही काय नीति? आमचं तसं नाहीं, इच्छेविरुद्ध जवळ येणाऱ्या कामुकाचं थोबाड रंगवण्याचं सामर्थ्य आमच्या चपलांत

आहे, कीं जें स्त्रियांच्या पातिव्रत्यांत नाहीं, धर्मांच्या नीतींत नाहीं, सार्वभौम सत्तेच्या कायद्यांत नाहीं—"

गुल्नार कांहींच बोलली नाहीं. गुलाबचा आवेश मात्र वाढतच होता. दीर्घ निश्वास सोडून ती म्हणाली,

"काय म्हणे, गायनावर लुब्ध होऊन कवि तिच्याशीं लग्न करतो. लेखकाला ठाऊक नसावं, संगीतानं बेभान होऊन विषारी नागासारखी डुलण्याइतकी सज्जन नाहीं माणसाची जात! तालसुरावर नाचण्या-इतकी फक्त भावनाच वेडी आहे. पण माणसाला बुद्धि देऊन परमेश्वर चुकला आहे. वेश्येशीं लग्न म्हणजे विस्तवाशीं खेळ आहे, हें तो कळ्याफुलाशीं खेळणारा कवि विसरला; तरी त्या पोरीला कळायला पाहिजे होतं, कीं कळ्यांचा भात होत नाहीं हें!"

इतकं बोलून होतां मात्र गुलाबचा आवेश ओसरला. गुल्नार तरी काय बोलणार? शांतताभंग करावा म्हणून गुलाबच पुनः म्हणाली,

"म्हणजे मी शाहणी म्हणून बोलत नाहीं. पण मी तरी काय करूं? अनुभवानं पिळवटलेलीं आंतडीं अशा धक्यानं बोलल्याशिवाय राहात नाहींत."

बराच वेळ दोघीहि स्तब्ध होत्या. पण मधेंच गुलाबला कसलीशी आठवण झाली. सारा गंभीरपणा विसरून ती मोठ्यानं हंसली,

"पण मी मुख्य तेंच विसरलें कीं!"

आणि आपली सारी वेशभूषा पलंगाजवळच्या मोठ्या आरशांत पाहात ती म्हणाली,

"हा लेखक कोण ठाऊक आहे?"

"कोण?"

पण याच वेळीं जिन्यांत पावलं वाजलीं.

" अगबाई, आले वाटतं ? " असं म्हणत गुलाब पळत पळतच सामोरी गेली. आणि निढांवलेल्या वहिवाटदाराप्रमाणं हंसत, पान चघळत येणाऱ्या तरुणाला लाडिकपणें बिलगत ती म्हणाली,

" मला फार फार आवडली तुमची गोष्ट ! तुम्हांला—? "

" दुसरीच गोष्ट फार आवडते ? "

" कोणती ? "

पण उत्तर देण्यापूर्वी त्यानं अशा कांहीं अर्थपूर्ण दृष्टीनं सभोंवतीं पाहिलं, कीं गुलनार उठून सरळ खालीं गेली. ती भरधांव जिना उतरत असतांच चुंबनाचा 'च्य' असा आवाज व दोघांचं निर्लज्ज हास्य तिच्या श्रवणीं आलं. तेव्हां स्वतःशींच ती गंभीरपणें म्हणाली,

" आणि हे आमचा उद्धार करणार ! स्वतःचा उद्धार करा म्हणावं आधीं ! "

---

# सुखस्वप्न

कोणी एका सुप्रसिद्ध साहित्यिकानं म्हणे असं लिहून ठेवलंय, कीं प्रत्येकाच्या आयुष्यांत लिहिण्याजोगं असं कांहीं तरी घडतंच घडतं. हें थोरांचं वचन खरं करण्यासाठींच असेल बहुदां, पण गणपतरावाच्याहि आयुष्यांत ती घटना घडून आली खरी !

वास्तविक, गणपतराव म्हणजे अगदीं साधासिधा मनुष्य ! कुणाच्या एकींत नाहीं, दोन्हींत नाहीं, मग मध्यांत कुठला आलाय पडायला ? प्रेम करून माणसं झोंपतात अशा रामप्रहरीं बिचारा खडबडून उठे; बहिणीनं चहा दिला, कीं साताला कचेरींत जाई आणि दुपारीं पोटाच्या पिशवींत चार घांस मोजून टाकले, कीं पुनः आपल्या कामाला लागे तें अगदीं चंदेरी रात उजडेपर्यंत ! ज्या पत्राच्या कचेरींत तो खर्डेघांशी करी, त्या पत्राच्या 'स्फुट विचारांत'

जरी तो हिटलर, चर्चिल प्रभृतींचे रहस्यस्फोट करी, तरी वस्तुतः शेजारणीची 'अंदरकी बात'हि त्याच्या गांवीं नसे. कारण एकच, कीं कुणी 'इथं पाणी मुरतंय' म्हटलं, कीं तो रस्ता त्यानं बदललाच! शिवाय, त्याचा स्वभाव तर घर आणि कचेरी यांना जोडणाऱ्या रस्त्यापेक्षांहि सरळ; आणि तशांतच खालीं बघून चालण्याची त्याला संवय! महात्म्याचे विचारहि इतके पवित्र, कीं शेजारून बाई चाल-लीय कीं म्हैस चाललीय हेंहि कधीं त्यानं सहेतुकपणें पाहिलं नाहीं. तात्पर्य काय, मुलींच्या शाळेंत मास्तर होण्याइतकी त्याची योग्यता. आणि मुलींचा मास्तर सायकलवरून पडेल, पण प्रेमांत पडणं कधीं शक्य तरी आहे कां? आणि प्रेम नाहीं तिथं भानगड कुठली! सिनेमा कंपनींतील दोन लेखकांप्रमाणं दोन बायकांचंहि कधीं जमत नाहीं असं म्हणतात. पण कोपऱ्यावरच्या नळावर भांडणाऱ्या बायकांनींहि एक मतानं सांगितलं असतं, कीं आमचे गणपतराव ना? अगदीं सज्जन माणूस! आणि सज्जन माणसाच्या आयुष्यांत लिहिण्याजोगं असं काय घडणार?

अट्टाहासानं अगदीं लिहायचंच म्हटलं तर फार फार म्हणजे 'किर्लोस्करां'त एकादं चरित्र! नाहीं म्हणायला, स्वारीचा जीवन-वृत्तांत मात्र 'उद्योग, उत्साह, उत्कर्ष'वर्धक असा होता खरा! कारण, मोठ्या पुरुषाप्रमाणं, बाप वारला तेव्हां शाळेबरोबर आशाहि सोडून घरीं बसणं बिचाऱ्याला भाग पडलं. पण रिकामा सुतार म्हणून घरच्या तुटपुंज्या सामग्रीवर एक छापखाना त्यानं सुरूं केला. सिनेमावाल्यांची मर्जी सांभाळून चौदाचे चोवीस केले, तेव्हां कसं बसं 'सोडचिठ्ठी'च्या नोटिसा छापण्यालायक दैनिक सुरूं झालं. आणि जेव्हां कुठं साडेतीन वर्षं सचोटीनं धंदा केला, तेव्हां

अकलेच्या भांडवलाशिवाय मिरवूं शकणारा साताहिकाचा संपादक तो झाला.

खरं पाहतां, या वयांत त्यानं ' गुलाबी गालावर ' किंवा ' वेणीं-तील फुलांवर ' कविता करायच्या. पण हे काव्यविषय पाह्यला त्याला सवड होती कुठं ! शिवाय, छापखान्यांतल्या कळकट पोरांचे काळे हात बघून तर त्याची रसिकता केव्हांच मेली होती. साह-जीकच, समोरच्या घरावरची " भाड्यानें देणें आहे " ही पाटी उन्हानं तडकून गेली तरी त्यानं कधीं पाहिलीहि नव्हती.

पण गुलाबी रंगांतच काय विलक्षण गुणधर्म आहे कुणास ठाऊक ! ती पाटी जाऊन जेव्हां त्या घराच्या खिडक्यांना गुलाबी रंगाचे पडदे लागले, तेव्हां नकळत त्याचं लक्ष तिकडे गेलं. आणि आठदहा दिवसांत जसे त्या समोरच्या अंगणांतील गुलाबहि बहरले, तेव्हां तर तो मनाशीं म्हणाला,

" इथं राह्यला आलंय तरी कोण असं ? "

त्याच्या या प्रश्नाचं उत्तर एकदां तो जेवत असतांना पोष्टाच्या शिपायानं ओरडूनच त्याला सांगितलं,

" देसाई मास्तर ! "

आणि कां कुणास ठाऊक, जेव्हां चार दोन मुली वरचेवर जाता-येतांना त्याला दिसल्या, तेव्हां तो मनाशींच हंसून म्हणाला,

" मास्तरसाहेबांना मुलगीहि आहे वाटतं एकादी ? "

एकदां तर अशाच शंकेनं खूप होऊन तो विडी ओढीत अस-तांना समोरच्या माडीच्या खिडकीचा एक पडदा सर्रकन् बाजूस सरला. त्यानं अधीरतेनं डोकावून पाहिलं. एक उण्यापुऱ्या उंचीची, काळीसांवळी, सुंदर नव्हे पण मोहक अशी सडपातळ तरुणी त्याच्या

दृष्टीस पडली. धुराचीं वलयं हवेंत सोडीत तिच्याकडे तो अनिमिष नेत्रांनीं पाहूं लागला. अंगणांतील बहरलेल्या गुलाबगेंदांकडे पाहात ती आपल्याच गाण्यामध्यें निमग्न होती. आपल्या गोड आवाजांत ती गुणगुणत होती,

" सुखकेऽदिन थेऽएक सपन थाऽऽ "

आणि मधुनच ती अकारण हंसे. त्या वेळीं तिच्या गालावर प्रगट होणारी खळी गणपतरावाला भारी चित्तवेधक वाटली. किती तरी वेळ तो तसाच पाहात राहिला असता. पण सहज तिची दृष्टि गणपतरावाकडे गेली मात्र—स्थानभ्रष्ट झालेला पदर सांवरून लाजल्याचा लाडका अभिनय करीत ती दृष्टिआड झाली.

आणि गणपतरावहि "अरेच्या, दोन वाजले कीं!" म्हणत कोटटोपी चढवून कचेरीस गेला.

* * *

दुसऱ्या कां तिसऱ्या दिवशीं असेल! दुपारीं गणपतराव जेवायला घरीं आला तेव्हां त्याला खरंच वाटेना. दारापाशीं सायकल ठेवीत असतांना दोनच पट्ट्यांच्या मखमली चपला त्याला दिसल्या. आणि मुलींच्या चपला या कामधेनुसारख्या असतात. त्या दारांत आल्या, कीं इच्छित साधायला मग अवधि लागत नाहीं. त्यानं अधीरतेनं पाहिलं, तों ती समोरची मुलगीच आपल्या विधवा बहिणीशीं बोलत खोलींत कॉटवर बसलेली त्याला दिसली.

त्याला पाहून ती उठून जाऊं लागली. तेव्हां क्षणाचाहि विलंब न लावतां कोट खुंटाळ्याला अडकवीत तो म्हणाला,

" बसा, बसा, मी निघालोंच जेवून!"

आणि जेवतांना त्याला वाटलं, कीं रोजचंच थंडगार अन्न आज

413184

कसं चवदार झालं आहे. तो त्यावर ताव मारीत असतांना बाहेरूनच त्याला ताईनं विचारलं,

" शरद निघाल्या रे! तुझा ' किर्लोस्कर ' नेऊं देत कां जरा?"

हात धूतच तो घाईनं उत्तरला,

" हो, हो, हवा तर ' झंकारहि ' न्या म्हणावं. आंतल्या खिशांत आहे बघ माझ्या."

आणि याचा परिणाम व्हायचा तोच झाला. गणपतरावाचं घर म्हणजे शरदचं मोफत वाचनालय तर झालंच! पण समोरचे वृद्ध मास्तरहि नियमानं जाऊं येऊं लागले. एकदां सहज त्यांनीं चहाला बोलावलं तेव्हां तर गणपतराव मनाशीं म्हणाला, " घरोबा या शब्दाचा अर्थ आणखी काय असणार बरं?"

शरदला तर ताईचा इतका लळा लागला कीं—

काय झालं, शरदला नवीन आणलेली रेकॉर्ड लावण्याची एकदां लहर आली. पण तिचे बाबा तर जेवून झोंपलेले! ती मनाशीं म्हणाली सुद्धां,

" म्हातारीं माणसं रातभर जागून दुपारींच झोंपतात कशाला कोण जाणे!"

तेव्हां ताईकडे येऊन ती अगदीं हटूनच बसली,

" चला ना, मी फोनो ऐकवतें तुम्हांला."

" असं ग काय तुझं?" ताई संकोचानं म्हणाली, " आपण लहान कां आहोंत, असं अवेळीं फोनो ऐकायला?"

" हो, मी लहानच आहे!"

आणि असं म्हणून शरदनं लहान पोरीप्रमाणं गाल फुगवून जो मुग्धपणाचा गोड अभिनय केला, तो आपल्या खोलीं[illegible]आंत डोळे भरून पाहात, गणपतराव आंतूनच म्हणाला,

" ताई, जाईनास कां जरा. "

गणपतरावाच्या या अनपेक्षित अस्तित्वानं चपापून, शरदनं आपल्या ओठांचा चंबू करून, तो आपल्या डाव्या हाताच्या बोटांनीं लपवण्याचा जो अभिनय केला, तो तर गणपतरावाला भारीच मोहक वाटला.

* * *

आणि जसजसे असले प्रसंग वरचेवर घडूं लागले, तेव्हां गणपतरावाला थोडं फार समाधान वाटूं लागलं. कारण शरद त्याच्या दृष्टिपथांत येईपर्यंत त्याचं असं प्रामाणिक मत होतं, कीं कांहीं माणसं केवळ प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यासाठींच जन्माला येत असतात. अनुकूल घटना त्यांच्यासाठीं नसतातच ! आणि अशा दुर्भाग्यापैकींच आपण एक आहोंत. कसलं सुख आहे आपणांला ? आईचं प्रेम—यशवंतांची कविता वाचूनच तें कल्पिलेलं ! वहिणीचं सुख—किती सुखद स्वप्नं रंगवलीं होतीं आपण ताईच्या संसाराचीं ! संसाराचा श्रीगणेशा तिला घालून दिला; पण लहान मुलाप्रमाणं दैवहि श्रीगणेशांत चिरकाल रमत नाहीं हेंच खरं ! राहातां राहिला बापाचा आधार—पण कॉलेज तर राहोच, मॅट्रिक झालों हेंच नशीब !

अशा परिस्थितींत शरदचा सहवास म्हणजे वाळवंटांत चुकलेल्या कोकिळेस आम्रमोहराची छाया लाभावी, तसंच होतं हें ! खरं पाहातां, गणपतरावासारखा सुखाला बुजणारा माणूस अशा कविकल्पनांत रमणार नाहीं. पण शरद चुरूचुरू बोलूं लागली कीं त्याला वाटे, जाणून बुजून उगीच माणसानं सुखासीन राहणं तरी चांगलं कां ? वृक्षाचीं मुळं ओल्या जमिनीकडेच ओढ घेतात. त्याच्या मनाचीहि अशीच चलबिचल झाली. आणि अशा चम-

त्कारिक सुखाचा तो अनुभव घेत असतांना एकदां शरद धांवतच दारांत आली आणि म्हणाली,

" हें काय ओळखा बघूं ! "

" वा:, चोर मालकाचीच जबानी घेऊं लागला कीं ! "

शरद फणकाऱ्यानं म्हणाली,

" काय चोरी केलीन् हो मीं ? "

" एक दोन गोष्टींची कीं काय ! "

" एक तरी सांगा ना. "

" हातांतली कादंबरीच घ्या कीं ! "

" पण दारं उघडीं टाकून झोंपावं कशाला मालकानं ? "

या बिनतोड प्रश्नाला उत्तर देतां आलं नाहीं, तरी यानं शरदचं कौतुकच वाटलं त्याला. कारण, आपण काल कादंबरी वाचतां वाचतांच झोंपलों आणि जागं होतांच ती नाहींशी झाल्यानं आपण तिला किती किती व कुठं कुठं शोधली, याचीच त्याला गंमत वाटली. हें जाणून ताई तेव्हां म्हणाली होती,

" कादंबरी शोधतोस काय ? "

" कां ? "

" ती नेलीय तुझ्या शरदनं. "

ताईच्या 'तुझ्या शरदनं' या शब्दांनीं गणपतराव केवढ्यांदा चपापला ! पण हें बघून ताईच पुढं म्हणाली होती,

" खरंच, तुझा फोटो हातांत घेऊन ती उभी असतांना मीं तिला काल बरोबर पकडलं. मीं थट्टेत म्हटलं देखील तिला, सांगूं कां दादाला ? "

यावर गोंधळलेल्या शरदचं ताईनं असं कांहीं रसभरित वर्णन केलं होतं, कीं तें सारं सारं गणपतरावाला आतांहि स्पष्ट दिसूं लागलं. किती तरी वेळ तो शरदकडे टक लावून पाहूं लागला. तेव्हां शरदनं लाजून मान वळवली आणि गणपतराव भानावर येऊन म्हणाला,

" या ना आंत. "

शरद दांतांनीं पदराचं टोंक चावीत म्हणाली,

" म्हटलं, ताई मला ' ये जा ' म्हणते. "

शरदच्या या खुलाशानं गणपतरावाला मनस्वी संतोष वाटला. त्यानं निरखून तिच्याकडे पाहिलं. टेबलावर कादंबरी ठेवून तिच्या पानांशीं ती खेळत होती.

कौतुकातिशयानं तो तें पाहूं लागला. एका पानावर तांबड्या पेन्सिलीनं अधोरेखित केलेला मजकूर त्याच्या दृष्टीस पडला. तो उगीचच वाचूं लागला—

" कथेंतील नायिका अद्याप आपल्या समाजांत जन्मायची आहे.. प्रेमनिष्ठेच्या, समान हक्काच्या गप्पा ती फक्त वल्लभाशींच मारते. पण आचरणाची पाळी आली, कीं बापासमोर तिला मुकेपण येतं. आणि असं होतं तोंपर्यंत तिच्या रमणाचा प्रेमप्रसंग हें एक त्याचं सुखस्वप्नच ठरण्याचा संभव नाहीं काय ? "

आणि त्याच्या शेजारींच " साफ खोटं " अशीं तांबडीं अक्षरं पण त्याला दिसलीं.

तेव्हां हंसून त्यानं म्हटलं,

" कुणी लिहिलंय हें ? "

" मीं ! "

का कोण जाणे, शरदच्या गालावर गुलाबी रंगाच्या पिचकाऱ्या कशा एका क्षणांत उडवल्याचा आभास झाला. गणपतरावाला कळून चुकलं, कीं जीवनांतील मोठं साहस करण्याची वेळ ती हीच! तो घोगऱ्या आवाजांत म्हणाला,

" बैस तर खरी ! "

मंत्रमुग्धेप्रमाणं शरद टेबलाला रेलून बसली. पण अनपेक्षितपणें उद्भवलेल्या शांततेमुळं तिचा ऊर धडधडूं लागला. आपले डोळे जड होताहेतसं वाटून तिनं ते क्षणभर मिटून धरले. आणि त्याचवेळीं त्याच्या कांपऱ्या हाताचा स्पर्श तिच्या मांसल बाहूला होतांच तिची सारी देहलता कशीं नखशिखांत कांट्यांनीं भरून गेली. कर्णरंध्रांतून तेव्हां चारच शब्द तिच्या हृदयाशीं जाऊन भिडले,

" शरद, तूं माझी होशील ? "

ती कांहींच बोलली नाहीं. मात्र सभोंवतीं कोणी असेल कां, अशा भयभीत नजरेनं तिनं सर्वत्र पाहिलं. कोणी नाहीं असा विश्वास वाटतांच तिनं आपणहून त्याच्या वक्षावर आपलं मस्तक टेकलं. आणि—

अगदीं ऐनवेळींच ताईनं रसभंग केला,

" शरद, बाबा बोलावतात बघ तुला. "

चटकन् शरदनं स्वतःला सांवरून घेतलं. पळतच ती घरला निघून गेली. ती घरांत जाईतों गणपतराव तिला पाठमोरी पाहात होता. तो आज इतक्या आनंदांत होता, कीं आकाशांत घिरट्या घालणाऱ्या घारीनं जमिनीवर झडप घालून कांहीं तरी पळवलं आणि एका कोंबडीनं खालीं उगीचच आक्रोश केला, याकडेहि त्याचं लक्ष गेलं नाहीं.

आणि दारांत उभा असलेला टांगा दिसूनहि त्याला विचार करण्याइतकं महत्व देण्याची आवश्यकता त्याला वाटली नाहीं.

* * *

मात्र शरद गेली ती पुन्हां आलीच नाहीं.

तेव्हां त्या साऱ्या सूचक चिन्हांचा अर्थ त्याच्या ध्यानीं आला. लवकरच शरदच्या दाराला तोरण पण लागलेलं त्याला दिसलं. तें पाहून फक्त एकदांच त्यानं अर्धवट मनाशीं म्हटलं,

"साफ खोटं!"

आणि असं म्हणून तो खिन्नपणें हंसला, तेंहि एकदांच!

# कोकिळा

"कूऽहूऽऽकूऽहूऽऽ"

अंगणांतील आम्रवृक्षावरील कोकिळेनं कूजन करावं, आणि त्याचवेळीं गाणं संपवून, सुहास्य करीत उषेनं खिडकीबाहेर पहावं, हा दिनक्रम अगदीं ठरलेला! बाहेरचा देखावाहि किती रमणीय असायचा त्यावेळीं! बालभानूच्या सोनेरी किरणांनीं खुलून दिसणारी ती आम्रमंजिरी, सुगंध उधळणाऱ्या त्या हंसऱ्या कळ्या, पांखरांना खेळवणारीं तीं टपोरीं फुलं, आणि दंवबिंदूंनीं अलंकृत झालेल्या बागेंतल्या त्या तरुवेली. किती तरी वेळ उषा हीं सारीं दृश्यं मनमुराद पहात राही! दिनक्रमानुसार घरा-बाहेर पडणाऱ्यांचीं मनंसुद्धां कशीं प्रफुल्लित होत हें पाहून! कारण, उषेचा हंसरा चेहरा पाहिला, कीं तिच्या नुक्त्याच संपलेल्या मन-

हारी गाण्याचे सुरेल आलाप अजुनी वातावरणांत तरंगत असल्याचा भास होई. झुळुझुळू वहात आपल्या मधुर खळखळीनं आनंदाची खैरात करणारा निर्झरच जणुं वहात होता तिथं !

नित्याप्रमाणं आजहि कोकिळेचं कूजन श्रवणीं येतांच उषेनं हंसत बाहेर पाहिलं. मात्र आज तिच्या चेहऱ्यावर आनंदाइतकीच अधीरताहि भरून राहिलेली दिसत होती. डोळ्यांआड येणारीं लतापर्णें करपल्लवांनीं दूर करीत तिनं पाहिलं; आणि त्याच वेळीं त्या प्रशांत वातावरणांत मंजुळ स्वर घुमले,

" आई, आई ! "

आनंदातिशयानं धांवतच उषा दारांत आली. एक सडपातळशी सुंदर तरुणी पळतच आंत येत होती. पंधरावीस वर्षांच्या आंतबाहेरच वय असावं तिचं; पण अल्लडपणा मात्र पांचसहा वर्षांच्या पोरीचा दिसत होता. तिचे अवखळ हावभाव पाहून कुणालाहि हरित तृणावर मुरडणाऱ्या लतिकेची आठवण झाली असती. आणि खरंच, फुगीर गालावरचे ते टपोरे गुलाब फिकट हिरव्या रंगाच्या झिरझिरीत पातळाआडून खुलून दिसणाऱ्या तिच्या तनुलतेवर किती शोभून दिसत होते. मनाची ओजस्विता दर्शवणारे ते तेजाळ डोळे, सरळ स्वभावसूचक अशी ती चाफेकळी नासिका, आणि अल्लडपणाचं प्रतीकच असं तें सात्त्विक सौंदर्य ! हें सारं पाहून वात्सल्याचं उधाण उषेला अनावर झाल्यास त्यांत नवल तें काय ? धांवत येऊन तिनं कमरेभोंवतीं हातांचा विळखा घालतांच, तिचा प्रेमातिशयानं मुका घेऊन उषा हंसली,

" कोकिळे ! "

" कूऽहूऽऽ "

आणि त्याचवेळीं बाहेरच्या कोकिळेनं पुनः कूजन केलं. पण कां कोण जाणे, उषा किती चपापली यानं! तिनं बाहेर पाहिलं; कोकिळेनं मान वर करतांच उषेच्या मुखावर कारुण्याची छाया पसरतांना तिला दिसली. मातेच्या मुद्रेवरील या अकल्पित फरकाचं तिला नवल वाटलं. पण काय करावं, हें न कळून मिठी अधिकच घट्ट करीत ती उद्गारली,

" आई!"

उषेचं हृदय भरून आलं होतं; मस्तक टेकतांच तिच्या भरल्या उराची ऊब कोकिळेला किती समाधानाची वाटली. मस्तकावर मातेचे उष्णाश्रु ठिबकतांच कोकिळेनं तिला आंत नेलं आणि तिला पलंगावर बसवून डोळे टिपीत ती सद्गदित स्वरांत म्हणाली,

" हें ग काय तुझं, आई? आतां ते येणार; त्यांना काय वाटेल?"

मुलीचा हा समंजसपणा पाहून उषेला भडभडून आलं. हुंदका आंवरण्याचा प्रयत्नहि न करतां ती म्हणाली,

" खरंच, तुझी आई मी शोभतसुद्धां नाहीं."

कोकिळेचा कंठ यानं दाटून आला. आईच्या मांडींत आपलं मुख लपवून ती असहाय्यपणें म्हणाली,

" आई, नको ग असं बोलूं!"

शकुंतलेनं माहेर सोडतांना वर्णिलेल्या करुणाजनक प्रसंगाची पुनरावृत्ति जरा निराळ्याच तऱ्हेनं होत आहे, असं कोकिळेला वाटलं. बराच वेळ त्या त्याच अवस्थेंत होत्या; पण घड्याळाचा ठोका पडतांच, " अगबाई, साडेआठ तर वाजले." अशा अर्थाची मुद्रा करून कोकिळा जागची उठली. आंत जात ती म्हणाली,

"मी चहा करतें. ते येतील पहा हं जरा."

आणि असं म्हणून ती आंत गेली, दृष्टिआड झाली, तरी उषा तशीच पहात राहिली तिकडे!

कोकिळेवरच तिचा सारा जीव होता. केवळ मुलीसाठींच कुणाचीहि भीड न ठेवतां तिनं तिचं संगीतच नव्हे, तर शिक्षणहि पूर्ण केलं होतं. गणिकेची मुलगी म्हणून समाजांत तिची अवहेलना होई; पण आपल्या पोरीला त्या किळसवाण्या जीवनाचा गंधहि नसावा, या एकाच हेतूनं उषेनं वैराग्याचं जीवन स्वखुषीनं स्वीकारलं होतं. ग्रामोफोन कंपन्यांना गाण्यांच्या रेकॉर्ड्स देऊन, तर कधीं रेडिओवर कार्यक्रम करून, आपणां दोघांची उपजीविका करण्यांत तिला किती तरी समाधान वाटत होतं. कारण, कधीं कां होईना, पण आपल्या या नव्या व्रताचं आणि मुलीच्या सद्गुणांचं चीज होईल, अशी आशा तिच्या हृदयांत सारखी वसत होती.

आणि ती सफलहि झाली. कॉलेजच्या गॅदरिंगच्या वेळीं तिच्या काव्यगायनावर विराग कवि इतका संतुष्ट झाला, कीं तेव्हां झालेल्या त्यांच्या ओळखींतूनच प्रेमाचा जन्म होऊन, त्याचं रूपांतर त्यांच्यां लग्नांत झालं. कोकिळेच्या नांवावर बँकेंत असलेल्या अलोट संपत्तीसाठींच ही सुधारणा विरागनं स्वीकारली, अशी टीकाहि तेव्हां कांहीं पत्रांतून झाली. पण, जाहिरातीच्या दीडदमडीसाठीं स्वतःशीं प्रतारणा करणाऱ्यांना, पैशासाठीं कां होईना पण, इष्ट असं त्यांचं हें सुधारणामूलक धाष्टर्य वावगं वाटल्यास त्यांत नवल तें काय?

कांहीं असो, त्यांच्या लग्नामुळें उषेच्या मनावरचं दडपण थोडं ओसरलं होतं, एवढं खरं! पण तें पूर्णपणें मात्र नाहींसं झालं नव्हतं. कारण, हृदय हलकं होतांच होणारा निर्मळ आनंद तिच्या मुखावर

कांहीं नेहमीं दिसत नव्हता. मुलीच्या कौतुकांत विरजण घालणारी असमाधानाची छाया कधीं कधीं तिच्या मुखावर वावरतांना दिसे. आणि अशा वेळीं नळकत ती आपल्या आवडीचा चरण गुणगुणे,

**" काकांनीं परिपोषिला न कळतां जाता त्वरें बोलुनी।**
**भासे कोकिळ मात्र तो मज सदा त्या रंगतां कूजनीं। "**

आणि मनसोक्त रडेतों ती गाणं गात राही. आतांहि ती गाऊं लागली; पण गातां गातां ती मध्येंच थांबली. अश्रू पुशीत तिनं मागं पाहिलं. कारण, समोरच्या मोठ्या आरशांत विराग तिला येतांना दिसला. स्वागतार्थ कृत्रिमपणें हंसण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली,

" केव्हां आलांत ? "

" आतांच ! "

" मग बोलला कां नाहीं ? "

" गाणं ऐकत होतों तुमचं. "

" इश्श, माझं ? "

" हो, तुमचं. "

" म्हटलं, तुमचीच कविता आहे ही ! "

" कविता माझी; पण त्यांतलं काव्य जाणलंत तुम्हीं. "

" कशावरून ? "

" हे डोळे सांगतात कीं ! "

उषेच्या डोळ्यांतील आर्द्रता अजुनी गेली नव्हती. पण याची जाणीव विरागकडून मिळाल्यामुळें ती अधिकच गंभीर झाली बराच वेळ ती कांहीं बोलली नाहीं. तेव्हां विरागच म्हणाला,

" मी एक विचारूं ? "

" हो. "

" पुष्कळ वेळां मी हें बघतों. "

" हें म्हणजे ? "

" हे चरण गातांना तुमचे डोळे कां द्रवतात ? "

आपल्या दुःखाची शंका दुसऱ्याला आली म्हणजे माणूस हतबल कां होतो कळत नाहीं. उषा कांहींच बोलली नाहीं. मात्र आसवांची माळ तिच्या नेत्रांवाटें घळघळा ओघळूं लागली. हें सहन न होऊन विराग म्हणाला,

" माफ करा, मी चुकलों. "

" कांहीं तरीच. "

" खरंच, मी विसरलों—"

" काय ? "

" कांहीं दुःखं अशीं असतात, कीं तीं कुणालाहि सांगावीशीं वाटत नाहींत ! "

" पण कांहीं माणसं अशीं असतात, कीं त्यांना सारं कांहीं सांगावंसं वाटतं ! "

" मग—सांगूं शकाल मला ? "

" एक भीति वाटते ! "

" कसली ? "

" आतांपर्यंत माझी पोर समाजानं हेटाळली, पण—"

" पण काय ? "

" रागावूं नका. वचन द्याल ? "

" हें घ्या. "

" तुम्हीं नाहीं ना तिला कधीं दूर करणार ? "

" उषाबाई, विश्वास नाहीं माझा ? "

" क्षमा करा. मी नव्हे, आईचं हृदय बोललं तसं !" आंवढा गिळून उषा बोलूं लागली, " सारं सारं कांहीं सांगतें मी ! सांगायला लाज--नव्हे, भीति वाटते. तुम्हीं पण कठोर मनानंच ऐका."

त्यावर थोडा वेळ थांबून उषा सांगूं लागली,

" कोकिळा माझी मुलगी नसती तर तिला या गोष्टीचा अभिमान वाटला असता. तुम्हांलाहि कष्ट झाले नसते. कारण, समाजानंच कौतुक केलं असतं तिचं ! पण दुर्दैव बिचारीचं, कोकिळा घरंदाज नाहीं."

व्याकूळ अंतःकरणानं उषेनं उशींत तोंड खुपसलं; तेव्हां आंवढा गिळून विराग म्हणाला,

" हें काय उषाबाई, मला कां तें ठाऊक नाहीं ?"

" नाहीं !"

" काय ?"

" उषा माझीहि मुलगी नाहीं."

विराग दचकून उद्गारला,

" म्हणजे !"

" बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट ! मी पहांटें उठलें होतें. तंबोरा जुळवून मी गाण्याला बसणार; पण त्याच वेळीं नूतन बालकाचं पहिलं आक्रंदन माझ्या कानीं आलं. जिवाचा कान करून मीं ऐकलं. माझ्याच बागेंत तें रडत होतं. कंदील घेऊन मीं दार उघडलं. पाहतें तों पायरीवरच एक पोरका प्राण ! दयेचा धर्म सांगणारी जनता उबदार पांघरुणाखालीं झोंपली होती. आणि एक अनाथ अर्भक थंडीवाऱ्यांत आईसाठीं जीव तोडीत होतं. आई कुठं होती त्याची कुणास ठाऊक ? विराग, लाज वाटली होती तिला आपल्या आईपणाची--"

विरागनं पाहिलं. तिच्या डोळ्यांतील आर्द्रता नष्ट होऊन, त्वेषाचा आवेश तिथं दिसत होता. ती बोलतच होती,

" रागावूं नका. मी स्पष्टच बोलतें; तुम्हां घरंदाजांच्या घरांत मैत्रिणी, बहिणी, पत्नी या साऱ्या इमानी असतील. पण किती बेइमानी आया उजळ माथ्यानं त्यांत नांदत असतील याची गणति कुणाला आहे? बहीण, पत्नी, नव्हे–मैत्रीणीचं नातंसुद्धां आम्हांला वर्ज्य! कारण आम्ही पापी! कबूल करतें मी–आम्ही पापी आहोंत. पण हेंहि तितकंच खरं, कीं वाटेल तें पाप आम्ही करूं; पण पोटचं पोर रस्त्यावर फेंकण्याचं पाप आमच्याहातून कालत्रयीं होणार नाहीं. पोटासाठीं पाप करणाऱ्यांना तें साधत नाहीं. कारण, खाल्लं अन्न मनाला जागं करतं. पण—प्रेमाची मदिरा माणसाला बधिर करते. आणि म्हणूनच, प्रेमाचं प्रदर्शन असं दारोदार होतं. माझ्या-वर विश्वास ठेवा विराग, तें अर्भक घरंदाजांचं होतं!"

विरागच्या कविहृदयाला या कटु सत्याचे आघात तडातड् बसत होते. तरी उषेचा आवेश ओसरला नाहीं. तिच्या वाक्शरांच्या संगिनी झडतच होत्या,

" विनाश्रित अर्भक पाहून तुम्हां लोकांना दयेचा पान्हा फुटतो आणि 'अनाथबालकाश्रमाचे' मजले चढवता आपण! कारण काय, तर एकाहि आईचा ऊर पाझरत नाहीं म्हणून! मात्र मला वात्सल्याचं भरतं आलं. मला काय, बोलून चालून पापाची पुतळीच मी! मीं सरळ उचलून तो मांसाचा गोळा पदरांत घेतला. 'ट्यां-ट्यां' करीत तें आईला बोलवीत होतं. पण त्याची आई? विराग, उगवत्या अरुणाच्या साक्षीनं मीं त्याला शपथ दिली, " मी तुझी आई." आणि विराग, त्याच क्षणीं तें सत्संतानसुद्धां पापी ठरलं."

उषेचा आवेश पार मावळला. असहाय्य होऊन ती रडूं लागली. पहिला उमाळा ओसरतांच तिनं रडूं आवरलं. किती तरी वेळ तीं दोघं स्तब्धच होतीं. टक् टक् असा घड्याळाचा आवाज ऐकत, शांत पण कांहींशा घोगऱ्या आवाजांत उषा एकच वाक्य उद्गारली,

"तीच माझी कोकिळा !"

आणि त्याच वेळीं 'खळ्' असा मोठा आवाज होऊन त्या दुःसह शांततेचा भंग झाला. दोघांनींहि दचकून मागं पाहिलं. कोकिळेच्या हातांतला चहाचा ट्रे दारांतच गळून पडून किटली-कपाचे तुकडे तुकडे झाले होते. धांवतच उषा पुढं झाली. बेशुद्ध होऊन आईच्या अंगावर कोलमडतांच कोकिळा किंचाळली,

"आई, आई !"

आणि त्याच वेळीं अंगणांतली कोकिळासुद्धां ओरडली,

"कूऽहूऽऽकूऽहूऽऽ!"

---

# पुढारी

गिरणीचा भोंगा झाला !

वारुळांत मुंग्यांची रीघ लागावी, तसा मजुरांचा लोंढा त्या गिरणीच्या फाटकांत शिरूं लागला. आणि कबुतरं खुराड्यांत शिरतांच अंगण मोकळं व्हावं, तसं दहाबारा मिनिटांतच त्या गिरणीचं तें भव्य पटांगण मोकळंहि झालं.

गिरणीचा दुसरा भोंगा वाजला.

कामाला सुरवात करण्याचा हा नेहमींचा संकेत ! पण तो मिळतांच भराभर मजूर आपापल्या वार्डांबाहेर पडले. आणि गिरणीचं तें पटांगण पुनः माणसांनीं खच्चून भरलं. सर्वांनीं एकच गर्जना केली,

“ मजुरांचा विजय असो ! ”

एकजात मजूर कसे कष्टांनीं झिजून निघाले होते; पण त्या आरोळींत मात्र उत्साह आणि विश्वास अमूप होता.

कचेरीच्या दारावरच्या शिपायाला या अकल्पित वावटळीचा विस्मय वाटला. धांवतच तो आंत व्यवस्थापकाकडे गेला आणि गोंधळून म्हणाला,

" साएब, संप केलाया जणूं मजुरांनीं ! "

हातांतली जळती सिगार तशीच टाकून आनंदराव खुर्चीतून उठला; आणि बाजूच्या दारांतून गॅलरींत हजर झाला. त्याला पाहातांच मजुरांनीं पुनः आपला जयजयकार केला. त्या सर्वांना शांत होण्याची हातानं इशारत देऊन आनंदराव म्हणाला,

" लोक हो, शांत व्हा ! शांत व्हा ! "

आणि शिपायांनीं आज्ञा पाळावी, तशी त्या सर्व मजुरांनीं एकदम शांतता धारण केली. आनंदराव गॅलरींतूनच बोलूं लागला,

" आज आपण संप का पुकारणार आहांत ? "

त्यावर एकच आक्रोश अंतराळीं घुमला,

" होय, होय ! "

या हजर जबाबानं आनंदराव एकदम गंभीर झालासा दिसला. क्षणभर थांबून तो बोलूं लागला,

" संपाचा हट्ट आपण धरावा या आपुलकीचा आम्हांला आनंद वाटतो. पण त्याबरोबरच अकल्पितपणें आपण संप करावा याचा मात्र विषाद वाटतो. "

आनंदरावाचे हे शब्द ऐकतांच सर्व मजुरांनीं आपलीं तोंडं एकदम आपल्या पुढाऱ्याकडे वळवलीं; तेव्हां विठ्ठलरावाला कळून

चुकलं, कीं याचं उत्तर देण्याचं काम सर्वांनीं आपल्यावरच सोंपवलं आहे. तो पुढं होऊन आवेशानं उत्तरला,

" हा संप अकल्पित नाहीं. याचीं कारणं तुम्हांला माहीत आहेत. "

तेव्हां आनंदराव त्याला उद्देशून म्हणाला,

" आपण या संपाचे कर्णधार दिसता ? "

" हो, आणि याचा मला अभिमान वाटतो. " विठ्ठलरावाचा आवेश कायम होता. तो म्हणाला, " मालकापेक्षां मजुरांच्या जीवनाशीं समरस होण्यांतच मला अधिक माणुसकी दिसते. "

पुनः एकच आरोळी दुमदुमून राहिली,

" विठ्ठलरावकी जय ! "

विठ्ठलरावावरील लोकांची ही श्रद्धा पाहून आनंदरावाला विस्मय वाटला. तो दीनवाणीनं म्हणाला,

" लोक हो, हा अविचार तुम्हीं करूं नका. तुमचा आमचा आजवरचा जिव्हाळा ध्यानीं आणा. "

" रातपाळीनं राबवून घेण्यांत तो प्रगट झाला आहे. "

यानं मात्र आनंदराव चमकला. तो विठ्ठलरावाला म्हणाला

" पण आतां सहा सहा तासच काम आहे ना ? "

" पण त्याबरोबर तुम्हीं पगारकपातीची भाषा काढलीत ! दहा दहा तास राबवून पगारवाढीची जरूरी तुम्हांला भासली नाहीं. "

तेव्हां काकुळती आल्यासारखं करून आनंदराव कांहीं तरी उत्तरला,

" हें पाहा, हा वाद असा प्रश्नोत्तरांनीं सुटण्यासारखा नाहीं. मी आतां मालकांना फोन करतों; कार्यकारी मंडळाची सभा बोलावतों आणि लवकरच तुमचीं गाऱ्हाणीं—"

पण त्याला बोलूं न देतां विठ्ठलराव म्हणाला,

"हें बघा, हीं संस्थानी आश्वासनं आम्हांला नकोत! खुशाल तुमच्या सभा भरवा आणि मगच आम्हांला बोलवा."

आणि एवढं बोलून होतांच मजुरांना उद्देशून तो म्हणाला,

"बांधव हो, अशा आश्वासनांना तुम्हीं भुलूं नका, फसूं नका. तुम्हीं माझ्यावर विश्वास टाकला आहे, त्यावर विसंबून असा. लक्षांत ठेवा, तुमचा पुढारी म्हणून जरी मी मालकांशीं मिसळत असलों तरी मी श्रीमंतांचा गुलाम नाहीं. मी तुमचा, गरिबांचा नोकर आहे. माझ्या अंगांत रक्त आहे, तोंपर्यंत तुमच्या अन्नांतील एकहि घांस मी कमी करूं देणार नाहीं. तुम्हीं कामकरी-शेतकरी हाच माझा देव आहे. पण एक विसरूं नका, उपाशी मरण्याची पाळी आली तरी कमी पगारावर या गिरणींत फिरकूं नका."

विठ्ठलरावावर लोकांचा विश्वास विलक्षण होता. खांद्यावर तसेच कोट टाकून सारे मजूर गिरणीबाहेर पडले आणि पटांगण रिकामं झालं, तरी हवेंत निनाद घुमतच राहिले,

"विठ्ठलरावकी जय!"

आणि त्याच वेळीं मालकांची नवी करकरीत पेकार्ड गाडी आंत शिरली. मालक उतरले ते सरळ कचेरींत गेले. तेथें आनंदराव हर्षभरानं सिगार फुंकीत उभा होता. मालकांना पाहून त्यानं सिगार विझवली आणि हंसून म्हटलं,

"विठ्ठलरावाची कमाल आहे बुवा!"

आणि त्याच वेळीं विठ्ठलरावहि आंत आला. त्याला पाहून तो म्हणाला,

" विठ्ठलरावकी जय ! "

तरीहि शेटजींची मुद्रा गंभीरच होती. कसला तरी विचार करीत ते म्हणाले,

" विठ्ठलराव, हें संपाचं प्रकरण तुम्हीं काढलंत खरं ! पण हा संप पंधरा वीस दिवसांत मिटेल ना ? मला तर भाव वाढण्याची लक्षणं स्पष्ट दिसतात. तेव्हां–? "

" संप मिटवण्याची किल्ली काय आपल्याच हातीं आहे कीं ! " विठ्ठलराव मुरब्बी हास्य करून म्हणाला, " माझी खात्री आहे, या महिन्यांत कांहीं भाववाढीला काल अनुकूल दिसत नाहीं. पुढच्या महिन्यांत बघूं–तोंपर्यंत काय, रातपाळीनं काढलेला माल पुजूनच ठेवायचा ना ? त्याऐवजीं गिरणीच बंद ठेवलेली काय वाईट ? नाहीं तरी, दोन तास काम कमी करायची पाळी आली होतीच कीं ! भीत भीत पगारकपातीची भाषा तुम्हीं काढलीत; पण बेट्यांना संपावर काढून पगारबंदीची सोय मीं कशीं सहज केली पहा तरी—"

" पण उद्यां भाववाढीच्या तयारीसाठीं—"

" या महिन्याअखेर खात्रीनं संप मिटतो. " विठ्ठलराव म्हणाला, " घरीं बसून काय उपाशी मरणार लेकाचे ? भाव वाढतांच निदान आठ तास तरी काम करावं लागणारच ! पगार कायम करायला मग तुमचं तरी काय जातंय ? आपोआप पुनः येतात लेकाचे, ' मजुरांचा विजय असो ' करीत ! "

येवढं बोलून झाल्यावर मात्र विठ्ठलरावाचा आवेश ओसरला आणि मनमुराद भुंकल्यानंतर पाळीव कुत्र्यानं मालकाकडे तुकड्याच्या आशेनं पाहावं, त्याप्रमाणं शेटजीकडे लाचार दृष्टि टाकीत तो खुर्चीवर बसला.

शेटजीहि खुर्चीवर बसले आणि टेबलाच्या खणांतून कसलीशी लंबट वही काढून, त्यावर त्यांनीं कांहीं तरी लिहिलं; आणि एक पान फाडून तें विठ्ठलरावाच्या हातीं दिलं.

दोघांनींहि एकमेकाकडे पाहिलं !

दोघांच्याहि मुद्रेवर समाधान विलसत असल्याचं आनंदरावाला स्पष्ट दिसलं आणि तोहि आनंदित झाला !

---

विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

# लग्नाचा अपघात

वरातीच्या ड्रायव्हरला भारी किंमतीचा भरजरी शेला मीं दिला, याचं माझ्या 'बोडक्या' मित्रांना किती आश्चर्य वाटलं. लग्न-समारंभाच्या वावग्या खर्चावर कॉलेजच्या व्यासपीठावरून प्रखर टीका करणारीं माझीं मतं मी स्वतःच्याच विवाहप्रसंगीं विसरलों, म्हणून केवढा गहजब केला त्यांनीं ! त्यांचं म्हणणं होतं, लग्नाच्या खर्चाचा दिमाखच दाखवायचा तर सरकारनं जामीन मागितलेलीं वृत्तपत्रं काय कमी होतीं ? कैलासवासी 'मोठ्यां'च्या स्मारकनिधीची पिशवी काय रिकामी नव्हती ? पोटार्थी देशभक्त काय मला कोल्हापुरांत सांपडलाच नसता ?

पण खरं सांगूं ? व्यक्तीच्या दानतीनं समाजाचा दारिद्र्यरोग हटवण्याचा मूर्खपणा मला स्वतःला पसंत नाहीं. त्यापेक्षां व्यक्तीचा

अनुचित विलाससुद्धां मला क्षम्य वाटतो. सागराला ओहोटी लागली म्हणून नदीचा कालवा त्याला जोडणं, शाहाणपणाचं ठरेल कां? आणि म्हणूनच, भिकाऱ्याला पैसा देणाऱ्या मूर्खापेक्षां रस्त्यावर बुटपॉलिश करून पैसा फेंकणारा माणूस मला अधिक शाबूद बुद्धीचा वाटतो.

याचा अर्थ वरील मतप्रणालीप्रमाणं मी विवाहसमयीं वागलों असाहि तुम्हीं काढूं नका. त्याची अंदरकी बातच मुळीं न्यारी आहे. माझ्या विवाहावरील प्रेमाचा मुलामा तुम्हीं पुसणार नसाल तर ती सांगतों.

असं दचकूं नका. शपथ, मला वाटत होतं, कीं प्रेमविवाहाची सुरम्य घटना माझ्या सारख्याच्या नशिबीं कुठून असणार! कारण, एक तर, दिसायला कांहीं मी बायकी कुमार नाहीं, एकादी भानगड अद्याप माझ्या अंगशीं आली नाहीं, किंवा कॉलेजकुमारी झुलवायला माझ्या बापाची, ढकलून चालणारीहि, मोटारगाडी दारांत वाळत टाकली नाहीं. मग घरांत फाटक्या जुनेरांत लाज झांकून पातळ नेसतांच दारांत निलाजरी होणारी आधुनिक बापाची छिनाल कन्या मला कशी मिळणार? रांकट चेहऱ्याच्या निर्दय चुंबनाची रसिकता जाणण्याइतका जिवंतपणा पावडरनं रंगलेल्या पांढऱ्या गालाओठांत आजकाल उरलाय कुठं?

कांहीं असो, पण चुकून कां असेना, प्रेमाचं ' टेकनिक् ' मला साधलं खरं! हो, टेकनिक्च नाहीं तर काय? कारण, प्रत्यक्ष व्यवहारांत जरी ' बगाराम ' छाप ' फिफ्टी पर्सेंट ' प्रेम मी करीत आलों, तरी माझ्यावर प्रेम करणारी मूर्ख स्त्री कोणी जगांत असेल, असं मला स्वप्नांतहि वाटलं नव्हतं. त्याबाबत प्रेमाचा एक सिद्धांतहि

मीं मांडला होता, कीं वर्गांतल्या पोरीवर पोरानं आणि दारांतल्या पोरावर पोरीनं कधीं प्रेम म्हणून करूं नये. कारण ती दोघेंहि बिघडलीं असण्याचा सारखाच संभव असतो. याच न्यायानं कॉलेजांत 'पोत्यानं' पोरी होत्या, तरी त्या अवध्या नालायक ठरवून, शेजारच्या मुलींच्या शाळेवरून हिंडण्याचा धंदा मीं प्रामाणिकपणानं सुरू केला होता. आणि हं काय, प्रदीर्घ काळाच्या प्रवासानंतर कोलंबसाला अमेरिका दिसली, तशी दीर्घकालीन मुशाफिरीनंतर एक पोरगी मलाहि नेमानं दिसूं लागली.

पण प्रेमाच्या बाबतींत कॉलेजपेक्षां शाळेंतल्या पोरीच बनलेल्या असतात याचा मला लवकरच अनुभव आला. नेत्रकटाक्ष टाकून माझे डोळे शिणले-तरी प्रत्येक चेंडू तडकावणाऱ्या विजय मर्चंटप्रमाणं मारे धिमेपणानं घर आणि शाळा यांमधल्या रस्त्यावर लिली धांवा काढत बिनबादच राहिली.

पण प्रत्येक चेंडू खेळणारा खेळाडू कधीं तरी L. B. W. होतोच कीं ! लिलीचंहि तसंच झालं ! एकदां असाच संध्याकाळीं जड अंतःकरणानं राजाराम टॉकीजच्या दारांत मी घुटमळत होतों. फिरायला जाणाऱ्या पोरी आणि सिनेमाला येणाऱ्या स्त्रियां पाहून काळीज कसं तळ्-मळ् करीत होतं. पण म्हणतात ना ! साखरेचं खाणार त्याला देव देणार ! स्टॉलवर द्वारपालाच्या 'चान्सवर' लागलेल्या माझ्या मित्रानं मला खुणवलं ! माझा आनंद हृदयांतच नव्हे, तर कोटाच्या आंतील खिशांतहि मावेना. पॅटच्या खिशांत तो ठेवल्याचा अभिनय करीत, " तिकिटाशिवाय आंत येऊं नये " या पाटीकडे रावसाहेबांसारखं दुर्लक्ष्य करून, भीतभीतच मी माडीवर चढलों. तेव्हां जरा दूर गॅलरींतून हटकून माझा मित्र कानांत हलकेंच म्हणाला,

" तुमचं love-pot ( प्रेमपात्र ) आलंय आंत सिनेमाला: "

चोराला शोधणाऱ्या फौजदाराप्रमाणं तीक्ष्ण दृष्टीनं मीं आंत डोकावून पाहिलं. लिली आपल्या मैत्रिणीबरोबर मोटारींत बसल्याप्रमाणं अगदीं 'फ्रंटवर' बसली होती. तिला पाहून माझ्या काळजाचं अगदीं आइस्क्रीम झालं. मीं सीतारामाला म्हटलं,

" जरा बसूं कां आंत ? "

मॅनेजर कुठं जवळपास नाहींत ना, हें पाहाण्यासाठीं तो जरा दूर गेला मात्र—

पॅंटची इस्त्री हातानं साफ करून मोठ्या ऐटींत आमची स्वारी तिच्या अगदीं मागच्या रांकेंत बसली. हेतु इतकाच, कीं तिचं मुखकमल नसलं तरी वेणींतलं फूल बघायला—

पण कुठलं आलंय आमचं नशीब ! दोघीहि मैत्रिणी पुढून उठल्या आणि एक जागा सोडून माझ्या शेजारीं डाव्या बाजूस बसल्या.

माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं ! स्टॉलवर कोणीच दिसत नव्हतं. चुकून खोकला आला तर दवाखान्यांत पडायची पाळी यायची. उठावं काय, असा पोक्त विचार मनांत आला. पण मनाचा हिय्या करतांच वाटलं—असूं दे कीं ! सुशिक्षित पोरी आहेत या. शहरांतल्या म्हशी मोटारीला आणि मुली प्रेमाला बुजत नाहींत फार.

आणि त्याच वेळीं दिवे मालवले. अंधार पडला. पडद्यावर चित्रं नाचलीं. गोंगाट झाला; आणि पुनः मध्यन्तराचे दिवे लागले. मॅनेजरहि आला आणि गेला. केवढा आराम वाटला जिवाला ! त्या आनंदांतच पानपट्टीवाल्याकडून चॉकोलेटच्या चार वड्या

मी घेतल्या; आणि हंसत–मनानं मात्र भीत भीतच–लिलीपुढं धरल्या. तिनं एकदांच माझ्याकडे पाहिलं आणि हंसतच दोन वड्या उच-लल्या. मला किती किती वाटलं, माझ्या काळजाचं चॉकोलेट कोणी करील काय ?

पण लगेच अंधार पडला आणि सिनेमा सुरू झाला. माझ्या आशेचे किरणहि मावळले. सिनेमाकडे माझं मुळीं लक्षच लागेना. कारण, लिलीच्या केंसावरून येणारा पंख्याचा वारा किती उन्मादक वाटत होता ! त्या उन्मादांत तिच्या फडफडत्या पदराला चोरटा स्पर्श करण्यापलीकडे कांहीं माझी मजल गेली नाहीं. पण नाहीं म्हणून काय झालं ? घरांतले दिवे कांहीं पॉवर–हौसला चिकटवलेले नसतात. तिच्या पदराच्या तारेनं माझ्या हृदयाचा बल्ब प्रेमाच्या विजेनं कसा उजळून निघाला.

त्या उन्मादांतच सिनेमा संपल्यावर मीं त्यांच्या पाठोपाठ जिना उतरूं लागलों.

नगरपालिकेंतील केशवरावांचा ड्रायव्हर माझ्याकडे पहात मिष्किल-पणें हंसत होता. कॉलेजांतले दोस्त तर केवढ्यांदा खांकरले. लिली गोंधळून मैत्रिणीबरोबर केशवरावांच्या गाडींत चढली मात्र–

ड्रायव्हर मलाहि म्हणाला,

"बसा कीं ! चला पोंचवतों तुम्हांलाहि वाटेंत !"

आणि दुसऱ्या दिवशीं मी कॉलेजांत जायचा अवकाश ! जो तो "आहे बुव्वा"ची सलामी देऊन एकमेकांत कुजबुजूं लागला. नोटस् मागण्यापुरतीहि धड न बोलणारी एक भगिनीसुद्धां डोळे मोडून म्हणाली कशी,

"आतां लाडू केव्हां देणार ?"

मी थक्कच झालों, आणि उद्गारलों,

" कसले ? "

" लिलीच्या प्रेमाचे. "

मी गोंधळून म्हणालों,

" काय, म्हणता काय तुम्हीं ? "

" दुसरं काय ? पाहिलं तेंच म्हणतें. म्हटलं, आम्ही हजर होतों बरं कां तुमच्या मागंच–बॉक्समधें— "

" केव्हां ? "

" लिलीला चॉकलेट दिलींत तेव्हां. "

बॉंब पडल्यासारखी माझी अवस्था झाली !

मींच ही कंडी पिकवली अशी तिच्या बापाची खात्री झाली तर ?

* * *

तर काय, एके दिवशीं भल्या सकाळीं तिचे काका ( वडीलच ) माझ्या घरीं अगदीं नवं करकरीत उपरणं पांघरूण आले. गॅलरींत ब्रशानं दांत घांशीत मी उभा होतों. त्यांना मीं पाहिलं मात्र–बत्तीस दांत निखळल्यासारखा मी जिरलों. तरीहि मीं टॉवेलनं तोंड साफ करीत त्यांचं स्वागत केलंच; आणि खालीं येऊन म्हटलं,

" कोण हवंय ? "

" आपले वडील. "

कुणी बापाचं नांव काढलं तर राग येतो; पण त्यांच्या या उत्तरानं मला घाम आला. आणि राग आला तो वडिलांचाच ! जीवनाची त्रिस्थळी यात्रा करणारी स्वारी आजच नेमकीं घरीं होती. नाहींत म्हणून थाप देण्याचा विचार क्षणभर मनांत आला; पण जोरजोरांत ते देवघरांत घोकत होते—

" मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊन ठेले ॥ "

माझ्या उत्तराची वाटहि न पाहतां लिलीचे काका घरांत आले आणि खुर्चीवर बसून आमच्या कॉलेजचं मासिक चाळूं लागले. चोरट्या पावलांनीं पसार होण्याचा गनिमी कावा मला आठवला. पण विमानहल्ल्याचे दिवस आलेत ना ? काका अंकावरची दृष्टि न चाळवता म्हणाले,

" कोणत्या वर्गात आहांत तुम्हीं ? "

" आहे सीनियरला. "

" ऑनर्स वगैरे ? "

मला राग आला त्यांचा. त्यांना येवढं कळूं नये, मुलीचं वय, मुलाचं शिक्षण आणि बापाची पेन्शन कधीं विचारायची नसते. मी म्हटलं,

" घेतलेत तूर्त ! "

त्यांनीं आश्चर्यानं माझ्याकडे पाहिलं. त्यांना जणुं म्हणायचं होतं, 'प्रेम करणारीं माणसं ऑनर्स घेतात ?'

मी मनाशींच त्याचं उत्तर दिलं,

'घ्यायला काय हरकत आहे ? प्रेम आणि ऑनर्स दोन्ही सारखेच ! मिळालं तर भूषण नाहीं तर—'

त्याच वेळीं पूजा संपवून आबा खोलींत आले. त्यांना काकांनीं नमस्कार केला. प्रश्नार्थक मुद्रेनं आबा माझ्याकडे बघूं लागले. पण मी तरी काय बोलणार ? मनांत म्हटलं, शत्रुपक्षाचे वकील भेटलेत खरे !

तेव्हां काकांनींच प्रारंभ केला,

'तुमची माझी प्रत्यक्ष ओळख नाहीं. पण तुमच्या चिरंजीवांना मी ओळखतों. "

अगदीं खरं होतं तें! तरी आबा म्हणालेच,

" असं कां?"

" हो, आणि म्हटलं, तुम्हांलाहि त्याची पुरी ओळख करून द्यावी—"

" म्हणजे?"

" बापाला मुलाची खरी ओळख क्वचितच असते."

" आपल्या बोलण्याचा अर्थ—"

" इतकाच, कीं आपला मुलगा नव्या पिढीचा घटक आहे."

" बरं मग?"

मी तेथून निघून गेलों–तरी काकांचे शब्द माझ्या कानीं आलेच,

" प्रेमाची कृति त्यांना साधते; पण लेकाचे लग्नाची भाषा बोलायला भितात."

मी चोरून ऐकूं लागलों, आबा म्हणत होते,

" छे, छे, तोच मला म्हणत होता बी. ए. झाल्याशिवाय कांहीं लग्नाची ब्याद—"

" तोच काय, माझी लिलीहि म्हणत होती. पण दोघंहि आतां म्हणताहेत..."

" काय?"

" साऱ्या गांवाला विचारा कीं!"

" पण तुम्हींच सांगा ना."

" शिक्षण ही बुद्धीची तर प्रीती ही हृदयाची भूक आहे."

* * *

काकांचं हें वाक्य म्हणजे सुभाषितच नव्हतं कां एक? त्यानं माझ्या वडिलांना राग आला कीं आनंद झाला मला कळलं नाहीं

आणि लग्न होईपर्यंत मी त्याची चौकशीहि केली नाहीं. परंतु माझ्या डोक्यावर अक्षता पडल्या मात्र—

आबांचे आनंदोद्गार माझ्या कानीं पडले,

" वाजवा रे वाजवा. "

आणि मला इतका आनंद झाला, कीं बेहोष होऊन मी हातीं आला तो जरीचा शेला त्या ड्रायव्हरला बहाल केला. आतां तुम्हींच सांगा, लिली मिळवून देणाऱ्या ड्रायव्हरबद्दल एवढीहि कृतज्ञता मीं दाखवूं नये काय? मला तर भीति वाटते, कीं पास झाल्याची तार आणणाऱ्या पोष्टाच्या शिपायाला बंदा रुपाया देणारे रसिक माझ्या लग्नाची ही खुशालीसुद्धां कंजुषपणाचीच ठरवतील.

---

# आहुति

प्रांतिक कारणाच्या निमित्तानं प्रथम युरोपांत युद्धाची ठिणगी पडली. परंतु असुरी संहाराप्रमाणं विस्तरांतहि युद्धाचं साधर्म्य अग्नीशीं आहे, हेंच खरं! दीड दोन वर्षांच्या अवधींत त्या आगीनं अवघा युरोप करपून निघाला; आणि हां हां म्हणतां त्याला जागतिक स्वरूप येऊन महायुद्धाच्या तुफानी लाटा भारताच्याहि किनाऱ्यावर कोसळूं लागल्या. पण बहिऱ्याच्या कर्णांवरील नादलहरीप्रमाणं त्यांचा तुषारहि किनाऱ्याच्या आंत अद्याप आलेला नाहीं. म्हणूनच असेल, वर्तमान-पत्रांतील युद्धाच्या वार्ता हिंदी स्त्रियांना इतिहासाचीं कात्रणं वाटतात; तर नवतरुणांना चहाच्या वेळची ती एक करमणूक वाटते. बॉब-हल्ल्याचीं विमानं, शस्त्रागाराचीं जहाजं, राक्षसी रणगाडे, पल्लेदार मशीनगन्स—आणि त्यांखालीं चिरडणारी मानवी संस्कृति आणि

मानवता! पडद्यावर दिसणाऱ्या लुटुपुटुच्या लढाईप्रमाणं नुसतं कौतुकच आम्ही त्यांचं दाखवीत नाहीं काय?

मात्र विजयेची स्थिति याहून निराळी होती. खरं पाहातां, तिच्यांत आणि इतर तरुणींत फरक असा काय असणार? सर्व-सामान्य मुलींप्रमाणं बाहुल्यांच्या मेळाव्यांत ती लहानाची मोठी झाली, मैत्रिणींच्या संगतींत शाळाकॉलेजांत वावरली, आणि लग्न होतांच प्रीतीचं पहिलं वर्ष कसं क्षणाप्रमाणं सरलं तिचं! कदाचित् आयुष्यहि क्षणाप्रमाणंच वाटलं असतं तिला. परंतु आयुष्य ही नुसती क्रीडा नाहीं, हें कटु सत्य तिला पतीनंच प्रथम ऐकवलं.

रेडिओसमोर बसून पतिपत्नि आनंदानं जेवत होतीं. "जमुना जळिं खेळुं खेळ" ही रेकॉर्ड संपतांच "अब आप हिंदोस्तानी में खबरें सुनिये" म्हणून युद्धवार्ता सुरू झाली. विजयेचं लक्ष पतीला वाढण्यांत, तर विजयचं अवधान ती वार्ता ऐकण्यांत रंगून गेलं. तोंच एकदम दचकून विजय उद्गारला,

"ऐकलंस?"

प्रश्नार्थक मुद्रेनं विजयेनं पाहिलं. तेव्हां विजय म्हणाला,

"इटालियन सैन्य आफ्रिकेंत घुसणार."

काळजांत कट्यार खुपसल्याप्रमाणं विजयेनं विचारलं,

"मग?"

वीराला साजेसं हास्य करून विजय उत्तरला,

"आमचे अंदाज खरे ठरणार. आम्हांला बहुतेक आफ्रिकेच्या आघाडीवर जावं लागणार."

आणि दुसऱ्याच दिवशीं लष्करी वेषांतील विजय आपल्यावर अनिमिष नेत्रांनीं प्रीतीचा वर्षाव करतो आहे, असं विजयेला वाटलं.

त्यामुळें ओशाळून तिनं आपली काया किती किती चोरून घेतली! तरी पतीचे करपाश तिला दृढतम आणि चुंबन कमालीच्या निर्दय-पणाचं वाटलं. अन्ती नकळत हतबल झाल्याप्रमाणं 'स्ऽऽ' असा करुण स्वर तिच्या दुखबलेल्या ओष्ठांतून बाहेर फुटला, आणि जेव्हां तिला अगदींच गुदमरल्यासारखं वाटलं तेव्हां मोठ्या मुष्कीलीनं आपले कपोलोष्ठ तळहाताआड लपवून तिनं प्रयासानं येवढंच म्हटलं,

"हें काय—पुरे ना!"

तेव्हां अलगद उचलून त्यानं तिची सुमनसदृश काया आपल्या प्रदीर्घ बाहूंत गोळा केली, उन्मादाचा भर ओसरेतों आपलं मुख तिच्या सन्निध घट्ट धरून तिला कॉटवर ठेवली, आणि कठोरपणा दाखवलेल्या तिच्या नाजुक कपोलाशीं हातांच्या बोटांनीं लाडीगोडी करीत तिच्या दोन्ही मृदुकोमल उरोजांत आपलं मुख पुनः लपवलं. मऊ मऊ उशींत तोंड खुपसल्याप्रमाणं तिच्या उन्नत वक्षःस्थळांची ऊब त्याला सुखद वाटली. तिचा आस्वाद घेत असतां तिच्या उराची धडधड पण त्याला स्पष्ट ऐकूं आली. तेव्हां तिच्या अर्धोन्मीलित नेत्रांवर आपली नजर रोंखून तो घोगऱ्या आवाजांत म्हणाला होता,

"उद्यां आम्हीं किनारा सोडणार!"

वीराची युद्धाविषयींची अधीरता प्रणयाच्या उत्कटतेनंच व्यक्त होत असते, याची कल्पना विजयेला होतीच! रणकुंडांत उडी घेण्या-साठीं तयार होणाऱ्या आपल्या पतीचा एकीकडे तिला अभिमान वाटला. पण त्याच वेळीं अदृष्टाआड जाणाऱ्या पतीच्या वियोगाचं दुःखहि तिला अनावर झालं. डोळ्यांत एकवटलेले अश्रु अभिमानाचे कीं दुःखाचे हें तिचं तिलाच कळेना. तें ओळखून विजय म्हणाला,

" तूं पुण्यास जा ना थोडे दिवस. तुझ्या बाबांनीं बोलावलंय ना तुला ? "

तिला भडभडून आलं !

आपण आई होणार याची स्मृति तिला असह्य झाली. वीरपत्नी वीरमाता होत आहे. पण बापलेकांचं दर्शन—

नको त्या कुशंकेनं ती घायाळ झाली. त्या वेळीं तिची समजूत घालणंहि वेडेपणाचं होतं. तिला घट्ट हृदयाशीं धरून बऱ्याच वेळानं विजय म्हणाला,

" तुला मीं सहावींत शिकवलेली कविता आठवते ? "

" कोणती ? "

" होरेशस ! त्याचे उद्गार तूं विसरूं नकोस. "

त्यावर " नाथ " असा एकच आर्त स्वर काढून ती अधिकच त्याला बिलगली. तिच्या केशभारावरून हात फिरवीत विजय गुणगुणूं लागला,

" To every man upon this earth
Death cometh soon or late ! "

पण त्यालाहि गळा दाटूं न देणं कठीण झालं. तो सद्‌गदित स्वरांत येवढंच मोठ्या प्रयासानं म्हणाला,

" But how can man die better
Than facing fearful odds ? "

आणि त्यानं तिचं पुनः चुंबन घेतलं तें इतक्या अधाशीपणानं, कीं जणुं काय तें शेवटचंच चुंबन त्याच्या नशिबीं होतं !

* * *

दुसऱ्या दिवशीं वृत्तपत्रांत तिनं वाचलं मात्र—

" हिंदी सैन्य अज्ञात स्थळीं रवाना. "

" मुंबई सोडून तीहि पुण्यास आपल्या डेक्कन जिमखान्यावरील बापाच्या घरीं आली. परंतु तिचं चित्त आफ्रिकेच्या होमकुंडावरच घिरट्या घालीत राहिलं. नित्य नेमानं डोळ्यांत प्राण एकवटून ती वृत्तपत्रं वाचूं लागली. इटालियन सैन्याची पीछेहाट वाचून तिच्या हृदयांत कसं विजयानंदाचं भरतं येत होतं.

एकदां तर तिनं वाचलं,

" आफ्रिकेच्या रंगभूमीवर शिवाजीचा जयजयकार ! "

विजयाचा हर्ष तिच्या हृदयांत मावेना. तिला सिंहगडाची आठवण झाली. तिनं मनाशीं म्हटलं देखील, आतां विजय घरीं येऊं देत तर खरे ! लग्न झाल्याबरोबर आपण सिंहगडाला जाऊन जें जें केलं त्याची अगदीं पुनरावृत्ति—

परंतु दुसऱ्याच दिवशीं मुंबईहून तिला पत्र आलं. सासऱ्यांचं हस्ताक्षर तिनं चटकन् ओळखलं. तिनं तें फोडून पाहिलं. बापाच्या हस्ताक्षरांत मुलाचं इतिवृत्त लिहिलं होतं,

" ...इटालियन सैन्याची पीछेहाट ही ब्रिटिशांच्या अंतिम विजयाचीं पूर्वचिन्हंच आहेत. पण पुण्यप्राप्तीसाठीं यज्ञांत आहुति द्यावी लागते. विजयासाठीं युद्धांतहि—

पोरी, अंबिकेच्या आशीर्वादासाठीं तान्हाजीनं सिंहगडीं आत्माहुति दिली.

लोकशाहीसाठीं तसंच बिनमोल मरण तुझ्या नवऱ्याला लाभलं आहे..."

विजया या अकल्पित धक्क्यानं दिङ्मूढ झाली. वाचण्याचं राहो, रडण्याचंहि भान तिला राहिलं नाहीं. डोळे विस्फारून ती खिडकींतून दिसणाऱ्या धीरगंभीर सिंहगडाकडे पाहात राहिली. नवऱ्याचे

शेवटचे बोलच काय तें तिच्या कानांत कोणी तरी मोठ्यानं बोलल्या-प्रमाणं निनादूं लागले,

" But how can man die better
Than facing fearful odds ? "

या वचनाची प्रतीति देणारी लाखो वीरांच्या आत्मयज्ञाची अमर स्मृति तिच्या डोळ्यांपुढं दिसत होती.

ती पाहून तिला वाटलं, आपल्या नवऱ्याच्या अतुल त्यागाची स्मृति अशी कोणी राखील काय ?

हा प्रश्न तिला सुचला मात्र ! होरेशसचं अमर उत्तर तिला आठवलं—

" The ashes of his father
And the temples of his Gods "

आपल्या गतवैभवाची साक्ष—नव्या भारताची पवित्र ध्वजा—महात्माजींचा तिरंगी झेंडा सिंहगडावर फडकत राहिल्याचा तिला आभास झाला !

अवघ्या भारताची ही आकांक्षा पुरवली जाईल कां ?

निश्वास सोडून तिनं दृष्टि हलवली. समोरच ताज्या दैनिकाचा अंक पडला होता. आणि जाड अक्षरांत भारतमंत्री अमेरीनीं पार्लमेंटांत केलेल्या हिंदुस्थानच्या खुशालीचं भाष्य त्यांत छापलं होतं ! तें तिनं नुसतं ओझरतं पाहिलं मात्र मोठ्यानं, तिनं हंबरडा फोडला !

एकच तळमळ तिला दुःसह वाटत होती—बापाच्या अतुल आत्मयज्ञाची स्मृति भारताची खरीखुरी लोकशाही त्याच्या मुलाला केव्हां देणार ? लोकशाहीसाठीं मरणाऱ्यांना लोकशाही जगण्याचा जन्मसिद्ध हक्क केव्हां मिळणार ?

---

# सप्रेम भेट

कारण कांहीं असो ! एवढं खरं, कीं अशोक आपल्या वाड्यांत रहायला येणार हें नक्की कळल्यापासून लीला आनंदातिशयानं अगदीं वेडीच झाली होती. एवढी पंधरा वीस वर्षांची ती पोर ! पण जरा कुठं बाहेर सायकलची घंटी वाजली, अगर टांगेवाल्याची हांक ऐकूं आली, कीं एखाद्या पांच सहा वर्षांच्या अवखळ पोरी-प्रमाणं पळत खिडकींत जाई आणि हळूंच बाहेर डोकावी. पण जितकी आतुरतेनं प्रतीक्षा करावी तितकी फसगतच बहुधां नशिबीं येते. लीलेचंहि पुष्कळदां असंच झालं; तरी पण प्रत्येक खेपेस नव्या आशेनं ती धांवे आणि निराशा पदरीं आली, कीं आंबट चेहरा करून परत फिरे आणि त्या वेळीं तिच्या साशंक मनाला वाटे, दोनतीनदां खिडकींतून उगीचच बाहेर डोकावतांना आप-

णाला कुणी पाहिलं तर नसेल ना ? पण लगेच आपली ही वेडी शंका विसरण्यासाठीं जवळच्याच आरशांत पाहून, स्थानभ्रष्ट पदराआडून बाहेर डोकावणाऱ्या एकदाणीशीं खेळत, ती स्वतःशींच हंसे व म्हणे,

" खरंच, किती वेडी आहे मी ! "

लीलेला अशोकची एवढी ओढ कां लागली, हें सांगणं जरा कठीणच होतं. कारण, तसं पाहूं गेलं तर लीलेचा व अशोकचा परिचय असा कांहींच नव्हता. फक्त तो एक प्रसिद्ध लेखक आहे, हीच त्याची तिला माहिती आणि त्याच्या कथासंग्रहावरील त्याचा फोटो हीच त्याची ओळख ! पण एकादी सुप्रसिद्ध व्यक्ति आपल्या घरीं येणार याचा आनंद थोडाथोडका कां असतो ? लीला जर कां लहान असती, तर आपल्या प्रत्येक मैत्रिणीच्या घरीं पळत जाऊन, धापा टाकीत तिनं सर्वांना सांगितलं असतं,

" आज आमच्या इथं कीं नइऽ, अशोक येनाल आहेत. खोतं नाहीं, अगदीं खलंऽ ! "

पण वयोजन्य विनयानं तिच्या या आनंदाची भरती हटवली होती; आणि म्हणूनच विनयाचीं दिखाऊ बंधनं नसलेल्या तिच्या अल्लड हृदयांत एकच गोंधळ माजून राहिला होता. किती तरी विचार तिच्या मनांत येऊन गेले. 'अशोक कसे बोलतात ? कसे हंसतात ? ते आपल्याशीं बोलतील काय ? आपण त्यांच्याशीं कसं बोलावं ? बोलतांना किती हंसावं ?' आणि अशा तऱ्हेनं अंदाज करून, अशोक जवळच खुर्चीवर बसला आहे, असं समजून, तिनं तिसऱ्या मजल्यावरील मोठ्या आरशासमोर, आपल्या हावभावांची रंगीत तालीमसुद्धां हजारदां घेतली होती !

शिवाय, तिच्या या वेडांत भर घालायला आणखी एक कारण झालं; आणि तें म्हणजे खुद्द अशोक येण्यापूर्वी पुढं आलेलं त्याचं फर्नीचर, पुस्तकं वगैरे. तीं तुळतुळीत शेल्फस्, तीं जाडीं इंग्रजी मराठी पुस्तकं आणि हीं सारीं पाहून तिला आपल्या हाय-स्कुलांतील मास्तरांचं वाक्य आठवलं. अशोकची कादंबरी वाचण्या-पूर्वी त्याचा परिचय करून देतांना ते म्हणाले होते,

"He is a giant reader."

आपल्या डाव्या हाताची अंगुली चावून भुवयांच्या कमानी उभारीत तिनं त्याचं भाषांतर केलं,

"अय्या! इतकीं पुस्तकं यांनीं वाचलीन् तरी कधीं बाई?"

आणि या साऱ्या गोष्टींनीं तिचा त्याच्याविषयींचा आदर सारखा दुणावतच गेला. मनुष्य एकदां प्रेमवेडा झाला, कीं क्षुल्लक वाट-णाऱ्या गोष्टींनींहि त्याचं वेड वाढत जातं हेंच खरं!

आणि म्हणूनच अशोक यायच्या वेळीं फुलं तोडण्याच्या निमित्तानं ती बागेंत घुटमळत राहिली. अशोकचा टांगा बागेच्या डाव्या फाटकां-तून येईल म्हणून त्याचं तोंड दिसावं या हेतूनं मुद्दामच तिनं बागेचा डावा कोंपरा गांठला. पण ऐनवेळीं टांगा आला तो उजव्याच फाट-कानं आणि थेट दारांतच थांबला. तिला टांगेवाल्याचा अस्सा राग आला, कीं "काय, तुझं घोडं बघायचं नव्हतं!" असं पुटपुटत ती उजव्या कोंपऱ्याकडे वळली. पण या अवधींत अशोक तिच्या दादाशीं हस्तांदोलन करून केव्हांच आंत गेला होता. फक्त त्याचं पाठमोरं दर्शन काय तें तिला झालं. पण त्याच्या या ओझरत्या दर्शनामुळंच त्याच्या दर्शनाची निराशा तिला असह्य वाटूं लागली; ती इतकी, कीं चोरून कां होईना, पण त्याला प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आज

झोंपायचंच नाहीं, या निश्चयानं ती घरांत गेली. पण त्या साऱ्या दिवसांत कांहीं बिचारीला हवी ती संधि मिळाली नाहीं; आणि म्हणूनच आपल्या हट्टी स्वभावाचं समाधान करण्यासाठीं कादंबरींतील अशोकाचा फोटो न्याहाळीत ती रात्रीं बिछान्यावर पडली. या वेड्या कृतींतसुद्धां कसलं तरी गूढ समाधान तिला मिळालं असावं! कारण, झोंपीं गेली तरीहि कुशी बदलेपर्यंत ती कादंबरी तिच्या वक्षांवर विसावली होती.

*　　　*　　　*

आणि चोरी ही खोडच मुळीं अशी आहे, कीं जी उघडकीस आल्यावांचून सोडवत नाहीं. लीलेचंही असंच झालं. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं अशोक खिडकींत उभा असलेला पाहून, त्याला प्रत्यक्ष पाहण्याची लाज वाटल्यामुळेंच कीं काय तीच जाणे, तिनं आपल्या आरशाची व्यवस्था बदलली. आतांपर्यंत टेबलावर विसांवणारा मोटा आरसा तिनं उचलला आणि अशोकाचं प्रतिबिंब दिसेल अशा तऱ्हेनं भिंतीवर लटकावला आणि उगीचच केसावरून हात फिरव, पातळाची पिनच बसव, गळ्यांतील माळच फिरव, अगर वेणींतील रिबनच बदल, अशी तिची वेशभूषा नियमितपणें सुरू झाली.

आपली लीला इतकी सुधारलेली पाहून तिच्या घरच्या मंडळींना अगदीं आश्चर्य वाटलं. कारण, आजपर्यंत दादानं तिला अनेकदां बजावलं असेल,

'तायडे, तुझीं पुस्तकं अस्ताव्यस्त दिसतात, खोली गबाळी असते...'

पण त्याला "असूं दे आमचीं" असं म्हणून मानेला एक झटका देण्याव्यतिरिक्त अधिक महत्त्व तिनं कधींच दिलं नव्हतं. पण अशोक

आल्यापासून ती पुरती बदलली. तिची पातळाची नेसण, केसांची रचना, चालण्यांतील लकब, एवढंच नव्हे, तर नजरेंतील चोरटं चांचल्य यासारख्या बारीकसारीक गोष्टींतसुद्धां अभिनव कलेचं वास्तव्य भासूं लागलं. आरशांत अशोकचं दर्शन घेणं ही तर तिची 'हॉबीच' बनली. कुणी कांहीं म्हणो, प्रेमामुळें माणूस गुणी बनतं, हें कांहीं खोटं नाहीं खास !

पण प्रेमाचा धागा फार नाजुक असतो. त्याच्या एका टोंकाला जरी प्रणयाचीं आंदोलनं मिळालीं, तरी दुसऱ्या टोंकालाहि त्यांच्या हळुवार संवेदना लगेच जाणवतात; आणि यामुळेंच लीलेची चोरटी 'हॉबी' उघडकीला आली. एक दिवस लीला आरशांत पहात असतां बराच वेळ खिडकींत उभा असलेला अशोक जरा आड झाला. लटक्या रागानं 'नको नको' म्हणत असतांही बळेंच चुंबन घेतलं जावं, तसं लीलेला झालं. प्रणयी जीवाला हतबल करणारं कसलं तरी असह्य समाधान तिच्या सर्वांगांतून चमकून जातांच, प्रेमी गुन्हेगाराला समाधानाची शिक्षा करणारा लाडका प्रमाद करण्याचा मोह तिला अनावर झाला. चोरट्या नजरेनं तिनं पुनः आरशांत पाहिलं.

अशोकहि आपला आरसा खोलींतील भिंतीवर टांगतांना तिला दिसला; आणि समोरच्या आरशांतला अशोक जेव्हां तिला पाहून हंसला, तेव्हां गाल फुगवून 'चला, चावट कुठले' या अर्थाचा एक झटका मानेला देऊन तिनं मान वळवली. पण समोरचा अशोकसुद्धां हंसतच होता. यामुळं मात्र लीला अगदींच लाजली. निःसहाय्य झाल्याप्रमाणं दोन्ही तळहातांनीं तिनं आपलं लाजरं मुख लपविलं. पण अशोक खंदा लेखक होता. तळहातांनीं तोंड

लपविलं तरी खोडसाळ नजर दोन बोटांमधील फटींतून आपला मार्ग काढते, हें त्यानंच आपल्या लिखाणांत अनेकदां प्रतिपादिलं होतं; आणि म्हणूनच तिला गोंधळलेली पाहून बराच वेळ तो निर्दयपणें हंसत होता.

* * *

अशोकची लघुकथा एखाद्या मासिकांत छापून आली, कीं अधाशीपणानं ती वाचून, तिची सांगोपांग चर्चा करणं हा लीलेचा एक आवडीचा विषयच होऊन बसला. तिच्या घरची मंडळीहि प्रेमानं तिचं सारं ऐकून घेत, आणि तीहि एकाद्या जाड्या पंडिता-प्रमाणं ती समजावून देण्याचा प्रयत्न करी. प्रथम प्रथम लीला आपणहून चर्चा कधींच करीत नसे. फक्त 'सुंदर' असं म्हणून ती त्या गोष्टींतील चित्रं न्याहाळीत बसे! पण तिच्या वहिनीनं खोडसाळपणें, 'काय सुंदर आहे ग? चुंबनानं शेवट केला म्हणजे कांहीं गोष्ट सुंदर होत नाहीं.' असा वृथा आरोप केला, कीं मग मात्र लीला तिच्यावर अगदीं तुटून पडे. जणूं काय ती तिची स्वतःचीच लघुकथा असून, त्यांतील एखादा मुद्दा खोडल्यानं तिच्या स्वतःच्याच प्रतिष्ठेला धक्का बसणार होता! वहिनीहि नाहीं नाहीं त्या शंका काढून तिला चिडवी. यांत तिला खेळवण्याचा जरी सात्विक हेतु असला, तरी कधीं कधीं त्याचा इतका अतिरेक होई कीं,

"तुला नाहीं हें कळायचं."

याच रामबाण उपायानं लीलेला स्वतःला सांवरावं लागे.

यावर वहिनीहि खोडसाळपणें म्हणे,

"आम्हांला कसं कळावं बाई? ज्याचं त्यालाच कळायचं!"

मग मात्र चिडल्यासारखं दाखवून लीला म्हणे,

" हें ग काय तुझं, वैनी ? उठलं सुटलं याच शेवटावर येतेस नेहमीं ! अशानं मी नाहीं बाई.... "

पण हें वाक्य पुरं होण्यापूर्वींच वहिनी तिला कुरवाळीत म्हणे,

" अग, तुला आवडतं म्हणून ! खरं सांग, तुला माझी चेष्टा मनापासून आवडते कीं नाहीं ? "

यानं मात्र लीला अगदीं मूल बने. लडिवाळपणें वहिनीला विळखा घालून, तिच्या उन्नत उरोभागावर मस्तक टेंकून ती हंसे,

" म्हणून काय झालं ? आवडणाऱ्या साऱ्याच गोष्टी कांहीं उघड बोलायच्या नसतात. तूं घेतेस कां कधीं दादाचं नांव ? आवडतो ना तो तुला ? "

" अस्संऽ " लीलेचा मुका घेऊन वहिनी बोले, " म्हणून कां अशोकांचं नांव घ्यायला लाजतेस तूं ? "

मग मात्र लीलेला तिथं राहणं अवघड होई. वहिनीला टाळण्यासाठीं तेथून पळत जात ती म्हणे,

" इश्श, पुरे बाई आतां ! "

* * *

आजहि असंच झालं. चहापाण्यामध्यें दंग असतांना सर्वच लीलेची चेष्टा करण्यांत रंगले होते. दादासुद्धां मधून मधून एखाद्या वेंचक वाक्याची भर घालीत होता. एखाद्या चक्रव्यूहांत सांपडल्याप्रमाणं लीला गोंधळली होती.

पण ऐनवेळीं अशोक आल्यानं मध्येंच सर्वांचा विरस झाला. मात्र लीलेला आनंद झाला. दैत्यांपासून सोडविल्यानंतर उर्वशीनं जसं पुरुरव्याकडं पाहिलं असेल, अगदीं त्याच कृतज्ञतापूर्ण नजरेनं

तिनं अशोकाकडे पाहिलं. चोरून ठेविलेलं मधुर हास्य तिच्या गालावरील खळींत सांठलेलं दिसत होतं.

" या, या, अगदीं चहाच्या वेळींच आलांत बुवा. "

दादानं अशोकाचं स्वागत केलं.

पुढं केलेला कप स्वीकारीत अशोक हंसला,

" ही कादंबरी देण्यासाठीं आलों होतों. "

दादानं कादंबरी उघडली. अगदीं अभिनव पद्धतीनं छापलेली ती आकर्षक कादंबरी चाळीत त्यानं समाधान व्यक्त केलं,

" वाः, छान ! "

लीलेला स्वस्थ बसवेना. नवी कादंबरी, तीहि अशोकची, आणि आपण वाचण्याआधीं दादानं ती बघायची म्हणजे काय ? स्त्री-हृदयाला आपल्या आनंदांत भागीदार खपत नाहीं हेंच खरं ! जागच्या जागीं चळवळ करीत मलपृष्ठावरील रूपसुंदरीचं चित्र न्याहाळीत ती म्हणाली,

" पुष्पांजलि कां नांव हिचं ? "

मलपृष्ठावर शीर्षक ठळक दिसत होतं. शिवाय, तिला ठाऊक होतं, कीं अशोक ही कादंबरी लिहीत होता म्हणून. तरीहि तिनं हा प्रश्न विचारलाच; कारण एखाद्या गोष्टीचा अत्यानंद झाला, कीं पुनः पुनः तिचा नामोच्चार करावासा वाटतो; तिनं हंसत हंसत तें नांव पुनः एकदां वाचलं,

" पुष्पांजलि ! "

वहिनीला लीलेची चेष्टा करण्याचा मोह अनावर झाला. कारण अशोक जवळ आहे म्हणूनच लीला स्वस्थ आहे; एरवीं दादा-कडून तिनं ती कादंबरी जवळजवळ हिसकावूनच घेतली असती,

हें ती जाणून होती. शिवाय एका दगडांत आतां दोन पांखरं पडणार होतीं. लीलेकडे चोरट्या नजरेनं पहात ती अशोकला म्हणाली,

" पण बाई, आम्हांला कशी ही मिळायची ? कारण, लीलेच्या हातीं एकदां कां ती गेली, कीं आम्हांला तिलांजलीच द्यावी लागणार तिला. "

अशोकनं हंसत विचारलं,

" तें कां ? "

" अलीकडे तुमच्या कादंबऱ्या फारच आवडूं लागल्यात हिला."

" नाहीं हो ! "

लीलेनं मानेला हिसडा दिला.

तिला वेडीला काय कल्पना, कीं उपवर मुलींच्या मानेचा नकार म्हणजे त्यांच्या हृदयाचा होकार असतो म्हणून ! हें जाणूनच अशोक लीलेकडे पाहून हंसला,

" हो कां ? मग मी यांना दुसरी देईन हवी तर ! "

" तसंच करा. " दादानं मान डोलविली, " हिला तुमची भेट स्पेशलच जाऊं दे ! "

दादाच्या या डिवचण्यानं लीलेला आंतल्या आंत आनंद होत असला, तरी भुवयांच्या नागमोडी वळणांनीं तिनं रागच प्रकट केला. पदराशीं चाळा करीत ती फणकाऱ्यानं उठली; पण लगेच कांकणांशीं खेळत लडिवाळपणें अशोकला म्हणाली,

" चला पाहूं ! "

तिच्या या गोंधळलेल्या मनस्थितीचं अशोकला हंसूं आलं. तें आंवरण्याचा प्रयत्न करीत तो उठला.

" पाहिलंत; चहासुद्धां घेऊं दिला नाहीं. "

दादानं टोमणा मारला.

" भेटीची ओढ आहे ना? आतां भेटीनंतर पहा, दररोज चहाला बोलवील. "

वहिनीनं पतीला साथ दिली.

पण यावेळीं लीला व अशोक खोलीबाहेर गेल्यानें दोघेहि जागचे उठले. दादा आपल्या कामाला निघून गेला. वहिनीहि जाणारच; पण पोष्टमननं मासिक आणून दिल्यानं तिनं तें घेऊन लीलेची खोली गांठली. कारण, लीलेचा हट्ट म्हणून म्हणा, अगर सर्वांनाच तिचं कौतुक वाटे म्हणून म्हणा, घरांत येणारं कसलंहि नवं पुस्तक तिनं प्रथम वाचावं हा प्रघातच पडला होता. अल्लड हृदयाला असल्या क्षुल्लक वाटणाऱ्या हट्टांची फार आवड असते; आणि प्रेमातिशयानं तिचे हट्ट सर्वजण पुरवीतहि! वहिनीनं लीलेच्या टेबलावर तो अंक टाकला आणि तिच्या आटोपशीर गृहरचनेकडे गुणग्राहकतेनं पहात ती बाहेर पडणार, तोंच—

" इश्श ऽ नको गडे ! अंऽऽहें काय ? "

" सप्रेम भेट ! "

या अस्पष्ट संवादानं चकित होऊन वहिनीनं सभोंवतीं पाहिलं. पाहतां पाहतां बाजूच्या आरशांत ओझरतं दिसलेलं दोन अनुरक्त मुखांचं संमीलन वहिनीला किती चित्ताकर्षक वाटलं ! समाधान चित्तानं जिना उतरीत असतां, समोरून पळत येणाऱ्या लीलेनं वाटेंतच तिला हातांतील कादंबरी दाखवीत विचारलं,

" पाहिलीस माझी भेट ? "

लीलेचा ओला गाल पदरानं पुशीत वहिनी प्रेमभरानं बोलली,

" पाहिली बरं ! "

---

क्रमांक
नों. दि. 30/3/84

# मुखपृष्ठ (रसग्रहण)

सुप्रसिद्ध आंग्ल चित्रकार F. Dicksee यांच्या The Dawn या चित्रावरून नवयुग चित्रपट लि.चे कलादिग्दर्शक श्री. वाटेगांवकर यांनीं ही कल्पना घेतली आहे. भारतीय संस्कृतीचीं आभरणं चढ-वण्यापेक्षां फारसा बदल त्यांनीं यांत केला नसला, तरी मूळ तिरंगी चित्रांतील भाव एकाच रंगांत हुबेहुब प्रकट करण्याचा त्यांच्या कुंच-ल्याचा विलास विलोभनीय आहे.

चित्र पाहातांच प्रथम दोन प्रतिमा मनावर बिंबतात. पहिली क्षितिजावर उभी असलेली रूपसंपन्न नवतरुणी आणि दुसरी तिकडे पाठ करून पायथ्याशीं वाट चालूं पाहाणारा एक वयस्क मनुष्य !

परंतु येवढाच एक विरोध त्यांत नाहीं. चित्रकारानं त्यांच्या पार्श्वभूमीहि विरोधी आणि उठावदार केल्या आहेत. उषःकालीन तेजोवलयं आकाशांत पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्त्रीची रूपसंपदा, तर निरास पावणाऱ्या अंधकाराच्या पार्श्वभूमीवर पुरुषाची रांकट छाया अस्पष्टशी दाखवली आहे. हें ध्यानीं घेणा-ऱ्यांच्या आतां लक्षांत येईल, कीं क्षितिजावरील कन्यका ही केवळ

एक साधी स्त्री नसून, कोंवळ्या किरणांची ती प्रतीक आहे, आणि तो छायापुरुष तिमिराचा प्रतीक आहे.

आणि हें मनावर ठसवण्यासाठीं चित्रकारानं सामान्यतः पुढील खुब्यांचा अवलंब केला आहे. प्रथम स्त्रीची प्रतिमा पहा. नवतारुण्याचा उन्माद तिच्या नसांनसांतून कसा ओसंडतो आहे. टपोऱ्या डोळ्यांतील ती निर्भयता, मोकळ्या मुकुलांचा तो स्वच्छंदीपणा, वाऱ्यावर पदर सोडण्यांतील तो अल्लडपणा, पण उरोजावरच तो दक्षतेनं सांवरण्यांतील ती शालीनता यांनीं तिच्या अंतःकरणावर प्रकाश टाकला आहे; तर तिची कायाकांति झांकू पाहाणाऱ्या वस्त्राआडूनहि उठून दिसणाऱ्या परिपुष्ट यौवनसूचक अवयवांनीं तिच्या निरामय सौंदर्याचा कलापूर्ण आविष्कारच केला आहे. तात्पर्य, कोंवळ्या किरणांची सारी भुलावणच जणुं तिच्या प्रतिमेंत दडली आहे.

उलट तो छायापुरुष आयुष्याच्या अनुभवांनीं विटलेला दिसतो. हताशपणें त्यानं आपले हात उरावर धरले आहेत आणि गळलेल्या गात्रांनीं किती अधाशीपणें त्यानं आपलीं वस्त्रं सांवरलीं आहेत. दिवसभराच्या श्रमानीं आलेली आणि अंधेऱ्या रात्रीं द्विगुणित झालेली निराशाच जणुं पहांटेच्या कोंवळ्या किरणांच्या दर्शनानं दिपून कुठं तरी नाहींशी होत आहे. परंतु असं करतांनाहि पुनःप्रत्ययाच्या प्रतीतीनं तो दैवहत पुरुष एकच विचार मनांत बाळगीत असेल—नवयुगांत आज पदक्षेप करणारे जीव किती भाग्याचे म्हटले पाहिजेत नाहीं ? हाच विचार मूळ चित्राखालीं ठळक इंग्रजी अक्षरांत छापला आहे,

"Bliss was it in that dawn to be alive."

---

# मिळकत कशी वाढवावी ?

हा बिकट प्रश्न आज तुमच्यापुढें उभा आहे. तो कसा सोडवावा या विवंचनेंत तुम्ही आहां ना ? तर मग

## ज्योतिष, सामुद्रिक व रमल यांचीं

## अभ्यासपत्रकें भा. १ व २ एकत्र

हें पुस्तक आजच मागवा.

**किंमत आगाऊ म. ऑ. नें ३ रु. व्ही. पी. नें ३॥ रु.**

हीं अभ्यासपत्रकें त्रिरेखावेलाप्रबोध, नष्टजातक वगैरे ग्रंथांचे लेखक

**सुप्रसिद्ध ज्योतिषी श्री. ज. वा. जोशी, पालशेतकर**

यांनीं तयार केलीं असून यांच्या साहाय्यानें आपला नित्याचा व्यवसाय संभाळून घरच्याघरीं फावल्या वेळांत वरील तिन्हीं शास्त्रांचें ज्ञान मिळवितां येतें व आपल्या प्राप्तींत चांगली भर टाकतां येते. स्वतंत्ररीतीनें धंदा करून महिना ४०-५० रुपये या पत्रकांच्या अभ्यासानें सहज मिळवितां येतात. बेकार तरुण, गरीब शाळामास्तर, कारकून व लहानसहान धंदे करून कशीतरी उपजीविका करणाऱ्या लोकांना, जोडधंदा करून आपली मिळकत वाढविण्याचे कामीं हीं पत्रकें अत्यंत उपयुक्त ठरलीं आहेत. 'काय करावें कांहीं सुचत नाहीं' असा विचार करण्यांत व्यर्थ कालापव्यय न करतां ३ रु. म. ऑ. नें आजच पाठवून पत्रकें मागवा व उद्योगास लागा. अनेकांनीं या पत्रकांचा फायदा घेतला आहे, घेत आहेत. तुम्ही ही आलेली संधि गमावूं नका.

**पत्रकें मिळण्याचें एकच ठिकाण :—**

## अरविन्द प्रकाशन, कोल्हापूर.

# आमचीं कांहीं पुस्तकें

## कादंबरी

रिकामा देव्हारा : खांडेकर
सुखाचा शोध : ,,
काश्मिरी गुलाब : प्रो. फडके
कुलाव्याची दांडी : ,,
दौलत : ,,
जादूगार : ,,
प्रवासी : ,,
दौलत (संक्षिप्त) : ,,
दिव्य चक्षु : कु. रत्नप्रभा रणदिवे
आंधळा न्याय : वि. वा. पत्की
समरांगण : म. भा. भोसले

## लघुकथा

दत्तक व इतर गोष्टी : खांडेकर
विद्युत्प्रकाश : ,,
पाकळ्या : (२ री आ.) : ,,
गोष्टी भाग १ ला : प्रो. फडके
गोष्टी भाग २ रा : ,,
परिस आणि लोखंड : शं. गो. गोखले
कोंवळीं किरणें : दिनकर द. पाटील

## काव्य

भिकारीण : मंगसुळीकर
जीवनप्रभा : द. दा. पेंडसे
फुलांची बाग : वासुदेवाग्रज

## संस्कृत

बलिदानम् : लाटकरशास्त्री
श्रीशाहुचरितम् : ,,

## नाटकें व नाटिका

संजीवन : प्रो. फडके
तोतया नाटककार : ,,
जडावाची देवी : ,,
आगलावी : ,,
क्षमेसाठीं अपराध : ,,

## टीका-विनोद-चर्चा

वनभोजन : खांडेकर
धुंधुर्मास : ,,
वाङ्मयविलास : माडखोलकर
प्रतिभासाधन : प्रो. फडके
साहित्य आणि संसार : ,,
मानसमंदिर : ,,
मनोहरची आकाशवाणी : ,,
वाङ्मयविहार : ,,
गलोल : शामराव ओक
स्वल्पविराम : र. कृ. फडके
कागदी होड्या : बा. भ. बोरकर
खांडेकर चरित्र आणि वाङ्मय : प्रो. मा. का. देशपांडे, एम्. ए.

## इतर

बुद्धिबलक्रीडारत्नें : हळदीकर
अभिनयकला : मिरजकर
पाट्यांचे खेळ (सचित्र) : नेरूरकर

: प्रकाशक :

दा. ना. मोघे, बी. ए. कोल्हापूर

# व्यावहारिक ज्ञानकोश

सह्याद्रि मासिकाच्या आकाराचीं २००० पृष्ठें.

एकूण भाग पांच. सर्व भाग प्रसिद्ध झाले.

मुंबई इलाखा व वऱ्हाड मध्यप्रांत यांमध्यें ट्रेनिंग संस्था, हायस्कुलें व लायब्ररी यांसाठीं मंजूर.

६० पृष्ठांचें माहितीपत्रक मागवा. मोफत पाठवूं.

अर्धकापडी बायंडिंगच्या सेटची किं. रोखीनें ३२ रु. फक्त

फार थोडे सेटस् शिल्लक आहेत.

आपली मागणी खालील पत्त्यावर त्वरित पाठवा—

सोल एजण्टस्:—

**स्कूल ॲंड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.**

---

# छापत ] बालकोश [ आहे

प्राथमिक व दुय्यम शाळांतील विद्यार्थी, तसेंच शिक्षक व पालक यांना अत्यंत उपयुक्त.

आकार—डेमी अष्टपत्री पृष्ठें ९००

तीन भागांत संपूर्ण, अर्ध कापडी बायंडिंग. पहिला भाग दिवाळीचे सुमारास प्रसिद्ध होईल.

**आक्टो. १९४१ पूर्वी वर्गणीदार होणारांस किंमत फक्त १२ रु. त्यानंतर १५ रुपये.**

माहितीपत्रक मागवा. मोफत पाठवूं.

सोल एजण्टस्:—

**स्कूल ॲंड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.**

# नुकतींच प्रसिद्ध झालीं !

**खांडेकर— चरित्र आणि वाङ्मय—** प्रो. मा. का. देशपांडे, एम्. ए.
खांडेकरांच्या वैयक्तिक व वाङ्मयीन जीवनाचें दर्शन करविणारा अत्यंत उपयुक्त व संग्राह्य ग्रंथ.
किं. २॥ रु.

**समरांगण—** म. मा. भोसले
खेड्यांतील जीवनावर आधारलेली स्वतंत्र सामाजिक कादंबरी. श्री. मामा वरेरकर यांची प्रस्तावना. सचित्र कव्हर, सुंदर छपाई.
किं. १॥ रु.



वाचनालय भिलवडी.
क्र. ७५२३ ता. नि.



**परिस आणि लोखंड—** शं. गो. गोखले, सांगली.
मनोरंजन, किर्लोस्कर, सह्याद्रि, मनोहर वगैरे मासिकांतून श्री. गोखले यांच्या प्रसिद्ध झालेल्या गोष्टींपैकीं निवडक गोष्टींचा समावेश या संग्रहांत केला आहे. किं. १। रु.

**फुलांची बाग—** वासुदेवाग्रज
सुप्रसिद्ध कवि वासुदेवाग्रज यांचा दुसरा काव्यसंग्रह. नाविन्यपूर्ण व काव्यानुकूल अनेक सुंदर चित्रें, विविध व मनोरम विषय, श्री. मामा वरेरकर यांची प्रस्तावना.
किं. १। रु.

: : प्रकाशक : :

**स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.**